CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, ८ जानेवारी २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ४३ । पाने १२ । किंमत रु. ६/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



तुम्ही कोणत्याही क्षेत्रात असा राष्ट्राला तुमच्या क्षमतेची, वेळेची आणि ऊर्जेची गरज आहे. तुम्ही शहराच्या झगमगाटातून बाहेर पडावे आणि आपल्या उपेक्षित ग्रामीण बंधूंच्या उत्थानाकरिता समर्पित व्हावे याची देशाला आवश्यकता आहे.

**- भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# अभद्र युतीला वाव नाहीच

## मुख्यमंत्री फडणवीसांनी खडसावले; काँग्रेसचीही कारवाई

◆ **मुंबई, ७ जानेवारी**

पक्षाच्या धोरणांविरुद्ध जात सत्ता राखण्यासाठी परस्परविरोधी विचारधारा असलेल्या पक्षांसोबत हातमिळवणी केल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक नेत्यांना चांगलेच खडसावले आहे. युती तोडण्याचे निर्देश देत स्थानिक आमदाराला नोटीस पाठविली आहे. दुसरीकडे काँग्रेसनेही १२ नगरसेवकांना निलंबित केले.



मागील महिन्यात झालेल्या नगर परिषद आणि नगरपालिका निवडणुकांनंतर अंबरनाथ येथे भाजपाच्या स्थानिक नेत्यांनी शिवसेनेला डावलून काँग्रेससोबत घरोबा केला तर अकोला जिल्ह्यातील अकोट येथे 'अकोट विकास मंच' या नावाने आघाडी स्थापन करीत त्यात एमआयएमला स्थान दिले. दोन्ही ठिकाणच्या राजकीय घडामोडींवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संतप्त झाले आणि भाजपाच्या स्थानिक नेत्यांना फटकारत कठोर कारवाईचा इशारा दिला. अशा प्रकारच्या व्यवस्थेला पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाने मंजुरी दिलेली नाही. त्या शिस्तीचे उल्लंघन करणाऱ्या आहेत, असे फडणवीस यांनी जाहीर केले.

काँग्रेस किंवा एमआयएमसोबत कोणतीही युती स्वीकारली जाणार नाही, हे मी स्पष्ट करीत आहे. जर कोणत्याही स्थानिक नेत्याने स्वतःहून असा निर्णय घेतला असेल, तर शिस्तीच्या दृष्टीने ते चुकीचे आहे आणि त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीला सांगितले. अशा युती तोडण्याबाबत आधीच सूचना देण्यात आल्या होत्या, असेही त्यांनी स्पष्ट केले.

डिसेंबरमधील निवडणुकांमध्ये काही नगरपालिकांमध्ये त्रिशंकू स्थिती निर्माण झाली. या संधीचा फायदा घेत भाजपाने अंबरनाथ नगरपालिकेत सत्ता वाटून घेण्यासाठी प्रतिस्पर्धी काँग्रेस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत निवडणुकीनंतर आघाडी स्थापन केली. या आघाडीला 'अंबरनाथ विकास आघाडी' असे नाव देण्यात आले. त्याचप्रमाणे भिन्न विचारसरणी असलेल्या भाजपा आणि एमआयएम या पक्षांनी हातमिळवणी केल्याची अकोट नगर परिषदेत अकल्पनीय घटना घडली. दरम्यान, एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी अकोट येथील प्रकार खपवून घेतले जाणार नसून अकोटचे स्थानिक नेते युसूफ अंसारी यांनी नोटीस बजावत लेखी खुलासा मागविला. तसेच आघाडीतून बाहेर पडण्याचे निर्देश दिल्याचे सांगितले. काँग्रेसनेही अंबरनाथ येथील १२ नगरसेवकांना निलंबित केले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### आमदार भारसाकळे यांना नोटीस

अकोट प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आ. प्रकाश भारसाकळे यांना पत्र देत, एमआयएमसोबत युती करून भाजपाच्या ध्येयधोरणांना सुरुंग लावला आहे. कुणालाही विचारात न घेता युती करण्याची आपली कृती पक्षाची प्रतिमा मलिन करणारी आहे, असे म्हणत आपणावर कारवाई का करण्यात येऊ नये, याचा खुलासा सादर करण्यास सांगितले आहे.

### शिवसेनेकडून जोरदार टीका

अंबरनाथ नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपाच्या तेजश्री करंजुळे विजयी झाल्या तर सर्वात जास्त २२ नगरसेवक शिवसेनेचे निवडून आले. भाजपा १४ तर काँग्रेसने १२ जागा जिंकल्या. शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी भाजपाने काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेतले होते. या आघाडीनंतर शिवसेनेने भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली आहे.

# धक्कादायक : मुलानेच केली वडिलांची हत्या

## ● शहरातील जुना विडी घरकुल परिसरातील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

घरातील दैनंदिन देखभालीच्या कारणावरून झालेल्या वादातून मुलानेच वडिलांची हत्या केल्याची धक्कादायक घटना जुना विडी घरकुल परिसरात घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात मुला विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळी साडेआठच्या सुमारास न्यू शिवाजी नगर, गोंधळे वस्ती, जुना विडी घरकुल, सोलापूर येथे घडली. येथील न्यू शिवाजीनगर, गोंधळे वस्ती भागात राहणारे नंदकुमार पांडुरंग गायकवाड वय ५५ यांची त्यांच्या स्वतः च्या मुलाने मनोज उर्फ बाळू नंदकुमार गायकवाड वय ३८ याने निर्घृण मारहाण करून हत्या केली.



घरातील रोजच्या कामांबाबत, खाणे-पिणे, टॉयलेट - बाथरूमची देखभाल आणि सायंकाळच्या स्वयंपाकाच्या मुद्द्यावरून वडील-मुलामध्ये तीव्र वाद झाला. चिडून गेलेल्या मुलाने घरात उपलब्ध असलेल्या लोखंडी पाईपने वडिलांच्या उजव्या हाताच्या कोपऱ्यावर आणि इतर अवघड जागी जोरदार वार केले. या मारहाणीमुळे नंदकुमार गायकवाड हे जागीच गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच नंदकुमार यांच्या पत्नी अरुणा नंदकुमार गायकवाड वय ६०, रा. घर क्र. ५१, भारत नगर, कुमठा नाका, सोलापूर यांनी रात्री साडेदहाच्या सुमारास एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, मुलाने वडिलांना मारहाण करून ठार मारले असल्याचे नमूद केले. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी नंदकुमार यांना सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आरोपी मनोज उर्फ बाळू नंदकुमार गायकवाड रा. न्यू शिवाजीनगर, गोंधळे वस्ती, जुना विडी घरकुल, सोलापूर यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली. तपास सहायक पोलीस निरीक्षक मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## महत्त्वाचे

### निर्देशांकात घसरण तरीही गुंतवणूकदारांची चांदी

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशी मंदीचे वातावरण होते. बुधवारी बऱ्याच चढ-उतारानंतर निर्देशांक आणि निफ्टीत दिवसअखेरीस घसरण नोंदविण्यात आली. जागतिक पातळीवर असणारा तणाव आणि परकीय गुंतवणूकदारांनी सतत शेअर्स विक्री करणे यामुळे बाजारात उत्साह संचारला नाही. मात्र, निर्देशांक कोसळलेला असतानाही ब्रॉडर मार्केटमधील तेजीमुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीत २५ हजार कोटी रुपयांची भर पडली. निर्देशांक १०२ अंकांनी घसरून ८४,९६१ वर बंद झाला तर निफ्टीत ३७ अंकांची घट झाली. दिवसभरात आयटी, फार्मा आणि ग्राहकी वस्तू शेअर्समध्ये चांगली खरेदी दिसून आली. तेल कंपन्या, बांधकाम क्षेत्रात मंदी होती.

# भटके श्वान अपघातासाठी कारणीभूत

## ● सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी ● रस्ते मोकळे ठेवावेच लागणार



◆ **नवी दिल्ली, ७ जानेवारी**

भटके श्वान केवळ चावतात असे नाही, तर ते गंभीर अपघातांनाही कारणीभूत ठरतात. रस्ते भटक्या श्वानांपासून मोकळे ठेवावे लागतील अशी टिप्पणी बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने केली. यावेळी न्यायालयाने पीडित, प्राणिप्रेमी आणि श्वानांना हटविण्यासाठी विरोध करणाऱ्या सर्व पक्षकारांची बाजू ऐकून घेतली.

याचिकाकर्ते, प्राणी कल्याण संस्था आणि हस्तक्षेपकर्त्यांच्या युक्तिवादानंतर सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांच्या प्रकरणावरील पुढील सुनावणी गुरुवारपर्यंत तहकूब केली. वर्तमानपत्रातील अहवालाची दखल घेत न्यायालयाने भटक्या श्वानासंदर्भातील याचिका स्वतःहून दाखल करून घेतली. ८ जुलै २०२५ पासून या प्रकरणावर आतापर्यंत पाच वेळा सुनावणी झाली. न्या. विक्रम नाथ आणि न्या. संजय मेहता आणि न्या. एन.व्ही. अंजारिया यांच्या न्यायासनाने सुनावणी घेतली. सर्व पक्षकारांची बाजू ऐकल्यानंतर न्यायासन म्हणाले, प्रश्न केवळ

## आता महामार्गांवरही मिळणार मोबाइल 'नेटवर्क'!

**नवी दिल्ली :** देशातील राष्ट्रीय महामार्गांवरून प्रवास करताना अनेकदा मोबाइल नेटवर्क गायब होण्याच्या समस्येमुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. ही समस्या दूर करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणानआता कंबर कसली आहे. महामार्गावरील एकूण १,७५० किलोमीटर अंतराच्या अशा ४२४ जागा चिन्हांकित करण्यात आल्या आहेत, जिथे मोबाइल नेटवर्क अजिबात उपलब्ध नाही. या 'ब्लॅक स्पॉट्स'मध्ये तातडीने सुधारणा करण्यासाठी 'एनएचएआय'ने दूरसंचार विभाग आणि 'ट्राय'कडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. केवळ नेटवर्क सुधारणेच नव्हे, तर ज्या ठिकाणी अपघात होण्याचे प्रमाण जास्त आहे किंवा जिथे मोकाट जनावरांचा वावर अधिक आहे, अशा क्षेत्रात प्रवेश करण्यापूर्वीच प्रवाशांच्या मोबाइलवर 'फ्लॅश एसएमएस' पाठवण्याच्या सूचना 'ट्राय'ला देण्यात आल्या आहेत.

## हर्षवर्धन सपकाळांना मानसिक उपचाराची गरज

### महसूल मंत्री बावनकुळेंची टीका

**अमरावती :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची नगर पालिका निवडणुकीतील कामगिरी बघता त्यांचे प्रदेशाध्यक्ष पद जाण्याची शक्यता आहे. पद वाचविण्यासाठी ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरुद्ध बोलत असतात. त्यांना मानसिक उपचाराची गरज आहे, अशी टीका महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. यापुढे सपकाळ जिथे कुठे अशा प्रकारचे वक्तव्य करतील त्या जिल्ह्यातील भाजपाचे कार्यकर्ते त्याची दखल घेतील, असा इशाराही त्यांनी दिला. महापालिका निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर भारतीय जनता पक्षाचा वचननामा आज पत्रकार परिषदेत प्रसिद्ध करण्यात आला. त्यावेळी बावनकुळे बोलत होते. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सकाळी पत्रकार परिषदेतून, मुख्यमंत्री फडणवीस आता देवाभाऊ नाही टक्काभाऊ झाले आहेत, असा आरोप केला होता. त्याला महसूल मंत्र्यांनी प्रत्युत्तर दिले. सपकाळ यांच्या कार्यकाळात काँग्रेसची सर्वच ठीकाणी अधोगती होत आहे. नगर पालिका निवडणुकीत हा पक्ष सिंगल डिजिटवर आला आहे, अशी टीका त्यांनी केली.



# जीडीपी ७.४ टक्के दराने वाढणार

◆ **नवी दिल्ली, ७ जानेवारी**

उत्पादन आणि सेवा क्षेत्रांच्या दमदार कामगिरीमुळे भारतीय अर्थव्यवस्था २०२५-२६ मध्ये ७.४ टक्के दराने वाढण्याची शक्यता आहे, असे बुधवारी प्रसिद्ध झालेल्या सरकारी आकडेवारीत म्हटले आहे. ही टक्केवारी मागील आर्थिक वर्षातील ६.५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे.

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने जारी केलेल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या पहिल्या आगाऊ अंदाजानुसार, उत्पादन आणि बांधकाम क्षेत्रात ७ टक्के वाढीचा दर अपेक्षित आहे. सेवा क्षेत्रातील जोरदार वाढ हा आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये अंदाजे ७.३ वास्तविक सकल मूल्यवर्धन वाढीच्या दरातील एक प्रमुख चालक घटक असल्याचे दिसून आले, असे मंत्रालयाने म्हटले.



३१ मार्च रोजी संपणाऱ्या चालू आर्थिक वर्षात कृषी आणि संलग्न तसेच वीज, वायू, पाणीपुरवठा आणि इतर उपयुक्त सेवांच्या क्षेत्रामध्ये मध्यम वाढीचा दर अपेक्षित आहे. नाममात्र सकल देशांतर्गत उत्पादन किंवा सध्याच्या किमतींनुसार जीडीपीमध्ये २०२५-२६ या वर्षात ८ टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे. १ फेब्रुवारी रोजी सादर होणाऱ्या केंद्रीय अर्थसंकल्पाच्या तयारीसाठी आगाऊ अंदाजाच्या आकडेवारीचा वापर केला जातो. ◂(वृत्तसंस्था)

## झोमॅटोला ३.७ कोटींची जीएसटी नोटीस

**नवी दिल्ली :** फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्म झोमॅटो आणि क्विक कॉमर्स सेवा ब्लिंकिटची मूळ कंपनी इटरनलच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. पश्चिम बंगालच्या वस्तू आणि सेवा कर विभागाने कंपनीला ३.७ कोटींचा मागणी आदेश पाठवला आहे. हे प्रकरण आर्थिक वर्ष २०१९-२० दरम्यान कर भरण्यात झालेल्या कमीशी संबंधित आहे. कंपनीने मंगळवारी संध्याकाळी शेअर बाजाराला दिलेल्या माहितीत या नोटिसीची पुष्टी केली आहे.

## चांदी २.४६ लाखांच्या सर्वकालीन उच्चांकावर

**नवी दिल्ली :** चांदीचे दर बुधवारी विक्रमी उच्चांकावर पोहोचले आहेत. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशननुसार, २,८९४ रुपयांनी वाढून २,४६,०४४ रुपये प्रति किलोवर पोहोचले आहेत. यापूर्वी काल ते २,४३,१५० रुपयांवर होते. तर चांदीच्या दरात घसरण झाली आहे. १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा भाव ४५ रुपयांनी घसरून १,३६,६१५ रुपयांवर आला आहे.




# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या सभेमुळे भाजपाच्या '७५ पार'ला मजबूती

## १० जानेवारीला हरिभाई प्रशालेच्या मैदानावर आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १० जानेवारी रोजी सोलापूर दौऱ्यावर आहेत. हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर शनिवारी दुपारी १२.३० वाजता सभा होणार आहे.

२०१७ साली झालेल्या सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाला यश मिळाले होते. यंदाच्या निवडणुकीतही भारतीय जनता पार्टीने शतप्रतिशत भाजपसाठी प्रयत्न सुरू केले असून, सोलापूर महानगरपालिकेच्या सर्व २६ प्रभागातून १०२ उमेदवार दिले आहेत. या उमेदवारांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जाहीर सभा घेणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोलापूरला सभा होणार असल्यामुळे भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे. या सभेच्या तयारीसाठी भाजपाची संपूर्ण यंत्रणा कामाला लागली असून भाजपाचे पदाधिकारी,



कार्यकर्ते यांच्याकडून सभेचा प्रसार घरोघरी जाऊन केला जात आहे. या सभेला सोलापूरकर मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहणार आहेत. हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या जाहीर सभेसाठी मंडप उभारण्याची तयारी सुरू आहे. या सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय बोलणार याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे. या सभेस भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते आणि सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपच्या शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी केले आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस काय घोषणा करणार?

विकसित भारत, विकसित महाराष्ट्रासाठी विकसित सोलापूरची भारतीय जनता पार्टीला नितांत गरज असून, यासाठी सोलापूरच्या तमाम नागरिकांनी भाजपाच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे आणि भाजपाच्या सर्व उमेदवारांना बहुमताने निवडून द्यावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नुकतेच केले होते; आता त्यांच्या पाठोपाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही सोलापुरात येत असून, मुख्यमंत्री फडणवीस सोलापूरकरांसाठी काय-काय घोषणा करणार? याची उत्सुकता सोलापूरकरांना लागली आहे.

# बंद, बॅरिगेट याला हवा बंदोबस्ताचा पर्याय!

**निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रात्री १० वाजता सर्व बंद**

**प्रसंगानुरूप रस्ते बॅरिगेटने बंद ऐवजी बंदोबस्तात वाहतूक का नाही?**

**सर्वकाही सुरु ठेवून बंदोबस्त कायदा-सुव्यवस्था राखणेच खरे पोलिसिंग**

**गरजूंनी रात्री दहानंतर उपाशी रहायचे का?**

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. ७ जानेवारी–**

**उत्सवप्रिय शहर असल्यामुळे सोलापूरच्या पोलिसांवर बंदोबस्ताचा बारमाही ताण असतो हे नाकारता येणार नाही, परंतु प्रत्येकवेळी बॅरिगेट लावून रस्ते बंद करणे, रात्री दहानंतर सर्व आस्थापना बंद करणे हा पर्याय शोधणे म्हणजे कर्तव्य आहे का? असा प्रश्न सूज्ञ सोलापूरकर उपस्थित करीत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहर रात्री दहानंतर बंद केल्यामुळे अनेक गरजूंनी गैरसोय होत असल्याचे दिसून येते. सोलापुरात परगावाहून येणाऱ्या बहुतांश रेल्वे गाड्या या रात्री दहानंतर येतात. तर रात्रीच्या एसटी, ट्रॅव्हल्स बसने प्रवास करणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. एखाद्या पर्यटक कुटुंबाला रात्री दहानंतर भूक भागविणे अपरिहार्य असेल तर त्यांनी काय करायचे असा गंभीर प्रश्न उपस्थित होतो आहे. वास्तविक पाहता कर्तव्यदक्ष पोलिसांनी रात्रीच्या बंदऐवजी चोख पोलिस बंदोबस्त लावून काही ठराविक भागातील आस्थापना तरी खुल्या राहतील, असे नियोजन केल्यास अनेकांना दिलासा मिळेल. महापालिकेसमोरील प्रमुख रहदारीचा रस्ता बॅरिगेट टाकून दुतर्फा बंद करण्यात आला होता. यापेक्षा थोडासा बंदोबस्त वाढवून पालिकेसमोरील एकेरी वाहतूक सुरु होवू शकते. मनपाच्या मागील रस्त्याने एकेरी तर नार्थकोट–होममैदानच्या मधील रस्त्याने एकेरी वाहतूक सुरु ठेवल्यास वाहनचालकांना वळसा घालून आणि वाहतूक जामच्या समस्येला तोंड द्यावे लागणार नाही. घोळक्यांनी उभारून वाहनांची तपासणी करणारे पोलिस काही दिवस बंदोबस्तासाठी लावल्यास नागरिकांचा त्रास कमी होईल, असे काही तज्ञ सूचवत आहेत.**



संग्रहित फोटो




सोलापुरात वर्षभर अनेक उत्सव आणि मिरवणुका असतात त्यामुळे पोलिसांवर सातत्याने बंदोबस्ताचा ताण असतो. मिरवणुकांच्या प्रसंगी रस्ते बॅरिगेट लावून बंद केल्यानंतर वाहनधारक निमूटपणे लांबून, अडचणीचा असेल तरी पर्यायी मार्गाचा अवलंब करतात. एरव्ही देखील शहरात वाहतूकीच्या समस्या कायम असतात, रत्याच्या कडेला नाही तर जवळपास रस्त्याचा काही भाग व्यापून शहरात फळविक्रेते, भाजी विक्रेते यांच्या अनेक फेरीवाले अतिक्रमण करून अपघातांना निमंत्रण देताना दिसतात. विजापूर रोड, होटगी रोड, जुळे सोलापूर, डी-मार्ट ही काही प्रमुख उदाहरणे बोलकी आहेत. याव्यतिरिक्त शहरातील असे प्रकार शेकडोंनी आहेत. स्टेशन, एसटी स्थानक, मधला मारूती, विजापूर वेस, सातरस्ता, लकी चौक दत्त चौक समाचार चौक आदी प्रमुख ठिकाणी कायम वाहतूक जाम दिसते. याठिकाणी एखादा वाहतूक शाखेचा पोलिस कर्तव्यावर दिसतो.

वास्तविकता पाहता आयुक्तालयाने किमान वाहतूक शाखेच्या पोलिसांना तर ड्यूटीवर असताना मोबाईल पाहणे बंद केल्यास वाहतुक जामवर काही तरी आळा घालणे शक्य होईल, अशी स्थिती आहे. वाहनचालकांचे लायसन्स तपासणे, वाहनचालकांकडून वाहतुकीच्या नियमांचे पालन होते का नाही हे पाहणे योग्य पण घोळक्यांनी उभारून वाहनचालकांना टार्गेट करणे योग्य आहे का? नियम मोडणाऱ्यांवर कारवाई गरजेची आहे, पण हे करीत असताना वाहतूक शाखा ही महसूल गोळा करणारी नसून शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी आहे याचीही खबरदारी घेणे गरजेचे आहे. प्रत्येक समस्येवर उपाय गरजेचा आहे पण तो उपाय लोकांना त्रास होईल असा नसला पाहिजे. रात्री दहानंतर परमीट रूम, वाईन शॉप, बिअर शॉपी, चायनीजसह खाद्य पदार्थांच्या गाड्या हे बंद झाल्यास सामान्यांना त्रास होत नाही. पण स्टेशन, स्टँडसह काही ठिकाणी बेकरी, दूध डेअरी, छोटी रेस्टारन्ट तरी सुरु ठेवल्यास गरजूंना भूक भागवता येवू शकते. ज्या ठिकाणी वादग्रस्त परिसर, एरिया आहेत अशा ठिकाणी सर्व बंद असल्यासही काही फरक पडत नाही.

प्रमुख रस्ता बॅरिगेटने बंद करून चार-सहा पोलिस बंदोस्ताला लावण्यापेक्षा बंदोबस्ताचे पोलिस वाढवून किमान एकेरी वाहतूक तरी सुरु ठेवल्यास वाहनधानकांची सोय होणार आहे. पोलिस आयुक्त संवेदनशील आणि कर्तव्यदक्ष असल्यामुळे निश्चितच ते सोलापूरकरांच्या भावना समजून सकारात्मक उपाययोजना करतील, यात शंका नाही.

शहरातील अनेक इमारतींमधील पार्किंगच्या जागा कमर्शियल वापरात असल्याने वाहने रस्त्यावर लावण्याचे प्रकार सर्रास आहेत. याठिकाणी नो-पोर्किंग कारवाई तसेच संबंधित दोषी इमारत मालकांवर कारवाई गरजेची आहे. ही कारवाई तसेच रस्त्यावरील फेरीवाल्याचे अतिक्रमण यावरील कारवाई पोलिस व मनपा प्रशासनाने संयुक्त केल्यास परिणामकारक होईल. परंतु असे होताना कधीच दिसत नाही. निवडणुकांचे रण सुरु असताना कोणत्याही पक्षाच्या प्रचारात पुढील समस्यांबाबत चकार शब्दही दिसत नाही. शहरातील बेशिस्त वाहतूक, अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे, रस्ते रुंदीकरण, फुटपाथवरील अतिक्रमण, वाहतुक जाममुळे होणाऱ्या समस्या, एसटी स्थानिक व रेल्वे स्टेशन परिसर वाहतूक जामच्या समस्येतून मोकळा श्वास घेईल, अशा उपाययोजना करण्याचे सूतोवाच कुठेही प्रचारसभेत, जाहीरनाम्यात दिसत नाही. शहरातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यां मध्ये जुनी घरे पाडून बहुमजली घरे बांधण्याचे प्रकार सर्रास सुरु आहेत. हे करीत असताना महापालिकेचे नियम धाब्यावर बसविण्यात येत आहेत. बांधकाम परवान्यानुसार ठेवायच्या मोकळ्या जागेत देखील बांधकामे होत आहेत. घराच्या अंगणात अनधिकृत बांधकामे, दुकाने झाली आहेत. स्वच्छ सोलापूर, सुंदर सोलापूर, अतिक्रमणमुक्त सोलापूर, अनधिकृत बांधकाम मुक्त सोलापूर, वाहतूकजाममुक्त सोलापूर, सिग्नलयुक्त सोलापूर, दुर्गंधी मुक्त सोलापूर याबाबत महापालिकेच्या निवडणुकीत उतरलेल्या सर्वच राजकीय पक्षांनी किमान मतदारांना तरी आश्वासित करणे गरजेचे आहे.

**आरटीओने स्मार्ट कार्ड दिले पण कार्ड रिडर आहे कुठे? :** आरटीओ कार्यालयाकडून अनेक वर्षांपासून ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी कार्ड हे स्मार्ट कार्ड स्वरूपात दिले जाते. त्यावरील कोड स्कॅन करून ड्रायव्हिंग लायसन्सधारकाचे रेकॉर्ड तपासणे अपेक्षित आहे. परंतु शहरातील एकाही वाहतूक पोलिसाकडे लायसन्स स्मार्ट कार्ड चेक करण्यासाठीचे कार्ड रिडर दिसत नाही. मग लोकांकडून शेकडो रुपये घेवून आरटीओकडून स्मार्ट कार्ड देण्याचा उद्देश काय हे स्पष्ट होत नाही. आता तर स्मार्ट कार्ड डिलिव्हरीसाठीचे जार्जेस आरटीओ वाढविणार असल्याचे सांगण्यात येते. जर का ड्रॉयव्हिंग लायसन्स कार्ड, वाहन नोंदणी कार्ड तपासण्याचे कार्ड रिडरच जर का उपलब्ध नसतील तर मग नागरिकांना नाहक भुर्दंड का सोसावा लागतो हा प्रश्न आहे. वाहनांना अत्याधुनिक नंबर प्लेट बसविणे सक्तीचे केले ते शेकडो रुपये खर्चून लोक या नियमाचे पालन करतात म्हणजे सरकारनेचे लोकांना लुटायचे धोरण तर आखले नाही ना, असे सामान्य लोक विचारत आहेत.

**तर सोलापूरकर पोलिसांचे ऋणी राहतील... :** पोलिस आयुक्तालयाने रात्री दहानंतर सरसकट सर्व बंद ऐवजी लोकोपयोगी जीवनावश्यक वस्तूंची दुकाने तरी किमान रात्री ११ वाजेपर्यंत सुरु ठेवावीत. जिथे अडचण तेथील रस्ते बॅरिगेट टाकून पूर्णपणे बंद करण्याऐवजी एकेरी वाहतूक सुरु ठेवावी. यासाठी पोलिसांनी काही प्रमाणात बंदोबस्त वाढवून हे करणे शक्य आहे. परंतु लोकांच्या सोयीचे प्रर्याय देण्याऐवजी बंद हा सोयीचा मार्ग स्वीकारणे आणि कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवल्याचे दर्शविणे म्हणजे लोकांसाठी तोंड दाबून बुक्याचा मार होईल. पोलिसिंग नागरिकांच्या सोयीचे झाल्यास लोक पोलिसांच्या ऋणात राहतील, हे मात्र नक्की होय.

# ‘ओपन’साठी गुणवत्ता हीच अट

**• सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय • आरक्षित वर्गातील उमेदवाराला वगळता येणार नाही**

**◆ नवी दिल्ली, ७ जानेवारी**

खुल्या प्रवर्गातून शासकीय नोकरभरती ही जातीऐवजी गुणवत्तेवर आधारित आहे. जर राखीव प्रवर्गातील उमेदवाराने कोणत्याही सवलतीशिवाय सामान्य प्रवर्गातील उमेदवारापेक्षा अधिक गुण मिळवले, तर त्याचा खुल्या प्रवर्गातून विचार केला जाईल असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराने कोणतीही सवलत न घेता गुणवत्तेच्या जोरावर यश मिळवले असल्यास, तो खुल्या प्रवर्गात समाविष्ट होऊ शकतो; मात्र निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर



सवलत घेतली असल्यास, त्याला खुल्या प्रवर्गाच्या जागेवर दावा करता येणार नाही असेही न्यायालयाने नमूद केले.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की खुला किंवा सामान्य श्रेणी ही जात किंवा वर्गाशी संबंधित नाही, ती सर्वांसाठी खुली आहे. जर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, एमबीसी किंवा ईडब्ल्यूएस श्रेणीतील उमेदवाराने कोणत्याही सवलतीशिवाय सामान्य श्रेणीतील उमेदवारापेक्षा चांगली कामगिरी केली तर त्यांना सामान्य यादीत समाविष्ट केले जाईल आणि त्यांना राखीव श्रेणीपुरते मर्यादित ठेवले जाणार नाही. शासकीय नोकरभरतीत अनेकदा असे आढळून आले, की राखीव प्रवर्गासाठीचा कट-ऑफ सामान्य श्रेणीपेक्षा जास्त असतो. अशा परिस्थितीत, आरक्षित श्रेणीतील उमेदवाराने सवलतीचा लाभ न घेतल्यास त्याला सामान्य श्रेणीत समाविष्ट करता येईल. सामान्य, खुला किंवा अनारक्षित या संज्ञांचा अर्थ सर्वांसाठी खुला आहे. ते कोणत्याही विशिष्ट जाती, वर्ग किंवा लिंगासाठी राखीव नाही. खुल्या प्रवर्गात समावेश करण्याची एकमेव अट म्हणजे गुणवत्ता हीच आहे. या प्रवर्गात उमेदवार कोणत्या श्रेणीचा आहे याचा विचार केला जाणार नाही.

### दुहेरी लाभाचा युक्तिवाद फेटाळला

आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराने खुल्या प्रवर्गातून नोकरभरतीसाठी अर्ज केल्याने त्याला आरक्षणाचा आणि खुल्या श्रेणीचा असा दुहेरी लाभ मिळेल असा दावा सरकारी पक्षाने केला. मात्र न्यायालयाने हा दावा फेटाळत म्हटले की, जर कोणतीही सवलत मिळाली नसेल तर हा अतिरिक्त लाभ नाही. आरक्षण श्रेणीत येणाऱ्या उमेदवाराने आरक्षणाचा लाभ न घेता खुल्या प्रवर्गातून येण्याची इच्छा व्यक्त केल्यास तो नोकरीसाठी पात्र असतो, त्याला नाकारता येणार नाही. ■

### दुहेरी लाभाचा युक्तिवाद फेटाळला

आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराने खुल्या प्रवर्गातून नोकरभरतीसाठी अर्ज केल्याने त्याला आरक्षणाचा आणि खुल्या श्रेणीचा असा दुहेरी लाभ मिळेल असा दावा सरकारी पक्षाने केला. मात्र न्यायालयाने हा दावा फेटाळत म्हटले की, जर कोणतीही सवलत मिळाली नसेल तर हा अतिरिक्त लाभ नाही. आरक्षण श्रेणीत येणाऱ्या उमेदवाराने आरक्षणाचा लाभ न घेता खुल्या प्रवर्गातून येण्याची इच्छा व्यक्त केल्यास तो नोकरीसाठी पात्र असतो, त्याला नाकारता येणार नाही. ■

निर्णय देताना न्यायालयाने इंद्रा साहनी प्रकरण आणि सौरव यादव प्रकरणाचा दाखला दिला.

◀(वृत्तसंस्था)

### न्यायालयाच्या निर्णयातील प्रमुख मुद्दे

- सामान्य श्रेणी ही कोणत्याही एका श्रेणीसाठी विशिष्ट श्रेणी नाही, तर एक गुणवत्ता श्रेणी आहे.
- जर राखीव प्रवर्गातील उमेदवाराने सवलत न घेता सामान्य कट-ऑफ उत्तीर्ण केला तर तो सामान्य जागेसाठी पात्र ठरेल.
- हा प्रकार सामान्य उमेदवारांचे अधिकार हिरावून घेत नाही, तर गुणवत्तेच्या नियमाला बळकटी देते. ■

# प्रतोदांना मंत्रिपदाचा दर्जा

**शासन निर्णय जारी • वेतन, भत्ते किंवा इतर सुविधा नाहीत**

**◆ मुंबई, ७ जानेवारी**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील मुख्य प्रतोद आणि प्रतोदांना आता राजशिष्टाचारापुरता मंत्री आणि राज्यमंत्रीपदाचा दर्जा देण्यात आला आहे. याबाबत राज्य सरकारने नवा शासन निर्णय जारी केला आहे.

महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (अपात्रता दूर करणे) अधिनियम, १९५६ मध्ये २०१७ साली करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार विधानमंडळातील मुख्य प्रतोद आणि प्रतोद ही पदे अधिकृतपणे अधिनियमाच्या अनुसूचीत समाविष्ट करण्यात आली होती. त्यानंतर या पदांवरील सदस्यांना कोणत्या सुविधा द्याव्यात, याबाबत शासन स्तरावर विचार सुरू होता. त्याच पृष्ठभूमीवर हा नवा निर्णय घेण्यात आला आहे. संसदीय कार्य विभागाकडून ७ जानेवारी २०२६ रोजी काढण्यात आलेल्या या शासन निर्णयानुसार, यापूर्वी २०१८ आणि २०२१ मध्ये जारी करण्यात आलेले आदेश रद्द करून नवीन नियमावली लागू करण्यात आली असल्याचे नमूद केले आहे.

◀(तभा वृत्तसेवा)

### कोणाला मिळणार सुविधा?

विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांत सरकार स्थापन करणाऱ्या पक्षांना प्रत्येकी एक मुख्य प्रतोद आणि एक प्रतोद यांना सुविधा मिळणार आहेत. याशिवाय, सरकारमध्ये नसलेल्या पण एकूण सदस्यसंख्येच्या किमान १० टक्के सदस्य असलेल्या पक्षांनाही प्रत्येकी एक मुख्य प्रतोद आणि एक प्रतोद यांना या सुविधा लागू राहतील ■

# चारित्र्यावर संशय घेत विवाहितेचा छळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जानेवारी-**

शहरातील सदर बझार पोलीस ठाण्यात विवाहितेचा छळ व मारहाण प्रकरणी पतीसह चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत अनुषा अमोल मोरेश्वर वय २९, रा. जयभवानी नगर, मंजरेवाडी, सोलापूर यांनी तक्रार दिली आहे..




दि. १ जानेवारी २०२२ ते २४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत सासरी संत तुकाराम चौक, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर येथे नांदत असताना पती अमोल, सासू सुमन, नंद हेमलता व सुवर्णा यांनी फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेत मानसिक व शारीरिक छळ केला. तसेच व्यवसायासाठी माहेरहून दहा लाख रुपये घेऊन ये, अशी मागणी करत मारहाण व शिवीगाळ करण्यात आली. यावेळी जीवे मारण्याची धमकीही देण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपास हवालदार कांबळे करीत आहेत.

# सोलापूर, धाराशिवमधून नितीन ढाले तडीपार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जानेवारी-**

मुस्लिम पाच्छा पेठ, कमेला बिफ मार्केट परिसरात राहणाऱ्या नितीन सुभाष ढाले वय ३० वर्षे यास सोलापूर शहरासह उर्वरित सोलापूर जिल्हा व धाराशीव जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले.




नितीन ढाले याच्याविरोधात सन २००९, २०१९, २०२०, २०२१, २०२३ व २०२५ या वर्षांमध्ये सामान्य नागरिकांना मारहाण करणे, दमदाटी करणे, अवैधरित्या गांजाची विक्री करणे, गांजाच्या पैशाच्या जोरावर टोळ्या जमवून दहशत निर्माण करणे तसेच चोरीसारख्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची नोंद आहे. या पार्श्वभूमीवर जेलरोड पोलीस ठाण्याच्या वतीने महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांच्याकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाची सखोल चौकशी करून पोलीस उप-आयुक्त विजय कबाडे यांनी दि. ०५ जानेवारी रोजी नितीन सुभाष ढाले यास दोन वर्षांसाठी सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून तडीपार करण्याचा आदेश दिला आहे.



# पत्रकारिता समाजाला दिशा देण्याचे एक माध्यम : शेडगे

**नरखेड, दि.७ जानेवारी-**

पत्रकारिता समाजाला दिशा देण्याचे एक माध्यम असून, लोकशाहीचा चतुर्थ महत्त्वाचा स्तंभ आहे. शासन व प्रशासनावर अंकुश ठेवण्याचे माध्यम म्हणून पत्रकारितेकडे पाहिले जात असून, समाज सुधारण्यासाठी वर्तमानपत्र गरजेचे असल्याचे प्रतिपादन मोहोळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी केले. मोहोळ पोल्स स्टेशनतर्फे पत्रकार दिनानिमित्त आयोजीत कार्यक्रमात श्री. शेडगे बोलत होते. श्री. शेडगे यांच्या हस्ते मोहोळ तालुका ग्रामीण पत्रकार संघातील पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान नगराध्यक्षा सिद्धी वस्त्रे, भाजपा गटनेते सतीश काळे तसेच कॉंग्रेस समितीतर्फेही पत्रकारांचा सतक्रा झाला. यावेळी किशोर पवार, अंजली मोहिते, अंजली वस्त्रे व बिरा खांडेकर, अधीक्षक प्रियंका गोरे, अमित लोमटे, अमोल, हर्षल माने उपस्थित होते. अध्यक्ष नसीर मोमीन, श्रीधर उन्हाळे, सोमनाथ मुसांडे, हनुमंत पवार, रफिक शेख, दिनेश सातपुते, राजू साखरे, अशोक कांबळे, रजनीश कसबे, सचिन दळवे, सचिन गवळी, गजानन माळी, अमोल नाईकवाडी, विजय पुजारी, सुनील गायकवाड, सुशील वाघमारे, नागेश देशपांडे, दिनेश सातपुते, गणेश चौगुले, दत्ता मिसाळ, भैय्यासाहेब कांबळे, अमोल महामुनी, अमोल काळे आदी पत्रकार उपस्थित होते.

# दयानंद बिडवे यांना स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्त करण्याची मागणी

**अक्कलकोट, दि.७ जानेवारी-**

भाजपाचे एकनिष्ठ कार्यकर्ता दयानंद बिडवे हे शांत, संयमी व मितभाषी अजात शत्रू असलेले कार्यकर्ते आहेत. गेल्या ३५ वर्षांपासून भाजपात काम करत असले तरी त्यांनी पक्षाच्या हितासाठीच काम केलेले आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी कधी काम केलेले नाही. म्हणून त्यांना स्वीकृत नगरसेवक पदी निवड करण्याची मागणी सर्वस्थरातून होत आहे. भारतीय जनता पक्षाचे हाडाचे कार्यकर्ते दयानंद बिडवे यांना स्वीकृत नगरसेवक पदी निवड करण्याबाबत व्यापारी महासंघाचे अध्यक्ष मल्लिनाथ साखरे, सुवर्णकार संघटना अध्यक्ष अनिल वेदपाठक,शिवसमर्थ संघटना सह शहरातील प्रतिष्टीत नागरिकांनी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्याकडे साकडे घातले आहे.



## निधन वृत्त...

### सिद्धेश्वर देशमुख

**अकलूज, दि. ७ जानेवारी -**

लिंगायत समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक शिवशंभू लॉटरी सेंटरचे सिद्धेश्वर गणपत देशमुख (वय:६५) यांचे आज बुधवार ता.७रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा व ३ विवाहित मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. इंदापूर नगर परिषदेचे अभियंता प्रसाद देशमुख व अकलूज उपजिल्हा रुणालयातील डॉ. रेश्मा देशमुख/सरताळे यांचे ते वडील होत.





निवडणूक संपल्यानंतर सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होतील, तर रोहित पवार राज्याच्या मंत्रिमंडळात दिसतील. पवार कुटुंब कधीच वेगळे नव्हते आणि नाहीत, हे माझे भविष्य लवकरच खरे ठरेल.
**लक्ष्मण हाके**, ओबीसी नेते

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
गुरुवार, ८ जानेवारी २०२६ 

आता महापालिकेच्या निवडणुकीत देखील प्रचंड पाऊस पडेल. डोहात बुडून जाईल इतका पाऊस पडणार आहे. पण यावेळी लोकांनी खंबीरपणे या पावसात उभे राहावे. पुढच्या पाच वर्षासाठीची महापालिका निवडणुकीची सत्ता मिळवण्यासाठी हा पाऊस पडतोय हे मतदारांनी लक्षात ठेवावे.
**जयंत पाटील**, राकाँशप नेते



# मशीद तोडण्याच्या अफवेनंतर दिल्लीत प्रचंड दगडफेक

**पाच पोलिस जखमी**

**अल्पवयीनासह पाच जण ताब्यात**

◆ **नवी दिल्ली, ७ जानेवारी**

अतिक्रमणविरोधी मोहिमेदरम्यान मशीद पाडली जात असल्याचा दिशाभूल करणारा मेसेज समाज माध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर दिल्लीच्या रामलीला मैदानावरील फैझ-ए-इलाही मशिदीच्या जवळ झालेल्या अतिक्रमणविरोधी कारवाईदरम्यान बुधवारी पहाटे जमावाने पोलिसांवर तुफानी दगडफेक केली. यात पाच पोलिस कर्मचारी जखमी झाले.

मंगळवार आणि बुधवारी मध्यरात्री चाल करून आलेल्या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी सौम्य बळाचा तसेच अश्रुधुराचा वापर केला आणि अल्पवयीन मुलासह पाच जणांना ताब्यात घेतले. अतिक्रमण विरोधी मोहिमेदरम्यान मशीद पाडली जात असल्याची पोस्ट समाज माध्यमावर व्हायरल झाल्यानंतर जमाव गोळा झाला, अशी माहिती पोलिस सूत्रांनी दिली.



फैझ-ए-इलाही मशिदीच्या परिसरातील पाडण्यात आलेले अतिक्रमण

जमावातील काही जणांनी पोलिस आणि दिल्ली महापालिकेच्या कर्मचाऱ्यांवर दगड आणि काचेच्या बाटल्या भिरकावण्यास सुरुवात केली, असे सूत्रांनी सांगितले. दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार दिल्ली महापालिका तुर्कमान गेट येथील मशिदीला लागून असलेल्या जमिनीवर आणि जवळच्या कब्रस्तानाजवळ अतिक्रमणविरोधी कारवाई करीत होती.

अतिक्रमणविरोधी मोहिमेदरम्यान डायग्नोस्टिक सेंटर, बॅन्क्वेट हॉल यासारखी व्यावसायिक प्रतिष्ठानांचे बांधकामही तोडण्यात आले, असे दिल्ली महापालिकेचे उपायुक्त विवेक कुमार यांनी सांगितले. मात्र, मशिदीचे कोणतेही नुकसान झाले नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

अतिक्रमणविरोधी मोहीम सुरू असताना जवळपास १०० ते १५० लोक जमा झाले. समजूत काढल्यानंतर काही जणांनी माघार घेतली. काही जणांनी गोंधळ घालत दगडफेक केली. यात पाच पोलिस कर्मचारी जखमी झाले, असे विवेक कुमार यांनी सांगितले. हा हिंसाचार उत्स्फूर्त होता की अतिक्रमणविरोधी मोहीम उधळण्यासाठी पूर्वनियोजित होता, याचा तपास केला जात असल्याचे पोलिसांनी सांगितले.

जमावाला पांगवण्यासाठी अश्रुधुराचे गोळे डागण्यात आले. त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली आणि नंतर ती सामान्य झाली, असे दिल्ली पोलिसांनी निवेदनात म्हटले.

वादग्रस्त जमीन दिल्ली महापालिकेच्या मालकीची आहे. येथे मंगळवार आणि बुधवारी रात्री अतिक्रमणविरोधी मोहीम राबवण्याचे निश्चित झाले होते. त्यांनी याबाबतची माहिती पोलिसांना दिली आणि कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलिस तैनातीची मागणी केली होती, अशी माहिती अतिरिक्त पोलिस आयुक्त (मध्य विभाग) निधीन वलसान यांनी दिली. *(वृत्तसंस्था)*

### लोकांना घराबाहेर येण्याचे आवाहन

**वादाला कारणीभूत ठरलेल्या व्हिडीओंपैकी एक व्हिडीओ खालिद मलिक नावाच्या व्यक्तीने रेकॉर्ड केल्याचा आरोप आहे. यात त्याने लोकांना मोठ्या प्रमाणावर बाहेर पडण्याचे आवाहन केले होते. मशीद पाडण्यासाठी बुलडोझर तैनात केल्याची अफवा पसरवण्यात आली. यामुळे परिसरात तणाव वाढला, असे पोलिसांनी सांगितले.**

### ओळख पटवण्यासाठी सीसीटीव्हीचा वापर

**या प्रकरणात मोहम्मद कैफ, मोहम्मद काशिफ, मोहम्मद हमीद आणि एका अल्पवयीनाला अटक करण्यात आली. इतर आरोपींची ओळख पटवण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज आणि समाज माध्यमांवर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओंचे विश्लेषण केले जात आहे, असे पोलिसांनी सांगितले.**

**बांगलादेश** | **कट्टरवाद्यांच्या दहशतीने जगणे झाले कठीण**

# जमावापासून वाचण्यासाठी हिंदूने गमावला जीव

◆ **ढाका, ७ जानेवारी**

चोरीचा आरोप करून एका हिंदू तरुणाला जबर मारहाण करण्यात आली. जमावाच्या तावडीतून सुटून तो जिवाच्या आकांताने पळू लागला, इतर हिंदू नागरिकांप्रमाणे आपल्यालाही ठार केले जाईल या भितीने त्याने एका कालव्यात उडी घेत आयुष्य संपविले. ही थरारक घटना बांगलादेशातील नाओगाव जिल्ह्यातील भंडारपूर गावात घडली. मृतक तरुणाचे नाव २५ वर्षीय मिथुन सरकार आहे.

गेल्या १९ दिवसांत बांगलादेशात मृत्यू झालेल्या हिंदूंची संख्या सातवर पोहोचली आहे. कट्टरवाद्यांच्या दहशतीमुळे बांगलादेशातील हिंदू नागरिकांमध्ये प्रचंड भिती असून, त्यांचे जगणे कठीण झाले आहे. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, मंगळवारी सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास काही लोकांनी हाट चकगौरी बाजार परिसरात मिथुनवर चोरीचा आरोप करत त्याला मारहाण केली. जमावाच्या तावडीतून सुटून त्याने पळ काढला. मात्र जमावाने त्याचा पाठलाग केला. बचाव करण्याच्या प्रयत्नात त्याने जवळच्या कालव्यात उडी मारून त्याने जीव दिला. पोलिस आणि अग्निशमन दलाच्या पथकाने बुधवारी त्याचा मृतदेह बाहेर काढला. मृतक खरोखरच



चोरीच्या प्रकरणात सहभागी होता की नाही, याचा तपास सुरू आहे. दरम्यान सोमवारी रात्री नरसिंगदी जिल्ह्यात एका हिंदू दुकानदाराची धारदार शस्त्रांनी हत्या करण्यात आली. मृताची ओळख ४० वर्षीय शरत चक्रवर्ती मणि अशी झाली. पोलिसांनी याप्रकरणी दोन आरोपींना अटक केली. *(वृत्तसंस्था)*

### कट्टरवाद्यांच्या भारताविरोधात घोषणा

बांगलादेशी विद्यार्थी नेती आणि राजकीय कार्यकर्ता शरीफ उस्मान हादी याच्या मारेकऱ्यांना शिक्षा देण्याच्या मागणीसाठी इन्कलाब मंच संघटनेच्या नेतृत्वात बुधवारी मोर्चा काढण्यात आला, यात मोठ्या संख्येने कट्टरवादी सहभागी झाले. यावेळी निदर्शकांनी भारताविरोधात घोषणा दिल्या आणि हादीच्या मारेकऱ्यांना शिक्षा न दिल्यास रक्तपात घडविण्याची धमकी दिली. इन्कलाब मंचने पोलिसांनी न्यायालयात सादर केलेले आरोपपत्र नाकारले.

### हादीच्या हत्येत अवामी लीगचा हात

मंगळवारी, ढाका महानगर पोलिसांच्या गुप्तहेर शाखेने हादीच्या हत्येत १७ जणांविरुद्ध औपचारिक आरोपपत्र दाखल केले. पोलिसांच्या मते, हादीची हत्या ही राजकीय सूडबुद्धीने केली होती आणि त्यात अवामी लीगचा हात आहे. अवामी लीगशी संबंधित वॉर्ड नगरसेवक तैजुल इस्लाम चौधरी उर्फ बप्पी याने हत्या घडवून आणली. फैसल करीम मसूद हा मुख्य आरोपी असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

# इंदूरमध्ये साथीच्या आजारासारखे संकट

**३,२०० हून अधिक रुग्ण प्रभावित** | **राष्ट्रीय संस्थांचे पथक तपास दाखल**



◆ **इंदूर, ७ जानेवारी**

मध्यप्रदेशातील इंदूरमधील भागीरथपुरा परिसरात दूषित पिण्याच्या पाण्यामुळे उलट्या आणि अतिसाराचा साथीचा रोग निर्माण झाला आहे. राज्यात इतक्या कमी कालावधीत मर्यादित क्षेत्रात इतक्या मोठ्या संख्येने लोक एकाच आजाराने बाधित झाल्याची ही पहिलीच वेळ आहे.

आतापर्यंत ३,२०० हून अधिक रुग्ण आढळले आहेत, ज्यात मोठ्या संख्येने मुले, वृद्ध आणि महिला आहेत. अनेक कुटुंबांमध्ये, सर्व सदस्य आजारी पडले आहेत, ज्यामुळे संपूर्ण परिसरात आरोग्य संकट निर्माण झाले आहे.

प्रशासकीय सूत्रांनुसार, पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनमध्ये गळतीमुळे सांडपाणी मिसळले गेले, ज्यामुळे पाण्यात फेकल कोलिफॉर्म बॅक्टेरियासारखे धोकादायक दूषित घटक आले. यामुळे अतिसार आणि उलट्यांचा झपाट्याने प्रसार झाला. तथापि, मृतांचा आकडा वादग्रस्त आहे. अधिकृतपणे ६-७ मृत्यूंना पुष्टी मिळाली आहे, तर स्थानिक आणि काही अहवाल १५-१७ मृत्यूंचा दावा करतात. यामध्ये एका सहा महिन्यांच्या मुलाचा समावेश आहे, ज्याच्या मृत्यूमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. *(वृत्तसंस्था)*

### आरोग्य पथके इंदूरमध्ये कार्यरत

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, देशातील आघाडीच्या आरोग्य आणि संशोधन संस्थांचे पथक भागीरथपुरा परिसरात तपासणी आणि देखरेख करत आहेत. कोलकाता येथील राष्ट्रीय जीवाणूशास्त्र संस्था, राज्य एकात्मिक रोग देखरेख कार्यक्रम आणि दिल्लीतील एम्स येथील तज्ज्ञ पथके जवळजवळ चार दिवसांपासून या परिसरात आहेत, पाण्याचे नमुने, रुग्णांचे अहवाल आणि इतर बाबी तपासत आहेत.

### हिजाब घालून दागिने खरेदी नाही

**पाटणा** : हिजाब घालून सोने-चांदीचे दागिने खरेदी करता येणार नाही. सुरक्षेच्या कारणावरून हा निर्णय घेतला असल्याचे बिहार ज्वेलर्स संघटनेने म्हटले आहे. बिहारमधील सर्व सराफा दुकानांमध्ये हिजाब, नकाब किंवा बुरखा घालून येणाऱ्यांना प्रवेश दिला जाणार नसल्याचे संघटनेने म्हटले आहे.

# जेम्स लेनच्या पुस्तकावरून ‘ऑक्सफोर्ड’ची माफी

**वृत्तपत्रात प्रसिद्ध केली सूचना**

◆ **पुणे, ७ जानेवारी**

दोन दशकांपूर्वी प्रकाशित झालेल्या एका पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल पडताळणी न करता केलेल्या वक्तव्यांबद्दल ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या प्रेसने उदयनराजे भोसले यांची माफी मागितली आहे.

२००३ मध्ये जेम्स लेनच्या प्रकाशित झालेल्या ‘शिवाजी : हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया’ या पुस्तकाच्या पृष्ठ क्रमांक ३१, ३३, ३४ आणि ९३ वरील काही विधानांची पडताळणी केली नव्हती, अशी कबुली ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस इंडियाने मंगळवारी एका वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या सार्वजनिक सूचनेमध्ये दिली आहे.

अमेरिकी लेखक जेम्स लेन यांनी लिहिलेल्या पुस्तकामुळे वाद निर्माण झाला होता. जानेवारी २००४ मध्ये संभाजी ब्रिगेडच्या १५० पेक्षा जास्त कार्यकर्त्यांनी पुण्यातील लॉ कॉलेज रोडवरील सुप्रसिद्ध भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्सस्टिट्यूटची तोडफोड केली होती. पुस्तकात शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह शेरेबाजी करणाऱ्या लेखकाला संस्थेने मदत केल्याचा आरोप करण्यात आला होता.

आक्षेपार्ह विधानांच्या प्रकाशनांबद्दल प्रकाशकाने या सूचनेत खेद व्यक्त केला आणि झालेला त्रास आणि वेदनेसाठी छत्रपती उदयनराजे भोसले आणि सर्वसामान्य जनतेची माफी मागितली आहे. हे माफीपत्र ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेसचने माजी व्यवस्थापकीय संचालक सईद मंझर यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आले, असे सूचनेत म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*



हिमाचल प्रदेशातील पर्वतीय भागांत गेल्या काही दिवसांपासून जोरदार बर्फवृष्टी सुरू आहे. बर्फवृष्टीचा आनंद घेण्यासाठी हजारो पर्यटक राज्यात येत आहेत

## चित्रपट वार्ता

### बाळंतपणानंतर कामावर परतली भारती

**मुंबई** : विनोदी कलाकार भारतीसिंह हिने नुकताच दुसऱ्या बाळाला जन्म दिला. तिने लाडाने आपल्या दुसऱ्या मुलाचे नाव ‘काजू’ ठेवले आहे. आता ती किमान दोन महिने सुटीवर राहील, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र, काजूच्या जन्मानंतर अवघ्या २० दिवसातच भारती कामावर परतली आहे. ‘लाफ्टर शेफ’च्या सेटवर भारती दिसताच पापाराझींना आश्चर्याचा धक्का बसला. भारतीने यावेळी पापाराझींना मिठाईचे वाटप केले. तेव्हा पापाराझींनी तिचे अभिनंदन केले. भारती म्हणाली, काजू आ गया....सोचा था किशमिश आएगी पर काजू आ गया. पापाराझींनी गंमतीत विचारले, किशमिश भी आएगी...त्यावर भारती म्हणाली, मी हेच करत राहावे का? कामही करायचे आहे ना! बाळंतपणाला महिनाही होत नाही तर भारती परतल्याने चाहत्यांनी चिंताही व्यक्त केली आहे. तिने विश्रांती घ्यायला हवी होती, असे अनेकजण म्हणताहेत.



### सहा मिनिटांसाठी घेतले सहा कोटी रुपये!

**गोवा** : मनोरंजन जगतातील कलाकार चित्रपट किंवा अन्य माध्यमातून जितके पैसे कमवत नाहीत तेवढे जाहीर कार्यक्रमांमधून कमावतात. अनेक कलाकार तर कोटींच्या घरात मानधन घेतात. एक अभिनेत्री अशीही आहे जी फक्त सहा मिनिटांच्या नृत्यासाठी आली आणि सहा कोटी रुपये घेऊन गेली. इतके मानधन तर ‘धुरंधर’चा आत्मा असलेल्या अक्षय खन्नालाही चित्रपटासाठी मिळाले नाही. ती अभिनेत्री आहे तमन्ना भाटिया. गोव्यात ३१ डिसेंबरच्या एका कार्यक्रमासाठी ती आली होती. येथील प्रसिद्ध बागा बीचवरील लास ओलास बीच क्लबमध्ये एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात तमन्नाने तिच्या गाजलेल्या गाण्यांवर जबरदस्त नृत्य सादर केले आणि अवघ्या सहा मिनिटांच्या नृत्यानंतर तिने प्रेक्षकांची रजा घेतली. या सादरीकरणारचे तिला सहा कोटी रुपये मिळाले. म्हणजेच आता तिचा एकेक मिनीट एक कोटीचा झाला आहे. इतक्या मोठ्या मानधन आकड्यामुळे मनोरंजन जगतातही आश्चर्य व्यक्त केले जात आहे. अर्थात, यावरून तिची लोकप्रियता किती वाढली आहे, हेही समजते.



### प्रभासच्या चित्रपटावर सेन्सॉरची कात्री

**हैदराबाद** : मेगास्टार प्रभासचा आगामी हॉरर कॉमेडी चित्रपट ‘राजा साब’मधील दोन दृश्यांमध्ये मोठे बदल करण्यात आले आहेत. सेन्सॉर बोर्डाने चित्रपटाला प्रमाणपत्र देण्यापूर्वी त्यातील दोन दृश्यांवर कात्री चालवली आहे, ज्यामुळे चित्रपटाच्या लांबीवरही परिणाम झाला आहे. प्रभासचा ‘राजा साब’ हा चित्रपट ९ जानेवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. चित्रपट सेन्सॉर बोर्डाकडे प्रमाणपत्रासाठी पाठवण्यात आला होता. मात्र, बोर्डाने त्यातील दोन दृश्यांवर आक्षेप घेतला. पहिला बदल त्या दृश्यात करण्यात आला आहे, ज्यात जमिनीवर रक्त वाहत असल्याचे दाखवले जाणार होते. या दृश्यातील रक्त आता ब्लॅक अँड व्हाईट (कृष्णधवल) केले जाईल. तर दुसरा बदल डोके कापण्याच्या दृश्यात झाला आहे. सेन्सॉर बोर्डाने त्याची चार सेकंदांची लांबी कमी करण्याची सूचना केली आहे, त्यानंतर आता चित्रपटाचा एकूण कालावधी १८९ मिनिटे म्हणजेच ३ तास ९ मिनिटे असेल.

# दरवर्षी ३२४ अब्ज घनमीटर पाणी होतंय् कमी

**जागतिक बँकेने प्रसिद्ध केला अहवाल** | **ओढवू शकते पाणीटंचाईची समस्या**

◆ **नवी दिल्ली, ७ जानेवारी**

पिण्याच्या पाण्याचा साठा दिवसेंदिवस कमी होतो आहे. अनेक खंडांमधील गोड्या पाण्याचा साठा वेगाने कमी होत असून येणाऱ्या काही वर्षांमध्ये जगावर जलसंकट येऊ शकते, असे जागतिक बँकेने प्रसिद्ध केलेल्या एका अहवालात म्हटले आहे.

‘कॉन्टिनेंटल ड्राईंग’ म्हणजे मोठ्या भूभागावरील गोड्या पाण्याच्या उपलब्धतेत होणारी दीर्घकालीन घट होय. या अहवालानुसार, बर्फ वेगाने वितळणे, कायमस्वरूपी गोठलेली जमीन (पर्माफ्रॉस्ट) वितळणे, पाण्याचे बाष्पीभवन आणि भूगर्भातील पाण्याचा अतिउपसा, यामुळे ही स्थिती निर्माण झाली आहे. यामध्ये ग्रीनलँड आणि अंटार्क्टिका येथील बर्फाचा समावेश करण्यात आलेला नाही. विविध खंडांमधून दरवर्षी अंदाजे ३२४ अब्ज घनमीटर पाणी कमी होते आहे. दर सेकंदाला मोठ्या आकाराच्या चार स्विमिंग पूल इतके



पाणी कमी होत असल्याचे अहवालाचे मुख्य लेखक फॅन झांग यांनी सांगितले. हे नष्ट झालेले पाणी शेवटी समुद्रात जाते. परिणामी हिमनद्यांपेक्षाही खंडांवरील पाणी कमी होणे हे समुद्रपातळी वाढण्याचे सर्वात मोठे कारण ठरत आहे. दरवर्षी कमी होणारे पाणी २८ कोटी लोकांची वार्षिक गरज भागवण्यासाठी पुरेसे आहे. हा अहवाल नासाच्या ‘ग्रेस’ मिशनच्या २२ वर्षांच्या माहितीवर आधारित आहे. शास्त्रज्ञांनी उपग्रहाद्वारे पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणातील बदलांचा अभ्यास करून पाण्याचा साठा किती कमी झाला आहे, याचे मोजमाप केले आहे.

जागतिक बँकेच्या मते, पावसाच्या पाण्यातून मिळणाऱ्या एकूण वार्षिक पाण्याच्या तीन टक्के पाणी दरवर्षी खंडांमधून नष्ट होते आहे. कोरड्या आणि निम-कोरड्या प्रदेशांमध्ये हे प्रमाण १० टक्क्यांपर्यंत जाते. यामुळे दक्षिण आशियासारख्या आधीच पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या भागांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. *(वृत्तसंस्था)*

### ठरू शकते आंतराष्ट्रीय आव्हान

**पाण्याची समस्या ही केवळ स्थानिक वाटत असली, तरी स्थानिक पातळीवरील टंचाई लवकरच राष्ट्रीय सीमा ओलांडून आंतरराष्ट्रीय आव्हान बनू शकते, असा इशारा तज्ज्ञांनी दिला. देशांनी वेळीच पाणी व्यवस्थापन आणि भूगर्भातील उपसा थांबवल्यास हा धोका कमी करता येईल, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.**

### अमिताभ ठाकूर रुग्णालयात दाखल

◆ **देवरिया, ७ जानेवारी**

फसवणुकीच्या आरोपाखाली जिल्हा कारागृहात असलेले माजी आयपीएस अधिकारी अमिताभ ठाकूर यांना हृदयाशी संबंधित त्रासाची तक्रार केल्यानंतर रुग्णालयात दाखल करण्यात आले, अशी माहिती पोलिसांनी बुधवारी दिली.

मंगळवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास ठाकूर यांची प्रकृती बिघडली, त्यानंतर त्यांना तातडीने देवरिया येथील महर्षी देवराहा बाबा वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले.

प्राथमिक तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारांसाठी गोरखपूर येथील बीआरडी वैद्यकीय महाविद्यालयात पाठवले.

ठाकूर यांनी कारागृहाच्या आवारात असताना हृदयाशी संबंधित त्रासाची तक्रार केली. जिल्हा वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्यापूर्वी कारागृहातील डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली, असे कारागृह प्रशासनाने सांगितले. ठाकूर यांना १० डिसेंबर २०२५ रोजी अटक करण्यात आली होती. त्यांच्यावर १९९९ मध्ये देवरियाचे पोलिस अधीक्षक (एसपी) म्हणून आपल्या पदाचा गैरवापर करून औद्योगिक भूखंड फसवणुकीने मिळवल्याचा आरोप आहे. *(वृत्तसंस्था)*

# २६ माओवाद्यांची सुकमात शरणागती

**१३ जणांवर एकूण ६५ लाखांचे बक्षीस**

**सात महिलांचा समावेश**

◆ **रायपूर, ७ जानेवारी**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात बुधवारी २६ माओवाद्यांनी शरणागती पत्करली. यापैकी १३ जणांच्या शिरावर एकूण ६५ लाख रुपयांचे बक्षीस होते. शरण आलेल्या माओवाद्यांत सात महिलांचा समावेश आहे. त्यांनी ‘पूना मार्गेम’ योजनेच्या अंतर्गत शरणागती पत्करली, अशी माहिती सुकमाचे पोलिस अधीक्षक किरण चव्हाण यांनी दिली.

शरण आलेले माओवादी पीपल्स लिबरेशन गोरिल्ला आर्मी बटालियन, दक्षिण बस्तर डिव्हिजन, माड डिव्हिजन आणि आंध्र-ओडिसा डिव्हिजन आणि अबुझमाड, छत्तीसगडच्या सुकमा आणि ओडिशाच्या सीमावर्ती परिसरातील कित्येक घटनांमध्ये सहभागी होते, असे किरण चव्हाण यांनी सांगितले. राज्य सरकारच्या आत्मसमर्पण आणि पुनर्वसन धोरणाने प्रभावित झाल्याने त्यांनी शरणागती पत्करली.

### मिनपा हल्ल्यात सहभागी होता लखमा

२०२० मध्ये मिनपा येथे झालेल्या हल्ल्यात लखमा सहभागी होता. या हल्ल्यात सुरक्षा दलाचे १७ जवान जखमी झाले होते. शरणागती पत्करणाऱ्या इतर माओवाद्यांपैकी तिघांवर पाच लाख रुपयांचे, एकावर तीन लाखांचे आणखी एकावर दोन लाख रुपयांचे आणि तीन माओवाद्यांवर प्रत्येकी एक लाख रुपयांचे बक्षीस होते. शरणागती पत्करलेल्या माओवाद्यांना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली तसेच सरकारी धोरणाप्रमाणे त्यांचे पुनर्वसन केले जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

शरण आलेल्या माओवाद्यांपैकी लाली उर्फ आयते लखमू ही कंपनी पार्टी समितीची सदस्य होती. तिच्या शिरावर १० लाख रुपयांचे बक्षीस होते. हिंसाचाराच्या कित्येक घटनांमध्ये लालीचा सहभाग होता. *(वृत्तसंस्था)*

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# शिक्षकांना 'गुरुजी'च राहू द्या..!

महाराष्ट्राच्या शैक्षणिक परंपरेला सावित्रीबाई फुले, महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे आदी महनीयांचा वारसा आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, असे मानणाऱ्या या भूमीत आज प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांची अवस्था मात्र केविलवाणी झाली आहे. ज्या हातांनी खडू धरून देशाची भावी पिढी घडवणे अपेक्षित आहे, त्याच हातांत सध्या 'कुत्रे मोजण्याची' नोंदवही दिली जात आहे. ही बाब दुर्दैवी तर आहेच, शिवाय शिक्षकांकडे पाहण्याच्या प्रशासकीय दृष्टिकोनाची दिवाळखोरी दर्शवणारी आहे. शिक्षकांना निवडणुकीची कामे देणे किंवा त्यांच्याकडून जनगणना करून घेणे हे कायद्याने अनिवार्य असले, तरी अलिकडच्या काळात शिक्षकांना स्वस्त व सहज उपलब्ध होणारे मनुष्यबळ समजण्याची चूक प्रशासन सातत्याने करीत असल्याचे दिसते. निवडणूक कामांच्या कर्तव्यापासून सुरू झालेला हा प्रवास आता गावात किती कुत्रे आहेत, किती शौचालये बांधली गेली आहेत आणि ती वापरली जातात की नाही, इथपर्यंत येऊन पोहोचला आहे, हे जास्त चिंताजनक आहे. शिक्षकांना सातत्याने अशैक्षणिक कामांत जुंपून आपण प्रगत महाराष्ट्र घडवू पाहत आहोत का, हा खरा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे आणि त्याचा ऊहापोह होणे गरजेचे आहे.

'आरटीई' कायद्यानुसार शिक्षकांना केवळ जनगणना, आपत्ती निवारण आणि निवडणूक या तीनच कामांसाठी नियुक्त करता येते. मात्र, प्रशासकीय यंत्रणा या नियमाला सतत हरताळ फासत आहे. पल्स पोलिओ मोहीम, वृक्षारोपण, स्वच्छ भारत अभियान, विविध शासकीय योजनांचे सर्वेक्षण, आधार कार्ड नोंदणी आणि आता तर गावोगावच्या जनावरांची मोजणीही शिक्षकांच्याच माथी मारली जात आहे. एखाद्या राष्ट्राची प्रगती ही त्या देशातील शाळेत असलेल्या बाकांवरच्या विद्यार्थ्यांवरून आणि शिक्षकांच्या गुणवत्तेवर ठरते. मात्र, आपल्याकडे शिक्षक वर्गात शिकवण्यापेक्षा शासनाच्या विविध पोर्टलवर माहिती भरणे, माध्यान्ह भोजन योजनेचा हिशेब ठेवणे आणि शालेय पोषण आहाराचा तांदूळ मोजण्यात जास्त व्यस्त आहेत. 'युनिसेफ'च्या एका अहवालानुसार, भारतातील प्राथमिक शिक्षक त्यांच्या एकूण वेळेपैकी सुमारे ३० ते ४० टक्के वेळ अशैक्षणिक कामांमध्ये घालवतात. महाराष्ट्रात तर हे प्रमाण अधिक भयावह असू शकते. जेव्हा एखादा शिक्षक गावात शौचालयाची मोजणी करायला जातो किंवा कुत्र्यांची गणना करतो, तेव्हा वर्गातील ५०-६० विद्यार्थ्यांचे भविष्य तो वाऱ्यावर सोडत असतो, हे आपण समजून घेतले पाहिजे. गुणवत्तेचा अभाव आणि ढासळलेली शैक्षणिक पातळी यासाठी पालकांचा रोष आधीच शिक्षकांवर आहे. शिक्षकांना उन्हाळ्याच्या सुट्या असतात, त्यांना पगार जास्त आहे, त्यांना कामच काय असते? अशा प्रकारची चर्चा मंत्रालयापासून ते गावाच्या चावडीपर्यंत रंगते. याच मानसिकतेतून त्यांना कुठलेही काम दिले तरी चालते, असा समज रूढ झाला आहे. यात काही अंशी वास्तव असले तरी, अशा काही अकार्यक्षम व कामचुकार शिक्षकांमुळे या 'नोबेल प्रोफेशन'चे पावित्र्य मलिन होत आहे. विद्यार्थ्यांविषयी तळमळ असलेले बरेच शिक्षकही प्रशासनाच्या अवास्तव विळख्यात अडकले आहेत, हेही लक्षात घेतले पाहिजे.

काही शिक्षक शिकवत नाहीत, हे खरे मानले तरी त्यांच्याकडून ती कामे करून घेण्याची जबाबदारी ही प्रशासकीय यंत्रणेचीच नव्हे का? अशा कामचुकार शिक्षकांवर कारवाई करण्याऐवजी, सरसकट साऱ्याच शिक्षकांना अधिक अशैक्षणिक कामांत गुंतवणे म्हणजे 'रोग रेड्याला आणि डाग पखाला' यासारखे नव्हे का? जे शिक्षक प्रामाणिकपणे, तळमळीने पिढी घडवू इच्छितात, त्यांची या यंत्रणेत मोठी कुचंबणा होत आहे. या अशैक्षणिक कामाच्या ओझ्याखाली त्यांचा उत्साह आणि सृजनशीलता मरत चालली आहे, हे कोण समजून घेणार? आज सरकारी शाळांसमोर खाजगी शाळांचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. इंग्रजी माध्यमांच्या अद्ययावत शाळांच्या आकर्षणापायी जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या सातत्याने घटत आहे. अशा बिकट परिस्थितीत शिक्षकांची गुणवत्ता सुधारण्यावर भर देण्याऐवजी, त्यांना सरकारी योजनांच्या अंमलबजावणीचे 'एजंट' बनवले जात असेल, तर या राज्याच्या साक्षरतेचे प्रमाण मिझोरम व केरळसारखे कसे होईल, याचाही विचार केला पाहिजे. आपल्या राज्यात विद्यार्थ्यांची पटसंख्या टिकविण्यासाठी एकीकडे शिक्षकांना घरोघरी जाऊन मुलांची, त्यांच्या पालकांची मनधरणी करावी लागते. त्यात अशी अशैक्षणिक कामे आली की शिक्षकांचे लक्ष अध्यापनावरून उडणे स्वाभाविक आहे. एकीकडे शाळा वाचवायच्या आणि दुसरीकडे शिक्षकांना शाळेबाहेर काढायचे, हा निव्वळ विरोधाभास आणि विसंगती आहे. हे भविष्यात घातक ठरणार आहे.

राज्याच्या शिक्षण व्यवस्थेला या गर्तेतून बाहेर काढायचे असेल, तर कठोर निर्णयांची गरज आहे. शिक्षक हा राष्ट्राच्या जडणघडणीसाठी आवश्यक घटक असून, त्याच दृष्टिकोनातून त्याच्याकडे बघितले गेले पाहिजे. तो सर्वेक्षण यंत्रणा राबवणारा कारकून नाही. तो दिवसभर शिकवत नाही म्हणून त्याला दुसरी कामे देणे ही प्रशासनाची सोय झाली. उलट शिक्षकाला वाचन संस्कृती वाढवण्याची, विधायक कामे करून घेण्याची किंवा संशोधनाची कामे करण्यास प्रोत्साहित करणे जास्त गरजेचे आहे. मध्यंतरी सोलापूर जिल्ह्यातील परितेवाडीच्या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक रणजितसिंग डिसले यांनी तळमळीने घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांना शाळेत आणले, नावीन्यपूर्ण शिक्षण पद्धत राबविली. त्यांच्या या कामासाठी युनेस्कोने २०२० मध्ये त्यांना जागतिक पातळीवर पुरस्कृतही केले. तेव्हा मिळालेल्या सात कोटी रुपयांतून त्यांनी अर्धी रक्कम अंतिम फेरीतील इतर देशांच्या स्पर्धकांना वाटून दिल्याने ते प्रकाशझोतात आले होते. पुढे प्रशासकीय यंत्रणेने त्यांची पार निराशा केली. जनगणना, पशुगणना किंवा शौचालयांची मोजणी करणे हे शिक्षकांचे काम नव्हे, त्यासाठी कंत्राटी पद्धतीने किंवा अन्य मार्गाने स्वतंत्र यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. या कामासाठी बेरोजगार तरुणांचा वापर केल्यास त्यांना रोजगारही मिळेल आणि शिक्षकांचा वेळ विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यात सत्कारणी लागेल. ते तसे करीत नसतील तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई झाली पाहिजे. पण सरसकट साऱ्या शिक्षकांना अशा सर्वेक्षणांच्या कामात जुंपणे कसे न्याय्य ठरेल? उन्नत माहिती तंत्रज्ञानाच्या युगात 'सरल'सारखी पोर्टल्स अधिक सुटसुटीत करण्याचीही गरज आहे. माहिती भरण्यासाठी प्रत्येक शाळेत स्वतंत्र 'डेटा एन्ट्री ऑपरेटर'ची नियुक्ती होणेही आवश्यक आहे. जेणेकरून शिक्षकांना ही कारकुनी कामे करावी लागणार नाहीत. 'आरटीई' कायद्यानुसार दिलेल्या तीन अनिवार्य कामांव्यतिरिक्त शिक्षकांना कोणतेही चौथे काम दिले जाणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. अशा पद्धतीने अशैक्षणिक कामे पूर्णपणे बंद केल्यानंतरही जर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सुधारणा झाली नाही, तर मात्र शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक कामांचा जाब प्रशासकीय यंत्रणांनी खुशाल विचारावा. नव्हे, कामचुकार शिक्षकांवर कारवाई करावी, आमचे काहीच म्हणणे नाही. शिक्षक हा समाजाचा कणा आहे, असे जर आपण मानतो तर हा कणा अशैक्षणिक कामांच्या ओझ्याखाली वाकायला नको. तो वाकला तर समाज कोसळायला वेळ लागणार नाही. कुत्रे आणि शौचालये मोजण्याचे काम कोणीही करू शकेल, पण विद्यार्थ्यांची मने घडवण्याचे आणि त्यांना सुसंस्कृत नागरिक बनवण्याचे काम केवळ शिक्षकच करू शकतात. सरकारी यंत्रणांनी याचे भान ठेवले पाहिजे, नव्हे या परिस्थितीचे गांभीर्य समजून घेतले पाहिजे. शिक्षकांना पुन्हा एकदा 'फळा आणि खडू' यांच्याशी नाते जोडू द्या, अन्यथा आपण केवळ सुशिक्षित बेरोजगार आणि गुणवत्ताहीन पिढी निर्माण करू. शिक्षकांना गुरुजीच राहू द्या, त्यांना सरकारी कारकून बनवू नका!

---

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# भारताचे 'बाहुबली' यश

भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच 'इस्रो'ने पुन्हा एकदा जागतिक स्तरावर कर्तृत्वाचा झेंडा फडकावला. २४ डिसेंबर २०२५ रोजी श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून एलव्हीएम३-एम६ या भारताच्या सर्वांत शक्तिशाली रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. प्रचंड क्षमतेमुळे या रॉकेटला 'बाहुबली' असे टोपणनाव देण्यात आले आहे. हे केवळ एक रॉकेट प्रक्षेपण नव्हे, तर अंतराळ क्षेत्रातील भारताच्या वाढत्या व्यावसायिक ताकदीचे आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेचे एक जिवंत प्रतीक आहे. या मोहिमेद्वारे अमेरिकेचा 'ब्लू बर्ड ब्लॉक-२' हा महाकाय उपग्रह अवकाशात स्थापित करण्यात आला असून त्याचा थेट परिणाम आगामी काळात आपल्या मोबाईल वापरावर होणार आहे. या प्रक्षेपणाचा सर्वांत मोठा आणि थेट फायदा सामान्य मोबाईल वापरकर्त्यांना मिळणार आहे. सध्या मोबाईलवर इंटरनेट वापरण्यासाठी आपण जमिनीवरील टॉवर्सवर अवलंबून असतो. मात्र, ब्लू बर्ड ब्लॉक-२ उपग्रहाच्या यशस्वी प्रक्षेपणामुळे 'डायरेक्ट-टू-स्मार्टफोन' ही नवी तंत्रज्ञान प्रणाली कार्यान्वित होणार आहे. यामुळे सामान्य ४ जी आणि ५ जी स्मार्टफोन्सना कोणत्याही विशेष उपकरणाशिवाय थेट अंतराळातून कनेक्टिव्हिटी मिळेल. यामुळे दुर्गम डोंगरदऱ्या, समुद्र किंवा मोबाईल टॉवर्स लावणे अशक्य असणाऱ्या ठिकाणीही आता हाय-स्पीड ब्रॉडबॅण्ड इंटरनेट उपलब्ध होईल. व्हॉईस कॉल, व्हिडीओ कॉल आणि डेटा स्ट्रीमिंग या सेवांमध्ये कोणताही खंड पडणार नाही. विशेषतः नैसर्गिक आपत्तीच्या काळात जमिनीवरील नेटवर्क ठप्प झाले असता ही सॅटेलाईट आधारित यंत्रणा विशेष महत्त्वाची ठरेल. यामुळे जगातील 'डिजिटल दरी' कमी होण्यास मदत होईल आणि ग्रामीण भागातील नागरिकही जागतिक माहिती तंत्रज्ञानाशी जोडले जातील.

एलव्हीएम ३-एम ६ ने अवकाशात सोडलेला ब्लू बर्ड ब्लॉक-२ हा उपग्रह एका फिरत्या 'मोबाईल टॉवर'सारखा काम करतो. सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे याचा २२३ चौरस मीटरचा विशाल अँटेना. इतका मोठा असल्यामुळेच तो पृथ्वीपासून ५०० ते ६०० किलोमीटर उंचीवरून तुमच्या खिशातील लहानशा मोबाईलमधील कमकुवत सिग्नल पकडून प्रतिसाद देऊ शकतो. पारंपरिक सॅटेलाईट इंटरनेटसाठी (उदा. स्टारलिंक) घराच्या छतावर एक विशेष 'डिश' लावावी लागते. परंतु या तंत्रज्ञानात उपग्रह थेट फोनमधील एलटीई (४जी) किंवा ५जी लहरींशी संवाद साधतो. या मोहिमेचा सर्वांत मोठा आणि थेट फायदा व्होडाफोन आयडिया (व्हीआय) च्या वापरकर्त्यांना मिळण्याची शक्यता आहे. कारण 'एसटी स्पेसमोबाईल' (याचा उपग्रह ब्लू बर्ड ब्लॉक-२ इस्रोने सोडला आहे) या कंपनीने भारतात 'व्होडाफोन आयडिया'शी धोरणात्मक भागीदारी केली आहे. या करारानुसार, दुर्गम भागात कंपनीचे टॉवर्स पोहोचू शकत नसल्यास हा उपग्रह 'व्हर्च्युअल टॉवर' म्हणून काम करेल. त्यामुळे व्हीआय वापरकर्ते आपल्या सध्याच्या ४ जी किंवा ५ जी फोनवरून थेट उपग्रहाशी कनेक्ट होऊ शकतील. सरकारी कंपनी 'बीएसएनएल'ने 'व्हीआयएएसएटी' या अमेरिकन कंपनीशी हातमिळवणी केली आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये त्यांनी 'डायरेक्ट-टू-डिवाईस' तंत्रज्ञानाची यशस्वी चाचणी केली होती.



बीएसएनएल विशेषतः आपत्कालीन सेवा, लष्करी गरजा आणि अतिदुर्गम भागातील नागरिकांसाठी सॅटेलाईट मेसेजेस आणि कॉल सेवा सुरू करण्यावर भर देत आहे. रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेल सध्या 'स्टारलिंक' आणि 'वनवेब' यासारख्या सेवांशी स्पर्धा किंवा सहकार्य करण्याच्या तयारीत आहेत. मात्र या सेवा सुरुवातीला 'फिक्स्ड वायरलेस ॲक्सेस' (घराच्या छतावर डिश लावून मिळणारे इंटरनेट) यावर केंद्रित असू शकतात. तरीही, भविष्यात 'एअरटेल' आणि 'जिओ'देखील वापरकर्त्यांना थेट स्मार्टफोन जोडणी देण्यासाठी स्वतःचे किंवा भागीदारीतील सॅटेलाईट नेटवर्क वापरू शकतात. अर्थात ही सेवा वापरण्यासाठी काही गोष्टींची माहिती असणे आवश्यक आहे. जसे की, फोन गेल्या दोन-तीन वर्षांमधील ४ जी किंवा ५ जी असेल तर या उपग्रहाशी जोडला जाऊ शकेल. अगदी स्वस्त ५ जी फोन्समध्येही हे तंत्रज्ञान काम करेल. नजीकच्या भविष्यात फोनच्या 'नेटवर्क सेटिंग्स'मध्ये 'सॅटेलाईट रोमिंग' असा पर्याय दिसू शकेल. तो सुरू केल्यानंतर तुम्ही टॉवरच्या कक्षेबाहेर गेल्यावरही फोन सुरू राहील. ही सेवा प्रामुख्याने समुद्रात मासेमारीसाठी जाणारे कोळी, हिमालयात जाणारे ट्रेकर्स, जंगलातील रिसॉर्ट्स आणि राष्ट्रीय महामार्गावरील सिग्नल नसणाऱ्या जागांवरून प्रवास करणाऱ्या लोकांसाठी वरदान ठरेल. या तंत्रज्ञानाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे वापरकर्त्याला काहीही नवीन खरेदी करण्याची गरज नाही. म्हणजेच सॅटेलाईट फोन किंवा 'स्टारलिंक'सारख्या छतावर बसवण्याच्या अँटेनाची गरज भासणार नाही. सध्याचा ४जी/५जी एलटीई तंत्रज्ञान असणारा स्मार्टफोनच उपग्रहाशी जोडला जाईल.

या तंत्रज्ञानामुळे मोबाईल टॉवरची रेंज नसणाऱ्या ठिकाणी तुमचा फोन आपोआप उपलब्ध उपग्रह सिग्नल शोधेल. हे तंत्रज्ञान 'रोमिंग'प्रमाणेच काम करेल. या सेवेअंतर्गत सुरुवातीच्या टप्प्यात वापरकर्ते आपत्कालीन एसएमएस, साधे मेसेज आणि व्हॉईस कॉल करू शकतील. त्यानंतरच्या टप्प्यात हाय-स्पीड इंटरनेट आणि व्हिडीओ स्ट्रीमिंगची सुविधा उपलब्ध होईल. लवकरच टेलिकॉम कंपन्या ग्राहकांसाठी 'सॅटेलाईट ऑन डिमांड प्लॅन्स' आणू शकतात. उदाहरणार्थ, तुम्ही हिमालयात ट्रेकिंगला जाणार असाल तर काही दिवसांसाठी सॅटेलाईट कनेक्टिव्हिटीचा पॅक घेऊ शकाल. या नव्या सेवेचे अनेक लाभ मिळतील. जसे की, या प्रक्षेपणामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात हाय-स्पीड इंटरनेट पोहोचेल. शिक्षण आणि आरोग्यासाठी त्याचा फायदा होईल.

आजही ग्रामीण भागातील दुकानांमध्ये नेटवर्क नसल्यास यूपीआय व्यवहार फेल होतात. मात्र 'बाहुबली' उपग्रहामुळे मिळणाऱ्या स्थिर नेटवर्कमुळे अगदी दुर्गम भागातील किराणा दुकानातही डिजिटल पेमेंट सहज शक्य होईल. फळे, भाजीपाला किंवा औषधे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना ट्रकच्या ट्रॅकिंगसाठी नेटवर्क आवश्यक असते. मात्र महामार्गावरील 'ब्लॅक स्पॉट' (नेटवर्क नसलेल्या जागा) मुळे यात अडचण येते. आता ही अडचणही सुटणार असून रिअल-टाईम ट्रॅकिंग शक्य होईल. सध्या खेड्यापाड्यातील बरीच मुले युट्यूब किंवा इतर शैक्षणिक ॲप्सवरून अभ्यास करतात. पण पावसाळ्यात किंवा खराब हवामानात फायबर तुटल्यास यात खंड पडतो. सॅटेलाईट इंटरनेटमुळे ही अडचणही दूर होणार आहे. खेरीज पावसाचा अचूक अंदाज थेट मोबाईलवर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळता येईल. थोडक्यात, 'बाहुबली' रॉकेटची ही झेप भारताच्या कानाकोपऱ्यातील शेवटच्या माणसाला 'डिजिटल इंडिया'चा खरा भाग बनवणार आहे. इस्रोचे हे 'बाहुबली' प्रक्षेपण भारताला 'सॅटेलाईट-टू-स्मार्टफोन' क्रांतीच्या शर्यतीत जगातील आघाडीच्या देशांच्या रांगेत उभे करत आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

## वेध

**विजय कुळकर्णी**

# ग्राम पंचायती होताहेत समृद्ध

राज्यातील ग्राम पंचायतींची संख्या खूप मोठी आहे. गावातील विकासकामे ग्राम पंचायतींमार्फतच करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. हा निर्णय घेतल्यापासून गावातील अंतर्गत रस्ते, नळ योजना, ग्राम स्वच्छता, दिवाबत्ती इत्यादी कामे त्या त्या ग्राम पंचायतींमार्फत करण्याची अंमलबजावणी देखील सुरू आहे. मात्र, ही कामे करताना ग्राम पंचायतींना सर्वांत मोठी अडचण होती ती स्वनिधीची. कारण, ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. निसर्गाने साथ दिली तर, त्या वर्षी कृषी उत्पादन चांगले होते आणि पूर, दुष्काळ इत्यादी नैसर्गिक संकटे कोसळल्यास गावकऱ्यांची आर्थिक घडी विस्कटते. त्यामुळे घरपट्टी, पाणीपट्टी भरण्यासाठी त्यांच्याकडे पैसेच राहत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांकडे मालमत्ता व पाणीपट्टीची थकबाकी मोठ्या प्रमाणात थकित राहत होती. परिणामी ग्राम पंचायतींकडे स्वनिधी नसल्याने अनेक लहानसहान बाबींसाठी ग्राम पंचायती शासनावर अवलंबून राहत होत्या. यावर उपाय म्हणून महाराष्ट्र शासनाने राज्यभरातील ग्राम पंचायतींसाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हाती घेतले. या अभियानांतर्गत मालमत्ताधारकांना त्यांच्याकडील कर भरण्यासाठी ५० टक्के सूट दिली. त्याला ग्रामीण भागातील जनतेने प्रचंड प्रतिसाद दिला. त्यामुळे ग्राम पंचायतींकडे मालमत्ता करांच्या माध्यमातून मोठा निधी संकलित झाला आहे.




३१ डिसेंबर २०२५ ही कर सवलत मिळण्यासाठी शेवटची तारीख देण्यात आली होती. त्यामुळे डिसेंबर २०२५ मध्ये ग्रामीण भागातील मालमत्ताधारकांनी ग्राम पंचायतींसमोर अक्षरशः रांगा लावून मालमत्ता कर भरला. बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर ग्रामीण ग्राम पंचायतीमध्ये या योजनेंतर्गत ६० ते ७० लाखांचा निधी करस्वरूपात जमा झाला. सिंदखेडराजा तालुक्यातील शेंदुर्जन येथील ग्राम पंचायतीत कर भरण्यासाठी लोकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. रांगा लावून लोकांनी त्यांच्याकडील थकित कर भरला. संग्रामपूर तालुक्यात योजनेची मुदत वाढवून देण्याची मागणी मालमत्ताधारकांनी केली होती. त्यानंतर योजनेला मुदतवाढ मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणात विविध ग्राम पंचायतीत कर संकलन होत आहे. यापूर्वी ग्रामीण भागातील सर्व विकास कामे जिल्हा परिषदेमार्फत केली जात होती. जलस्वराज्यच्या माध्यमातून १० टक्के लोकवर्गणी भरून पिण्याच्या पाण्याची योजना शासनामार्फत दिली जात होती. अजूनही काही योजनांसाठी १० टक्के लोकवर्गणीची अट कायम आहे. मात्र, त्यासाठी ग्राम पंचायतींचा कर मालमत्ताधारकांकडे थकित असल्यामुळे लोकवर्गणी भरणे ग्राम पंचायतींना शक्य होत नव्हते. त्याबरोबर इतर विकासकामे जसे की, प्लेव्हरब्लॉक बसविणे, हायमास्ट लाईट उभारणे, पथदिवे लावणे, घंटागाडी खरेदी करणे इत्यादी बाबींसाठी आमदार, खासदारांचा निधी किंवा जिल्हा परिषदेकडून ग्राम पंचायतींना निधी मागावा लागत होता.

आता ग्राम पंचायतींना मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत कर स्वरूपात मोठ्या प्रमाणात निधी मिळत आहे. याचा विनियोग गावाच्या विकासासाठी केला जाणार आहे. एखाद्या गावात सांडपाण्याची समस्या निकाली काढण्यासाठी नाली बांधण्याची गरज आहे. त्यासाठी जिल्हा परिषद अथवा शासनाची परवानगी घेण्याची गरज आता नाही. ग्राम पंचायतीनेच कृती आराखडा तयार करून तो मंजुरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठवून त्याला मंजुरी मिळाल्यावर ग्राम पंचायतच ते काम करू शकते. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज योजनेच्या माध्यमातून ग्राम पंचायतींकडे आता स्वतःचा निधी संकलित होणार आहे. त्याचा विनियोग गावाच्या विकासकामांवरच झाला पाहिजे. त्या कामात पारदर्शकता असणे अपेक्षित आहे. गावातील अंतर्गत रस्त्यांची डागडुजी, नळ योजनेची देखभाल व दुरुस्ती इत्यादी कामे करताना त्यात भ्रष्टाचार होऊ नये, अशी सर्वांचीच अपेक्षा आहे. या कर संकलनातून ग्राम पंचायतमधील कर्मचाऱ्यांचे वेतन, संगणक, इंटरनेट इत्यादी अद्ययावत सुविधा उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, व्यायामशाळा सुरू केली पाहिजे. जनतेकडून मिळालेला पैसा जनतेच्याच उपयोगी खर्च व्हावा, अशी रास्त अपेक्षा ग्राम पंचायतींकडून आहे. राज्यातील सर्व सरपंच व त्यांचे सहकारी ही अपेक्षा पूर्ण करतील, असा विश्वास आहे.

८८०६००६१४९

---

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# देशात अविरोध निवडणुकीची परंपरा

महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकीत ६८ नगरसेवक अविरोध निवडून आल्यामुळे वादळ उठले आहे. अविरोध निवडून आलेले जवळपास सर्वच सदस्य भाजपा आणि शिवसेनेचे असल्यामुळे निवडीच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या मुद्यावरून राजकीय वातावरणही तापवण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण यावेळी प्रथमच एखाद्या निवडणुकीत उमेदवार अविरोध निवडून आले का, याआधी असे कधी झाले नव्हते का, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. विधानसभा आणि लोकसभेपासून देशात आतापर्यंत झालेल्या अनेक निवडणुकांमध्ये काही उमेदवार अविरोध विजयी झाले आहेत. विशेष म्हणजे फक्त भाजपाचेच उमेदवार अविरोध विजयी झाले, अन्य पक्षांचे नाही, असेही कधी झाले नाही. अनेक निवडणुकांत काँग्रेस, सपा, नॅशनल कॉन्फरन्स यांचेही उमेदवार अविरोध निवडून आले आहेत. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि देशाचे संरक्षण मंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यासह डॉ. फारुक अब्दुल्ला आदी नेते लोकसभेवर अविरोध निवडून आले आहेत. विधान परिषद आणि राज्यसभेच्या बहुतांश निवडणुका तर अविरोधच होत असतात, मग यावेळीच अविरोध निवडणुकीवरून गदारोळ का केला जात आहे?

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत गुजरातच्या सुरत लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे मुकेश दलाल अविरोध विजयी झाले होते. यावेळी काँग्रेस उमेदवार नीलेश कुंभानी यांचा अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी फेटाळून लावला. गंमत म्हणजे काँग्रेसचे डमी उमेदवार सुरेश पडसाला यांचा अर्जही फेटाळला गेला. त्यानंतर रिंगणातील अन्य ८ उमेदवारांनी माघार घेतली. त्यावेळीही दलाल यांच्या अविरोध निवडीवर काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला होता. त्याआधी २०१२ मध्ये उत्तरप्रदेशच्या कन्नौज लोकसभा मतदारसंघातून समाजवादी पक्षाच्या डिम्पल यादव अविरोध निवडून आल्या होत्या. खासदार असलेल्या अखिलेश यादव यांची उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्यानंतर त्यांनी कन्नौजच्या खासदारकीचा राजीनामा दिला आणि ते विधान परिषदेत गेले. सपाने या मतदारसंघात डिम्पल यादव यांना उमेदवारी दिली. काँग्रेस आणि बसपाने या मतदारसंघात उमेदवारी अर्जच भरला नाही, भाजपाचा उमेदवारही अर्ज दाखल करू शकला नाही. अन्य दोन उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे डिम्पल यादव यांची अविरोध निवड झाली. मुळात एखादा उमेदवार अविरोध तेव्हाच निवडून येतो, जेव्हा त्याच्याविरुद्ध रिंगणात एकही उमेदवार नसतो. अनेक वेळा काही उमेदवारांचे अर्ज तांत्रिक कारणाने म्हणजे पुरेशी कागदपत्रे न जोडल्यामुळे रद्द होतात, तर काही वेळेला उमेदवार स्वतःच निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतात. त्यामुळे रिंगणात असलेल्या एकमेव उमेदवाराला अविरोध विजयी घोषित केले जाते.

पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५१ ला झाली. यात दहा उमेदवार अविरोध निवडून आले होते. निवडून आलेले सर्वच उमेदवार काँग्रेसचे होते. १९५७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत ११ उमेदवार अविरोध विजयी झाले. १९६२ च्या निवडणुकीत तीन तर १९६७ च्या निवडणुकीत पाच उमेदवार अविरोध निवडून आले. १९७१ च्या एक तर १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत दोन उमेदवार अविरोध विजयी घोषित करण्यात आले. १९८४ च्या लोकसभा निवडणुकीतही एकमेव उमेदवार अविरोध निवडून आला होता.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री असलेले यशवंतराव चव्हाण नाशिक लोकसभा मतदारसंघात १९६३ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत अविरोध विजयी झाले होते. चीनच्या आक्रमणानंतर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलावले आणि त्यांना संरक्षण मंत्री केले. महाराष्ट्राचा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावला, असे या घटनेचे वर्णन तेव्हा करण्यात आले होते. चीनसोबतचे युद्ध संपल्यानंतर चव्हाण यांना लोकसभेत निवडून आणण्याचे ठरले. नाशिक लोकसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत चव्हाणांबद्दलचा आदर आणि कृतज्ञता म्हणून त्यांच्याविरुद्ध उमेदवार उभा न करण्याचा निर्णय सर्व राजकीय पक्षांनी घेतला. परिणामी चव्हाण अविरोध विजयी झाले. माजी अर्थमंत्री टी. टी. कृष्णमाचारी १९६२ च्या लोकसभा निवडणुकीत तामिळनाडूच्या तिरुचेंदूर मतदारसंघातून विजयी झाले होते. जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री डॉ. फारुक अब्दुल्ला, ओडिशाचे तत्कालीन मुख्यमंत्री हरेकृष्ण मेहताब, लक्षद्वीपचे पी. एम. सईद तसेच नागालॅण्डचे माजी मुख्यमंत्री एस. सी. जमीर सुद्धा अविरोध निवडून आले होते. देशाच्या पहिल्या निवडणुकीपासून २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत तीन डझनावर अविरोध विजयी झाले आहेत.

नीलम संजीव रेड्डी हे देशातील पहिले आणि एकमेव राष्ट्रपती होते, जे अविरोध निवडून आले होते. जनता पक्षाच्या कार्यकाळात रेड्डी राष्ट्रपतिपदी विजयी झाले. २५ जुलै १९७७ ते २५ जुलै १९८२ असा त्यांचा राष्ट्रपतिपदाचा कार्यकाळ होता. काँग्रेससह अन्य सर्व विरोधी पक्षांनी रेड्डी यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला होता. देशात उपराष्ट्रपतिपदासाठी १६ वेळा निवडणूक झाली, पण त्यातील फक्त चार निवडणुका अविरोध झाल्या. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् दोन्ही वेळेला उपराष्ट्रपतिपदी अविरोध निवडून आले. पहिल्यांदा १९५२ ला आणि नंतर १९५७ ला. मोहम्मद हिदायतुल्ला १९७९ मध्ये उपराष्ट्रपतिपदी अविरोध निवडून आले. त्यानंतर असे भाग्य डॉ. शंकरदयाल शर्मा यांना १९८७ मध्ये लाभले. ऑगस्ट २०२४ मध्ये राज्यसभेच्या १२ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत सर्व म्हणजे १२ उमेदवार अविरोध विजयी झाले. यात भाजपाच्या ९, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रीय लोक मोर्चाच्या प्रत्येकी एका उमेदवाराचा समावेश होता. त्याआधी फेब्रुवारी २०२४ मध्ये राज्यसभेच्या ४१ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, काँग्रेसच्या सोनिया गांधी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव अविरोध निवडून आले होते.

सामान्यपणे निवडणूक जितकी वरच्या पदाची असेल त्यात अविरोध निवडीची शक्यता जास्त असते. खालच्या पदावरील निवडणुकीत दावेदार खूप असल्यामुळे चुरस असते. २०२४ मध्ये पंजाबमध्ये सरपंचाच्या १३ हजार पदांसाठी निवडणूक झाली, त्यातील ३ हजार सरपंच अविरोध निवडून आले. एवढ्या मोठ्या संख्येत सरपंच अविरोध निवडून आल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने तेव्हा आश्चर्य व्यक्त केले. तसेच असंतुष्ट उमेदवारांना निवडणूक आयोगासमोर याचिका दाखल करण्याची अनुमती दिली. आयोगाने सहा महिन्यांत यावर निर्णय घेण्याचा निर्देशही न्यायालयाने दिला होता. या याचिकांचे पुढे काय झाले, ते मात्र समजू शकले नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील महानगर पालिका निवडणुकीत अविरोध विजयी झालेल्यांवरून वाद निर्माण करणे योग्य नाही. अविरोध निवडीचा फायदा कमी-जास्त प्रमाणात देशातील सर्वच राजकीय पक्षांना वेळोवेळी मिळाला आहे, हे विसरता येणार नाही. धनाचे आमिष दाखवून वा धमक्या देऊन कोणाला निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेण्यास भाग पाडले जाऊ नये, तो स्वेच्छेने माघार घेत असेल त्यात गैर आणि बेकायदेशीर काही नाही.

९८८१७१७८१७

---

## वाचक पत्रे

### मराठी ज्ञानभाषा होण्यासाठी संस्कृत भाषेचा आधार आवश्यक

''भाबडे भाषक ज्ञान'' हा अग्रलेख वाचला. इंग्रजी शब्दकोश छापणारे विश्वात बोलल्या जाणाऱ्या प्रभावी भाषेतील शब्द उधार घेतात हे खरे आहे. कारण इंग्रजी भाषेत नवीन शब्द निर्मिती शक्य होत नाही. पूर्वी लॅटिन व ग्रीक या प्राचीन भाषा युरोपीय भाषांना शब्दांच्या निर्मितीत साहाय्य करावयाच्या. त्यांची क्षमता संपल्याने इंग्रजी भाषेला अन्य भाषांचा आधार घेणे भाग आहे.

भारतीय भाषांवर ती वेळ येण्याचे कारण नाही. कारण भारतीय भाषांची जननी संस्कृत अजून जिवंत आहे. तिच्या शब्द निर्माण सामर्थ्यावर स्वतंत्र लेखन करता येईल. केवळ उदाहरण म्हणून आकाशवाणी व दूरदर्शनवरील बातम्या पाहू. जो बातम्या वाचतो त्याला एक वा दोन तासांपूर्वी हिंदी अथवा इंग्रजी भाषेत बातम्या लिहून दिल्या जातात. त्यांचे त्वरित भाषांतर करून त्या बातम्या वाचायच्या असतात. वेळ अत्यल्प असतो. आधुनिक शब्दावली हिंदीत लिहिली नसते. ते सरळ देवनागरी लिपीत इंग्रजी शब्द लिहितात व वाचतात. संस्कृत भाषेत असे करणे शक्य नाही. म्हणून ते नवीन शब्द तयार करतात. येथे संस्कृतच्या शब्द निर्मिती सामर्थ्याचा प्रत्यय येतो.

भारतीय भाषा संस्कृतोद्भव असल्याने संस्कृतचे नवीन शब्द स्वीकारले जाऊ शकतात आणि तसे झाले देखील आहे. उदाहरणार्थ - मराठीत अपार्टमेंटला सहनिवास, फ्लॅटला सदनिका हे संस्कृत शब्द रूढ झाले आहेत. मग आईचे दूध उपलब्ध असताना अन्य महिलेच्या दुधाकडे धाव कशाला? की येथेही परकीयांच्या अनुकरणात फुशारकी वाटते? जर परकीय भाषेचा शब्द वापरला तर त्याचे लिंग व वचन कोण ठरविणार? उदाहरणार्थ - कॉम्प्युटर चालवला म्हणावयाचे की चालवली अथवा चालवले. एकवचनात कॉम्प्युटर म्हटले तर बहुवचनात काय म्हणावयाचे? अशा लिंग वचन निर्धारित नसलेल्या विदेशी शब्दांची संख्या वाढली तर भाषेचे काय होईल? मानक भाषा राहील का? की सगळ्यांना धुडगूस घालावयाची अनुमती? अशा मिश्रित भाषेत व्यवहार करणारी आगामी पिढी मराठीत अवतरलेले मौलिक साहित्य समजू शकेल का? की जसे ज्ञानेश्वरी वाचताना अनुवादाचे साहाय्य घ्यावे लागते तसे घेणार?

संस्कृत भाषा केव्हा निर्माण झाली हे कोणालाच माहिती नाही. वेद संस्कृत भाषेत आहेत. पण ते कोणीही रचले नाहीत अशी धारणा आहे. म्हणून त्यांना अपौरुषेय म्हणतात. मनुष्याने रचलेले महाकाव्य आहे रामायण. ते आजही वाचले जाते. ज्याला संस्कृत भाषा येते त्याला अर्थ कळतो. भारतीय कालगणनेप्रमाणे रामायण त्रेतायुगात रचले गेले. श्रुती परंपरेने ते आपल्यापर्यंत पोहोचले. जर संस्कृत भाषेत काळाच्या ओघात परकीय वा प्राकृत शब्दांचे मिश्रण झाले असते तर आज संस्कृत जाणणाऱ्यांना रामायण वा महाभारत कळले असते का? सध्या जी शास्त्रे केवळ इंग्रजी माध्यमातून शिकवली जातात ती पुढे भारतीय भाषांमध्ये शिकविण्याची व्यवस्था करू, असे आश्वासन नवीन शिक्षण धोरणात दिले गेले आहे. त्या-त्या शास्त्रांच्या पाठ्यपुस्तकांचा व संदर्भ ग्रंथांचा अनुवाद मराठीत केला तर इंग्रजी भाषेची भीती असणाऱ्यांना वा गंध नसलेल्यांना तोच विषय मराठीतून शिकायला मिळेल. परिणाम - विषय अधिक चांगला समजेल व त्याचा व्यवहारात उपयोग होईल. हे करताना पारिभाषिक शब्दांची अडचण आहे. ही समस्या आपण देखील मांडली आहे. प्रत्येक भाषेत भिन्न पारिभाषिक शब्द उत्पन्न केले गेले तर केवळ त्या त्या भाषेचे जाणकार परस्पर वैचारिक देवाणघेवाण करू शकतील. अन्यथा पुन्हा इंग्रजीला शरण जावे लागेल. एका उदाहरणाने विषय स्पष्ट होईल. मराठीत ऑक्सिजनला प्राणवायू म्हणतात. शेजारील कर्नाटकात आम्लजनक म्हणतात. दोन्ही शब्द संस्कृत भाषेत तयार केले आहेत. पण अर्थ समजणार कसा? अशा समस्यांशी दोन हात करण्याची वेळ येऊ नये म्हणून पहिले संस्कृत भाषेत प्रत्येक शास्त्राचा पारिभाषिक शब्दांचा कोश असावा. तेच शब्द सर्व भारतीय भाषेत वापरले जावेत.

हे काम पंडित नेहरूंच्या काळात सुरू झाले. कोश तयार केले गेलेत. पण त्यांचा वापर कमी झाला. कोशांना अद्ययावत करण्याकडे कोणाचे लक्ष नाही. केवळ हे काम शिवाजी महाराज व सावरकरांनीच का बरे करावे? त्यांचा वारसा सांगणाऱ्यांनी का बरे करू नये? तात्पर्य काय? मराठीला ज्ञानभाषा करण्यासाठी संस्कृत भाषेचा आधार घेणे आवश्यक आहे, इंग्रजीचा नाही. संस्कृत भाषा ज्ञानभाषा आहे. त्यातील शास्त्रीय ग्रंथ मराठीत आणावेत. जगातील सगळ्या भाषांमधील ज्ञान मराठीत आणावे. पण ते आणताना मराठीच भ्रष्ट झाली तर चालेल?

**श्रीश देवपुजारी**/नागपूर

shreeshdeopujari@gmail.com

### लबाडी आखूड चादरीसारखी

आजच्या समाज जीवनात जी व्यक्ती प्रामाणिक आहे, जी प्रामाणिकपणे आपले समाज व समाजबांधवांप्रतिचे कार्य अत्यंत अगदी मनापासून करत असते ती व्यक्ती समाजातील बऱ्याच लोकांना कळत नसते.

मात्र जी व्यक्ती खोटे बोलते, अनेकांना आपल्या लबाडीने फसवते, समाजातील अनेक व्यक्तींना आपल्या लबाडपणाच्या मधुर शब्दांनी गोल-गोल फिरविते अशी व्यक्ती आज समाजाला प्रिय असते. परंतु सत्य हे कटू असते, ते कधीही पराजित होत नसते, हे समाजातील नागरिकांना कालांतराने पटल्याशिवाय राहत नाही. आपली प्रतिमा लोकप्रिय व प्रसिद्ध होण्यासाठी कधीही लबाडी करू नये, कारण ती कालांतराने उघड होते व लबाडी करणाऱ्यांची काहीच किंमत राहत नाही. लबाडी ही आखूड चादरीसारखी आहे, ती तोंडावर घेतली तर पाय उघडे पडतात व पायावर घेतली तर तोंड उघडे पडते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४३१३१२२४४

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### पाकिस्तानात 'सनातन धर्म की जय' संस्कृत श्लोकाचे पठन

**इस्लामाबाद** : पाकिस्तानमधील एका शाळेत शाळकरी मुलगा संस्कृत श्लोक म्हणत असल्याचा व्हिडिओ सध्या तुफान व्हायरल होत आहे. सिंध प्रांतातील थारपारकर जिल्ह्यातील शाळेतील हा व्हिडिओ आहे. व्हिडीओमध्ये मुलगा शिक्षकांसमोर संस्कृत श्लोक आणि कविता पठण करताना दिसत आहे. तो त्याच्या श्लोकाची सुरुवात "सनातन धर्म की जय" ने करतो, ज्यामुळे प्रत्येकजण गुरुदेवांचे स्वागत करतो. दोन्ही गुरुदेव मुलाची कविता धीराने ऐकतात आणि नंतर त्यांची स्तुती करतात. हा सुंदर व्हिडीओ इंस्टाग्रामवर मोठ्या प्रमाणात शेअर केला जात आहे. अनेक वापरकर्त्यांनी व्हिडीओ पाहिला आणि शेअर केला आहे. त्याला आतापर्यंत ५८,००० हून अधिक लाईक्स मिळाले आहेत. व्हिडिओ पाहिल्यानंतर एका वापरकर्त्याने लिहिले, "बांगलादेशकडून खूप खूप प्रेम." दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, धन्य आहेत त्यांचे शिक्षक जे त्यांच्या मुलांना अशा अद्भुत गोष्टी शिकवतात.

### मुंबई महापालिकेसाठीचे भाजपाचे प्रचार गीत आयोगाने नाकारले

**मुंबई** : राज्यभरात महानगरपालिका निवडणुकांची धामधूम सुरू असताना प्रचारालाही कमालीचा वेग आला आहे. मुंबईसह प्रमुख शहरांमध्ये आता अवघे सात दिवस प्रचारासाठी शिल्लक राहिले असून, राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. अशा निर्णायक टप्प्यावर मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजपाकडून तयार करण्यात आलेले प्रचार गीत राज्य निवडणूक आयोगाने नाकारल्याची माहिती समोर आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपाने विशेष प्रचार गीत तयार केले होते. मतदारांपर्यंत थेट पोहोचण्यासाठी आणि भावनिक अपील निर्माण करण्यासाठी संगीत, शब्द आणि प्रसिद्ध कलाकारांचा वापर करण्याची रणनीती भाजपाने आखली होती. त्यानुसार हे गीत तयार करण्यात आले होते आणि प्रचाराच्या अंतिम टप्प्यात ते मोठ्या प्रमाणावर वापरण्याचा पक्षाचा मानस होता. मात्र, प्रचाराला गती मिळण्याआधीच या गीतावर निवडणूक आयोगाने आक्षेप घेतला आणि प्रचारासाठी वापरण्यास नकार दिला. या प्रचार गीतामध्ये 'भगवा' हा शब्द वापरण्यात आल्याने निवडणूक आयोगाने आक्षेप नोंदवला आहे. निवडणूक आचारसंहितेच्या निकषांनुसार धार्मिक किंवा भावनिक स्वरूपाचे शब्दप्रयोग प्रचारात आक्षेपार्ह ठरू शकतात, असा ठपका ठेवत आयोगाने हे गीत नाकारले असल्याची माहिती आहे.

### ऑगस्टा वेस्टलँड प्रकरणात याचिका फेटाळली

**नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी ऑगस्टा वेस्टलँड व्हीव्हीआयपी हेलिकॉप्टर घोटाळ्यातील आरोपी वकील गौतम खेतान यांच्या याचिकेवर कठोर भूमिका घेतली. न्यायालयाने याला खटल्यातून वाचण्याचा प्रयत्न म्हटले आणि याचिका फेटाळून लावली. खेतान यांनी मनी लॉन्ड्रिंग कायद्याच्या एका कलमाला आव्हान दिले होते. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या न्यायासनाने म्हटले की, ही एक नवीन प्रवृत्ती बनली आहे की श्रीमंत आरोपी खटल्याला सामोरे जाण्याऐवजी कायद्याच्या वैधतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देऊ लागतात. असे लोक विचार करतात की ते व्यवस्थेला बगल देऊ शकतात, परंतु आम्ही असे होऊ देणार नाही. त्यांना सामान्य नागरिकाप्रमाणे खटल्याला सामोरे जावे लागेल. ज्येष्ठ वकील सिद्धार्थ लूथरा यांनी युक्तिवादात सांगितले की, ही याचिका कोणत्याही विशेषाधिकारासाठी नाही, तर आधीच प्रलंबित असलेल्या विजय मदनलाल चौधरी प्रकरणाच्या पुनरावलोकन याचिकांशी संबंधित आहे.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८४,९६१.१४ (-१०२.२०) |
| निफ्टी | २६,१४०.७५ (-३७.९५) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,३७,१०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. २,५०,१०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३०.९ | १४.० |
| अमरावती | ३०.० | ११.० |
| भंडारा | ३०.० | १०.० |
| बुलडाणा | २९.५ | १४.२ |
| चंद्रपूर | २९.८ | ११.८ |
| गडचिरोली | २८.६ | १०.४ |
| गोंदिया | २७.६ | ७.६ |
| नागपूर | २८.८ | ८.० |
| वर्धा | २९.८ | १०.० |
| वाशीम | २९.९ | १०.६ |
| यवतमाळ | २९.८ | ९.८ |

## प्रकरण वर्ग झालेबाबतची नोटीस

दि.कि. अर्ज नंबर ०७/२०२३
नि. नं. ६६

### माढा येथील मे.सि.ज.सि.डि. साहेब यांचे कोर्टात
(श्री. आर.एम. कराडे कोर्ट)

**श्रीमती छाया ज्ञानोवा मस्के** - **अर्जदार**
विरुध्द
**बाळासाो ज्ञानोवा मस्के / वगैरे** - **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील-
**(१) सामनेवाला नंबर १ वाळासाहेब ज्ञानोबा मस्के,** उ.व. ५०, धंदा - मजुरी, रा. नरखेड ता. मोहोळ, जि. सोलापूर
**(२) महेश ज्ञानोबा मस्के,** उ.व. ४५, धंदा - मजुरी, रा. सदर

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार यांनी दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ३८/२०१६ हा बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज सिनीअर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात दाखल केलेला होता. त्यानंतर माढा येथे नव्याने सिनीअर डिव्हीजन झालेने सदरचे किरकोळ अर्ज हा माढा येथील सिनीअर जज्ज डिव्हीजन कोर्टात वर्ग झालेले असून त्यास दि.कि. अर्ज नंबर ०७/२०२३ असा नंबर देणेत आला आहे. सदर अर्जाचे वर्ग झालेबाबतच्या नोटीस बेलिफ मार्फत आपणांस बजावणेकरीता गेले असता यातील सामनेवाला नंबर १ व २ हे वर नमुद पत्यावर राहणेस नसुन परगावी राहणेस आहेत असा बेलिफ रिपोर्ट आलेवरुन व तद्नंतर सि.पी.सी. ऑर्डर ५ रुल १७ प्रमाणे आपणास डकवून बजावणीकरीता कोर्टाचे आदेशाप्रमाणे बेलिफ आले असता मोजे नरखेड, ता. मोहोळ येथील सामनेवाला यांचे घर हे पडलेले असून सदर घराचे दर्शनी भागास चौकट वगैरे नसल्याने डकवून बजावणी करता आलेली नाही असा बेलिफ रिपोर्ट आलेवरुन,

त्याअर्थी उपरोक्त सामनेवाला नंबर १ व २ यांना या वर्ग झालेबाबतचे जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, वरील किरकोळ अर्जाचे कामी तुम्ही स्वतः अगर निर्देशित वकीलांमार्फत ता. २०/०२/२०२६ रोजी या मे. कोर्टात सकाळी ११ वा. हजर रहावे. आपण उपरनिर्देशित तारखेस या कोर्टात हजर रहाणेस कसूर केलेस आपले काही म्हणणे नाही असे समजून पुढील हुकूम केले जातील. याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस सही शिक्यानिशी प्रसिध्द केले ता. ०३/०१/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**सि.ज.सि.डि. कोर्ट माढा**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**अधिक्षक**
**सि.ज.सि.डि. कोर्ट माढा**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी कि. अर्ज नं. ०९/२०२५
नि. ५

### बार्शी येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर साहेब यांचे कोर्टात
(आर. पी. बागडे सो कोर्ट)

**श्रीमती चित्रा आप्पासाहेब संकपाळ,**
वय - ६० वर्षे, धंदा - घरकाम,
रा. जनता वसाहत, पर्वतीपायथा
वागजाई मंदिराजवळ, पुणे ता.जि. पुणे — **अर्जदार**

विरुध्द

**उमाकांत आप्पासाहेब संकपाळ**
वय - ४० वर्षे, धंदा - खासगी नौकरी,
रा. जनता वसाहत, पर्वतीपायथा
वागजाई मंदिराजवळ, पुणे ता.जि. पुणे — **सामनेवाला**

**अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट ९ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता**

ज्याअर्थी, यातील अर्जदार सध्या सदरील ठिकाणी राहत असून अर्जदार व सामनेवालेचे मुळ गाव झरेगाव, ता. बार्शी हे असून अर्जदाराचे पती आप्पासाहेब राजाराम संकपाळ यांचे गावे मौजे झरेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे जमिन गट नंबर १७४ व जमिन गट नंबर १ व जमिन गट नंबर १७९ अशी सामाईकात जमिन आहे. यातील अर्जदाराचे पती आप्पासाहेब राजाराम संकपाळ हे ता. २८/०९/२०१८ रोजी मौजे बाणेवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. त्याचे पश्चात त्यांना वारस अर्जादार ही पतनी या नात्याने सामनेवाला मुलगा या नात्याने वारस होते व आहेत. यातील अर्जदाराचे पती मयत झालेनंतर दिनांक २६/११/२०१८ रोजी संबंधीत तलाठी यांचेकडे तिचे पतीचे नाव कमी करुन यातील अर्जदाराचे व सामनेवालाचे नाव सदरील जमिनीस लावणेकामी अर्ज दिला होता. त्यावेळी संबंधीत तलाठ्यांनी नाव लावणेस नकार देऊन दिवाणी कोर्टातून वारस दाखला आणणेकामी सांगितले. म्हणून यातील अर्जदाराने सदरचा अर्ज मयत आप्पासाहेब राजराम संकपाळ यांचे वारस यातील अर्जदार या सामनेवाला असलेमुळे त्यांचे नावे वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केला आहे. यातील अर्जदाराने यापुर्वी दिवाणी कि. अर्ज नं. ६९/२०१७ या अर्ज मे.सि.ज.सि.डी. बार्शी यांचे न्यायालयात दाखल केला होता. त्यावेळी मे. कोर्टांनी रे.मु.नं. २१४/२०१५ या दाव्याचा निकाल लागलेनंतर सदरचा अर्ज दाखल केरावा आस आदेश मे. कोर्टाने केले होते. रे.मु. नंबर २१४/२०१५ हा दावा ता. ११/०३/२०२५ रोजी निकाली निघालेला आहे. त्यामुळे यातील अर्जदाराने परत मे. कोर्टाचे आदेशाप्रमाणे सदरचा अर्ज या मे. कोर्टात पुन्हा दाखल केला आहे.

त्याअर्थी यातील अर्जदारास अर्जास नमुद केलेप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाची काही हरकत व तक्रार असल्यास हे जाहीर प्रसिध्दीकरण झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली तारीख १०/०२/२०२६ रोजीपर्यंत आपल्या हरकत नोंदवाव्यात, कोणाची हरकत न आलेस पुढील यथायोग्य आदेश करतील हे जाहीर प्रसिध्दीकरण न्यायालय, कोर्टाच्या सह्या शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे तारीख ०३/०१/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय क स्तर, बार्शी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमलेली ता. २१/०२/२०२६
दि.कि. अर्ज नं. ४०/२०२५

### बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात
(पी. बी लोखंडे साहेब कोर्ट)

**मनोहर रामा उर्फ रामचंद्र कसबे,**
वय - ७५ वर्षे, धंदा - मजुरी,
रा. ए ३५/२४, अप्पर ओटा,
इंदिरा नगर, बिबवेवाडी, पुष्पम गॅसजवळ,
पुणे ता. हवेली, जि. पुणे — **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** - **सा.वाला**

ज्या अर्थी, सदर प्रकरणातील अर्जदार यांचा भाऊ सौदागर रामा कसाब उर्फ कसबे हे वृध्दापकाळाने दि. २६/०१/२०१८ रोजी मयत झालेले असून अर्जदार व मयत सौदागर कसबे यांची आई यशोदाबाई रामा कसबे ह्या दि. १६/११/१९९६ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत सौदागर रामा कसाब उर्फ कसबे यांचे नावे मौजे अलिपूर, ता. बार्शी येथे गट नं. १४/१ यापैकी क्षेत्र ० हे. ०६.५० आर अधिक पो.ख. ० हे. ०१ आर एकूण ० हे. ०७.५० आर ही मिळकत असून त्यांचे पश्चात सदर मिळकतीचे हक्कपत्रकी अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारस असल्याने त्यांनी सदर मिळकतीस त्यांचे नावाची नोंद करणेकामी मा. तलाठी साो अलिपूर यांना दि. २७/०६/२०२५ रोजी विचारणा केली असता त्यांनी वारस प्रमाणपत्राची मागणी केल्यामुळे अर्जदारांनी मयत सौदागर रामा कसाब उर्फ कसबे यांना अर्जदाराशिवाय इतर कोणीही जवळचे नातेवाईक नाहीत, अर्जदार हेच कायदेशीर वारस असून त्यांना अर्जदाराशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार हे एकमेव मयत सौदागर यांचे भाऊ असुन इतर कोणीही भाऊ, बहिण नाहीत, तरी अर्जदारांना नमुद कारणाअन्वये वारस प्रमाणपत्र दाखला अर्जदार यांचे नावचा मिळणेकामी अर्जदाराने हल्लीचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरप्रसिध्दिकरणाने कळविण्यात येते की, वर नमुद अर्जदाराचे अर्जातील मागणी व विधाना संबंधाने जर कोणाचेही आक्षेप असतील तसेच मयत सौदागर रामा कसाब उर्फ कसबे यांना अर्जदार यांचेशिवाय अन्य कोणी वारस असतील अगर तशी कोणाची खात्री असेल, तर संबंधीतांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेल्या ता. २१/०२/२०२६ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विधीज्ञामार्फत हजर होऊन आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील. हे जाहीरप्रसिध्दीकरण आमचे सही निशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी केला असे. ता. ०६/०१/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश व व. स्तर बार्शी**

## खरेदीपुर्व जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर येथील रहिवाशांना या खरेदीपुर्व जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि ।। व सब डि ।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील दक्षिण कसबा येथील सर्व्हे क्र. ५४४/ब/२ मधील घर / मिळकत क्र.५११/ब (सो.म.पा. मिळकत क्र. ०११९३५) यांसी एकूण क्षेत्र ५७ चौ.मी. अथवा ६१३.३२ चौ. फुट इतकी असून, यावर आर.सी.सी. बांधकाम असलेली दुमजली घरजागा मिळकत. यापैकी तळमजल्यावरील तीन खोल्या, संडास बाथरुम, तसेच पहिल्या मजल्यावरील एक हॉल व संडास, बाथरुम अशी दुमजली घरजागा मिळकत यांसी चतु:सिमा :- पुर्वेस - सि.स.क्र. ४६१/ब, पश्चिमेस - सि.स.क्र. ५४४ब/१, दक्षिणेस - सि.स.क्र. ४७१, उत्तरेस रस्ता, येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत.

वर नमूद प्लॉट जागा ही श्री. आनंद चंद्रशेखर भादुले यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. सदरहु मालकांनी सदरहू प्लॉट जागा आमचे अशिल-श्री. गौरव दत्तात्रय खंदारे यांना खरेदी देण्याचे ठरवून आमचे अशिलांच्या नांवे इसारा पावती लिहून दिलेले आहे. त्याप्रमाणे सदरहू प्लॉट जागा आमचे अशिलांच्या नावे रितसर खरेदीखताने देण्याचे ठरलेले आहे. तसेच सदरहु मालकांनी सदरहु प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री आमचे अशिलांना दिली आहे.

तरी परंतु वर वर्णन केलेल्या प्लॉट जागेवर अन्य कोणत्याही बँकेचे, वित्तीय संस्थेचे अथवा अन्य कोणाचेही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध व अधिकार, टाच, दान, लिज, साठेखत, पोटगी, कोर्ट दावा, गहाणखत, तारण वा बोजा वगैरे असल्यास त्यांनी ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०८ दिवसांच्या आत खालील पत्यावर लेखी कागदोपत्री हरकत आणून द्यावी अथवा लेखी स्वरुपात नोंदवावी. कोणाचीही कसलीही हरकत वा तक्रार मुदतीत न आल्यास आमचे अशिल वरील प्लॉट जागेचे खरेदीचे व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी. तद्नंतर कोणाचीही तक्रार व हरकत वर नमूद मिळकतीवर वा आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी, ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता. ०७/०१/२०२६.

**सही/-**
**ॲड. सोमनिंग शावरसिध्द पुजारी**
**ॲड. दिपक बाबासाहेब सोनवणे**
**पत्ता :- बेसकर कॉम्पलेक्स, दुसरा मजला**
**चेंबर नं.२०९, सिध्देश्वर पेठ, सोलापूर.**
**मो.नं. ८०५५६०६१०१**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३९/२०२५
निशाणी नं. ५

### बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश साो यांचे न्यायालयात

१) **अल्फिया सुभान शेख,**
वय - १६ वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. गुळसडी, ता. करमाळा जि. सोलापूर
२) **सोफिया सुभान शेख,**
वय - १४ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
३) **सरताज सुभान उर्फ सुबान शेख,**
वय - ८ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
(अर्जदार नं. १ ते ३ यांचे तर्फे
अपाक आई अर्जदार नं. ४ रिजवाना सुभान शेख)
४) **रिजवाना सुभान शेख,**
वय - ३५ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. सदर — **अर्जदार**

विरुध्द

१) **महाराष्ट्र शासन, (सदरची नोटीस मा. जिल्हा सरकारी वकिल यांचेवर बजावण्यात यावी.)**
२) **मुन्ताज राजू पठाण,**
वय - ४४ वर्षे, धंदा - शेती,
रा. वडगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर
३) **शबाना करीम मुजावर,**
वय - ३४ वर्षे, धंदा - शेती,
रा. डोंजा, ता. परांडा, जि. धाराशिव
४) **रुबीना फारूख शेख,**
वय - ४७ वर्षे, धंदा - शेती,
रा. देवळाली, ता. करमाळा, जि. सोलापूर — **सामनेवाला**

ज्याअर्थी डि सोलापूर सब डि व ता. करमाळा पैकी मौजे गुळसडी ग्रामपंचायत हद्दीतील जमिन गट नं. १५६ पैकी सामाईक हिश्याची मालकीची जमिन याचे क्षेत्र ०० हे. १५ आर याचा आकार रु. ००-२४ पैसे यासी चतु:सिमा :- पुर्वेस - श्री. विनायक देवराव पाटील यांची जमिन, दक्षिणेस - दत्तात्रय गायकवाड यांची जमिन, पश्चिमेस - हारुन कासम शेख यांची जमिन, व उत्तरेस - रुपचंद उत्तम बागल-पाटील यांची जमिन.

वर नमूद मिळकत मुळची अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडिल व अर्जदार नं. ४ चे पती सुभान नजीर शेख यांचे मालकी कब्जेवहिवाटीची अशी मिळकत होती. सदर सुभान नजीर शेख हे दि. २६/०४/२०२१ रोजी मयत झालेने त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार नं. १ ते ४ यांचे नावाची नोंद सदर मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी वारसा हक्काने झालेली आहे. सदर अज्ञानाचे भविष्यकालीन प्रगतीसाठी व पुढील शिक्षण घेण्यासाठी बराच खर्च येणार आहे. त्यामुळे अज्ञानाचे नावे असलेली वर नमूद मिळकत विक्री करणेस परवानगी मिळणेकामी यातील अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार हे सदर मिळकतीचे मालक, हक्कदार नाहीत अथवा मिळकतीत कोणाचे हितसंबंध असतील तर या जाहिर प्रसिध्दीकरणाचे तारखेपासून एक महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख २४/०२/२०२६ रोजीपर्यंत त्याने या कोर्टात स्वतः किंवा आपल्या विधिज्ञामार्फत हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न नोंदविल्यास, तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू अज्ञानाची मिळकत विक्रीची परवानगी देण्यात येईल. हे प्रसिध्दीकरण आमचे सही निशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्द केले असे ता. ०१/०१/२०२६.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**हुकुमावरून**
**अक्षीक्षक,**
**जिल्हा न्यायालय, बार्शी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. १४१/२०२५
पुढील नेमलेली दि. १८/०२/२०२६ नि.नं.५

### बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डि. सो. यांचे कोर्टात

१) **चंद्रकांत नामदेव पाठक,**
वय - ५५ वर्षे, धंदा - शेती,
रा. आगळगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **कमल नामदेव पाठक,**
वय - ६७ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर
३) **रमाकांत नामदेव पाठक,**
वय - ४३ वर्षे, धंदा - नोकरी व शेती, रा. सदर
४) **पुजा राजकुमार जोशी (सासरचे नाव)**
पुजा नामदेव पाठक (मोहरील नाव),
वय - ४५ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. गातेगाव, ता. व जि. लातूर — **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** - **सा.वाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १, ३, ४ हे एकमेकांचे सख्खे बहिण-भाऊ असून यातील अर्जदार नं. २ ही अर्जदार नं. १, ३, ४ यांची आई आहे. यातील अर्जदार नं. २ यांचे पती व अर्जदार नं. १, ३, ४ यांची वडिल कै. नामदेव बळीराम पाठक हे वृध्दापकाळाने दि. २५/११/२०२३ रोजी मौजे आगळगाव, ता. बार्शी येथे राहत्या घरी मयत झाले आहे.. कै. नामदेव बळीराम पाठक यांना अर्जदार नं. १ ते ४ हेच कायदेशीर वारस असून त्यांच्या शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत कै. नामदेव बळीराम पाठक यांचे नावे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण या योजनेअंतर्गत शासकीय घरकुल मंजूर झालेले होते त्यानंतर ते मयत झाल्यानंतर यातील अर्जदार हे पंचायत समिती व मौजे आगळगाव ग्रामपंचायत या ठिकाणी सदर घरकुलाविषयी चौकशी करीता गेले असता यातील शासकीय अधिकारी यांनी दि. १७/१०/२०२५ रोजी मयत नामदेव बळीराम पाठक यांचे कायदेशीर वारस असलेबाबतचे वारसप्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. म्हणून त्यांनी सदरचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता यातील अर्जदाराचा सदरचा अर्ज आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत कै. नामदेव बळीराम पाठक यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. १८/०२/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल, हे जाहिर प्रसिध्दीकरण कोर्टाचे सहि शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे दि. ०५/०१/२०२६

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय व स्तर, बार्शी**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर, बार्शी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. १३७/२०२५
नि.नं.५

### बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात
(श्रीमती आर.पी. बागडे सो कोर्ट)

१) **ताहेर सलिम शेख,**
वय - ३०, धंदा - शिक्षण,
रा. ४०६१, मांगडे चाळ, तुळजापूर रोड,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **जुबेर सलिम शेख,**
वय - २७, धंदा - व्यवसाय, रा. सदर
३) **अबिदा सलिम शेख,**
वय - ४९, धंदा - घरकाम, रा. सदर
४) **नसरीन मुज्जमिल सय्यद (लग्नानंतरचे नाव)**
**नसरीन सलिम शेख (लग्नापूर्वीचे नाव)**
वय - ३२, धंदा घरकाम, रा. मोहल्ला
गल्ली, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** - **सा.वाला**

**अर्ज - मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VII of १८२७ प्रमाणे वारस दाखला मिळणेबाबत**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ ते ४ हे वरील ठिकाणचे रहिवाशी आहेत. यातील अर्जदार नं. १, २ व ४ चे वडिल व अर्जदार नं. ३ चे पती सलिम उस्मान शेख हे दि. १०/०९/२०२५ रोजी बार्शी येथे मयत झालेले आहेत. सदर मयत सलिम उस्मान शेख यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ४ हे जवळचे व कायदेशीर वारस आहेत, त्यांना अर्जदार शिवाय इतर कोणीही वारस नाहीत, मयत सलिम उस्मान शेख यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ४ हे जवळचे व कायदेशीर वारस असून त्यांचे पश्चात वारस त्यांना सरकारी कामे व खासगी कामे व इतर कामाकरीता, शासकीय व इतर लाभ घेणेकरीता, यातील अर्जदार नं. १ ते ४ यांना वारस दाखला मिळणे जरुरीचे व यातील अर्जदार नं. १ ते ४ यांना वारस दाखला न मिळाल्यास अर्जदारांचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. अशा परिस्थितीत वर नमूद केल्याप्रमाणे वर नमूद मयत सलिम उस्मान शेख यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ४ हे एकमेव व जवळचे कायदेशीर वारस (Legal heirs) आहे असे जाहीर होऊन त्याप्रमाणे अर्जदार यांना (Heirship Certificate) मिळणे जरुरीचे आहे व त्यासाठी अर्जदार नं. १ ते ४ यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत सलिम उस्मान शेख यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हितसंबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २९/०१/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाच्या सही व शिक्क्यानिशी दिले आहे. दि. ०७/०१/२०२८

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर बार्शी, ता. बार्शी**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**नमुना झेड**
**(नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) पहा)**

### स्थावर मालमत्ता ताब्यात घेतलेबाबतची नोटीस

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर को/ऑप श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली.. सोलापूर हि संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (धकबाकीदार) याने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्या अर्थी खाली सही करणार्याने खालील नमूद यादीतील ऋणको यांची स्थावर मिळकतीबाबत जप्तीची नोटीस देऊन व रजी. गहाणखत अन्वये गहाण ठेवलेली यापुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणारयाने त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार प्रतीकात्मक (सिम्बोलिक) ताबा घेतलेला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या यादीतील मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बैंक ली., सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील याची नोंद घ्यावी.

| अं. क्र. | कर्जदार / जामिनदाराचे / मिळकतदाराचे पत्ता | मिळकतीचे वर्णन | सिसन/ गट नं./ क्षेत्र | दिनांक मागणी नोटीस प्रतिकात्मक ताबा |
|---|---|---|---|---|
| १ | **राकेश रामलिंग किलचे** प्रोप : राकेश रामलिंग किलचे | डी. सोलापूर व सब डी. बार्शी पैकी मौजे जामगाव (आ) हद्दीतील बिगरशेती मिळकत | गट नं. ६२ यासी क्षेत्र ००.७७.५ हे. आर. चौ.मी. आकार ००.६० चतु:सिमा :- पुर्वेस :- सदर नंबर पैकी मुकटे यांची जमिन, दक्षिणेस :- बार्शी-लातूर बायपास रस्ता, पश्चिमेस :- सदर नंबर पैकी पूनम मुकटे वगैरे यांची जमिन, उत्तरेस - गट नं. ७५ व ७६ | २३/०८/२०२४ ०७/०१/२०२६ रु. ३,८६,३०,४८१.८० व मुद्दल रु. २,९६,७९,५०६.८० यावर दि. ०१/१२/२०२३ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज, सरचार्ज व इतर खर्च |

वरील सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबा पत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडे या जाहीर प्रसिद्धीकरण दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत घ्यावा अन्यथा, तसे न केल्यास मुदतीनंतर सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे अर्ज करून पार पडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल, तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : ०७/०१/२०२६**

**सील**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक नियम) २०१४ मधील तरतुदीनुसार सोलापूर जिल्ह्यातील **क** व **ड** वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी प्रारुप (कच्ची) मतदार यादी प्रसिध्द कार्यक्रमाचे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे.

**प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी कार्यक्रम**

| अ. क्र. | सहकारी संस्थांची नावे | वर्ग |
|---|---|---|
| १ | गंगा महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | क |
| २ | तेज नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी संस्था., मर्या, वैराग, ता. बार्शी | क |
| ३ | माऊली पणन सहकारी संस्था मर्या., बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | क |
| ४ | कुलस्वामिनी अभिनव सहकारी संस्था मर्या., बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | ड |
| ५ | जिजाई अभिनव महिला सर्वव्यावसायी सहकारी संस्था मर्या., बार्शी, ता. बार्शी | ड |
| ६ | शिवशंकर पाणी वापर सहकारी संस्था मर्या., वालवड ता. बार्शी, जि. सोलापूर | ड |

**वरील संस्थाची प्रारुप (कच्ची) मतदार यादी प्रसिध्दीकरणाचे वेळापत्रक**

| प्रारुप (कच्ची) प्रसिध्द करण्याचा दिनांक | प्रारुप (कच्ची) मतदार यादीवर आक्षेप अगर दावे तालुका निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा दिनांक | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त न झाल्यास अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावयाचा दिनांक | आक्षेप अगर दावे यावर तालुका निवडणूक अधिकारी यांनी घ्यावयाचा निर्णयाचा दिनांक | प्रारूप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त झाल्यास अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावयाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०८/०१/२०२६ | ०८/०१/२०२६ ते १४/१२/२०२६ | १४/०१/२०२६ | २०/०१/२०२६ | २१/०१/२०२६ |

टीप :- उपरोक्त निवडणूक कार्यक्रम तालुका निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर. कृषी उत्पन्न बाजार समिती आवार बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर, संबंधित तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, संस्थेचे कार्यालय, संबंधित नगरपालिका, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय व संस्थेचे शाखा कार्यालय यांचे नोटीस बोडावर रितसर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. याची नोंद घेण्यात यावी.

**सही/-**
**(ए.टी. सय्यद)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी, ता. बार्शी**

## बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71    ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

याद्वारे, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्राचा अधिकृत अधिकारी असून, कलम 13 च्या उप-कलम (12) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचन करून प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची मागणी करणारी मागणी सूचना दिनांक 09/10/2025 रोजी जारी केली होती.

कर्जदाराने रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, स्वाक्षरीकर्त्याने कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (4) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचन करून त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा दिनांक 06/01/2026 रोजी सांकेतिक ताबा घेतला आहे.

याद्वारे विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला सावध करण्यात येते की त्यांनी या मालमत्तांशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार हा बँक ऑफ महाराष्ट्राच्या वर नमूद केलेल्या रकमेच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा - स्टेशन रोड** **कर्जदार -** **१. श्रीमती ज्योती नवनाथ पाटोळे** पत्ता :- टीपी क्रमांक-4, फायनल प्लॉट क्रमांक 107+108, सब प्लॉट क्रमांक 187 येथे राहणाऱ्या, प्लॉट क्षेत्र 75.00 चौरस मीटर, बांधकाम क्षेत्र-63.12 चौरस मीटर, उमा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, प्रतीक नगर, जुन्या पुणे नाक्याजवळ, सोलापूर, महाराष्ट्र-413001 **सह-कर्जदार:** **श्री. नवनाथ विश्वनाथ पाटोळे** पत्ता :- टीपी क्रमांक-4, फायनल प्लॉट क्रमांक 107+108, सब प्लॉट क्रमांक 187 येथे राहणाऱ्या, प्लॉट क्षेत्र 75.00 चौरस मीटर, बांधकाम क्षेत्र-63.12 चौरस मीटर, उमा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, प्रतीक नगर, जुन्या पुणे नाक्याजवळ, सोलापूर, महाराष्ट्र-413001. **हमीदार:** **सौ. सुवर्णमाला तुकाराम अदतराव.** पत्ता: पोस्ट-तिर्हे सोलापूर-413002. 9637336525/9273033017 **हमीदार:** **सौ. सुनीता संजय पाटील.** बिराजदार दवाखान्याजवळ, 333, लोहा मास्तर चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर-413003 | सोलापूर, प्रतीक नगर येथील श्रीमती ज्योती नवनाथ पाटोळे आणि श्री. नवनाथ विश्वनाथ पाटोळे यांच्या नावावर असलेल्या सर्व जमिनीच्या तुकड्यांचे आणि भूखंडांचे गहाणखत नोंदवा. घर आणि जमीन टीपी क्रमांक-4, अंतिम भूखंड क्रमांक 107+108, उप-भूखंड क्रमांक 187 येथे स्थित आहे. भूखंड क्षेत्र 75.00 चौरस मीटर, बांधकाम क्षेत्र 63.12 चौरस मीटर, उमा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, प्रतीक नगर, जुन्या पुणे नाक्याजवळ, सोलापूर, महाराष्ट्र-413001. **चतु:सीमा खालीलप्रमाणे:-** पूर्व : ६ मीटर रुंद रस्ता, दक्षिण - उप-भूखंड क्रमांक १८८, पश्चिम: उप-भूखंड क्रमांक १८६, उत्तर: अंतिम भूखंड क्रमांक १०१ | **मागणी सूचना:** **दिनांक : 09/10/2025.** रु. 7,04,926.68 /- +w.e.f. न लावलेले व्याज रु. 34,556.00/- व्याज दर - 10.60 दिनांक 09/10/2025 पासून एकूण: रु. 7,39,482.68/- सात लाख एकोणचाळीस हजार चारशे ब्याऐंशी रुपये आणि अडुसष्ठ पैसे फक्त) **सांकेतिक ताबा दिनांक:** **06/01/2026** |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - 06/01/2026**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### ब्रिटिश ओपन स्क्वॅशमध्ये अनाहत सिंग उपविजेती



**बर्मिंगम** : अव्वल मानांकित भारतीय स्क्वॅशपटू अनाहत सिंगला मंगळवारी बर्मिंगम विद्यापीठात झालेल्या प्रतिष्ठित ब्रिटिश ज्युनियर ओपन स्क्वॅश स्पर्धेच्या १९ वर्षांखालील महिलांच्या अंतिम फेरीत चार अटीतटीच्या गेममध्ये पराभव पत्करावा लागला. जगात २९ व्या क्रमांकावर असलेल्या अनाहतला अंतिम फेरीत फ्रान्सच्या दुसऱ्या मानांकित लॉरेन बाल्टायनने ९-११, ११-७, ३-११, ९-११ अशा गुणांनी पराभूत केले. ती विविध वयोगटांमध्ये तिच्या नवव्या अंतिम फेरीत खेळत होती. या प्रतिष्ठित स्क्वॅश स्पर्धेत तिने पहिल्यांदाच १९ वर्षांखालील महिलांच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत तिने इजिप्तच्या मलिका एल कराक्सी हिचा अवघ्या २८ मिनिटांत ११-८, ११-७, ११-९ असा पराभव केला. दिल्लीच्या या खेळाडूसाठी २०२५ हे वर्ष यशस्वी ठरले. ■

### गिल, न्यूझीलंड संघ बडोद्यात दाखल

**बडोदा** : भारत व न्यूझीलंड यांच्यात आगामी ११ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय वन-डे संघाचा कर्णधार शुभमन गिल बुधवारी बडोदा विमानतळावर दाखल झाला. या आगमनामुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले, कारण भारतीय कर्णधारासोबतच न्यूझीलंडचा संघही त्याच दिवशी शहरात पोहोचला. विमानतळावर आपल्या कर्णधाराची एक झलक पाहण्यासाठी उपस्थित असलेल्या चाहत्यांनी गिलचे जोरदार स्वागत केले. २६ वर्षीय भारतीय फलंदाजानेही स्मितहास्य करून चाहत्यांना अभिवादन केले. दुपारी, विराट कोहली वडोदरा विमानतळावर पोहोचल्यावर त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. चेस मास्टरचे स्वागत करण्यासाठी मोठी गर्दी जमली होती व संपूर्ण विमानतळावर ''कोहली, कोहली''च्या घोषणा घुमत होत्या. आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ च्या संघातून वगळल्यानंतर ही मालिका गिलसाठी पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा असेल.

### डब्ल्यूपीएल पुन्हा एकदा जिंकायचेय् : हरमनप्रीत कौर

**मुंबई** : पूर्वीच्या हंगामाप्रमाणेच या हंगामातही आमच्या मुंबई इंडियन्स (एमआय) संघाची मानसिकता पुन्हा एकदा डब्ल्यूपीएल जिंकण्याचीच आहे, असा विश्वास एमआयची कर्णधार हरमनप्रीत कौरने व्यक्त केला. एमआय हा या स्पर्धेतील सर्वात यशस्वी संघ असून त्यांनी २०२३ व २०२५ मध्ये दोनदा विजेतेपद पटकावले आहे. आगामी हंगामापूर्वी एमआयने एक यशस्वी मेगा-लिलाव केला व आपले मुख्य खेळाडू कायम ठेवले, तसेच काही दर्जेदार भारतीय देशांतर्गत क्रिकेटपटूंना संघात घेऊन आपल्या संघाला अधिक मजबूत केले. देशात उपलब्ध असलेल्या खेळाडूंच्या मोठ्या संख्येमुळे संघात नवीन प्रतिभेचा समावेश झाल्याने ती आणि व्यवस्थापन आनंदी आहेत, असे हरमनप्रीत म्हणाली. मुंबई माझ्यासाठी नेहमीच खास राहिली आहे. हे माझ्यासाठी एक विशेष शहर आहे आणि मला येथे अनेक सकारात्मक परिणाम मिळाले आहेत. हा हंगाम खूप खास असणार आहे, अशी आशा आहे. आमची मानसिकता तीच राहील; म्हणजेच, पुन्हा एकदा जिंकायचे आहे. ४-५ वर्षांपूर्वी, फक्त २०-२५ खेळाडूंचा एक गट होता, पण आता खेळाडूंची संख्या खूप मोठी आहे. आमच्या आजूबाजूला अधिक प्रतिभा पाहून आम्ही आनंदी आहोत,'' असे दोन वेळा विजेतेपद जिंकलेल्या कर्णधाराने स्पर्धेच्या चौथ्या हंगामापूर्वी माध्यमांशी बोलताना सांगितले. सर्व संघांतील खेळाडूंसाठी ही स्पर्धा महत्त्वपूर्ण असेल, कारण या वर्षी जूनमध्ये इंग्लंडमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी राष्ट्रीय संघात स्थान मिळवण्याचे त्यांचे ध्येय आहे.

### महिला टी-२० विश्वचषक पात्रता फेरी १८ जानेवारीपासून

**दुबई** : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) सुपर सिक्स टप्प्यासह महिला टी-२० विश्वचषक २०२६ पात्रता फेरीचे संपूर्ण वेळापत्रक निश्चित केले आहे. इंग्लंड आणि वेल्समध्ये जून-जुलैमध्ये होणाऱ्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेतील चार जागांसाठी दहा संघ १८ जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान नेपाळमध्ये स्पर्धा करतील. १८ जानेवारीपासून गट साखळी सामने त्रिभुवन विद्यापीठ क्रिकेट मैदान आणि अप्पर मुलपानी क्रिकेट मैदानावर खेळवले जातील. सकाळच्या सत्रात नेपाळचा सामना थायलंडशी होईल, तर बांगलादेशचा सामना अमेरिकेशी होईल. दुपारच्या सत्रात झिम्बाब्वे नेदरलॉण्डशी खेळेल आणि आयर्लण्ड पापुआ न्यू गिनीला आव्हान देईल. स्कॉटलंड आणि नामिबिया त्यांचे पहिले सामने २० जानेवारी रोजी खेळतील. गट टप्प्यात दर दुसऱ्या दिवशी चार सामने होणार आहेत. गट अ आणि गट ब मधील अव्वल तीन संघ सुपर सिक्समध्ये प्रवेश करतील.पात्र ठरणारे चार देश निश्चित करणारे सामने २८ जानेवारी, ३० जानेवारी आणि १ फेब्रुवारी रोजी होणार आहेत. अमेरिका, बांगलादेश, आयर्लण्ड, पापुआ न्यू गिनी आणि नामिबिया यांना गट अ मध्ये, तर नेपाळ, थायलंड, झिम्बाब्वे, नेदरलॉण्ड व स्कॉटलंड यांना गट ब मध्ये स्थान देण्यात आले आहे. ■

# सिंधूचे विजयी पुनरागमन

### मलेशिया ओपन बॅडमिंटन



पी. व्ही. सिंधू

◆ **क्वालालम्पूर, ७ जानेवारी**

दुखापतीमुळे दीर्घकाळ विश्रांतीनंतर पुनरागमन करणाऱ्या भारतीय स्टार बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूने बुधवारी येथे मलेशिया ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत चीन तैपेईच्या सुंग शुओ युनचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळविले.

३० वर्षीय माजी विश्वविजेत्या सिंधूने, गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये पायाच्या दुखापतीतून सावरण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी सर्व बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर स्पर्धांमधून माघार घेतली होती, तिने सुंगचा ५१ मिनिटांपेक्षा कमी वेळात २१-१४, २२-२० असा पराभव केला.

तथापि, जागतिक क्रमवारीत १७ व्या क्रमांकावर असलेल्या ध्रुव कपिला व तनिषा क्रास्टो या मिश्र दुहेरीच्या जोडीला ३२ च्या फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले. त्यांना कमी मानांकित अमेरिकन जोडी प्रेस्ली स्मिथ आणि जेनी गाई यांच्याकडून १५-२१, २१-१८, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला. हा सामना ५६ मिनिटे चालला.

१८ व्या क्रमांकावर असलेल्या सिंधूने कोणतीही अस्वस्थता न दाखवता कमी मानांकित सुंगचा दुसऱ्यांदा पराभव केला आणि हेड-टू-हेड रेकॉर्ड २-० असा केला. आता तिचा सामना १६ च्या फेरीत जपानच्या जागतिक क्रमवारीत ९ व्या क्रमांकावर असलेल्या टोमोका मियाझाकीशी होईल.

मियाझाकीने पुढील फेरीत प्रवेश केला कारण तिची १० व्या क्रमांकाची प्रतिस्पर्धी, दक्षिण कोरियाची सिम यू जिन हिने २१-१९, १-२ अशा स्थितीत असताना दुखापतीमुळे माघार घेतली.

आक्रमक सिंधूने सुरुवातीला ६-२ अशी आघाडी घेतली आणि पहिल्या गेममध्ये प्रतिस्पर्ध्यावर वर्चस्व गाजवले.

तथापि, दुसरा गेम अत्यंत चुरशीचा ठरला, परंतु सिंधूने निर्णायक शेवटचे दोन गुण मिळवून सामना जिंकला. भारताची अव्वल पुरुष दुहेरी जोडी चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रन्कीरेड्डी आज नंतर चीन तैपेईच्या यांग पो-ह्सुआन आणि ली झे-हुई या जोडीविरुद्ध आपला पहिल्या फेरीचा सामना खेळणार आहे. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशला भारतातच खेळावे लागणार

### आयसीसीने सामन्यांचे स्थळ बदलण्याची मागणी फेटाळली

### अन्यथा गुण गमवावे लागणार

◆ **दुबई, ७ जानेवारी**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) बांगलादेश क्रिकेट मंडळाची (बीसीबी) टी-२० विश्वचषकाचे ठिकाण बदलण्याची मागणी फेटाळून लावली आहे. बांगलादेशला टी-२० विश्वचषकातील आपली सर्व साखळी सामने भारतातच खेळावे लागतील, अन्यथा त्यांना आपले गुण गमवावे लागेल, असे आयसीसीने स्पष्ट केले आहे.

मुस्तफिझूर रहमानला आयपीएलमधून वगळल्यानंतर, बीसीबीने सुरक्षा कारणांचा हवाला देत भारतात टी-२० विश्वचषकाचे सामने खेळण्यास नकार दिला होता आणि आयसीसीला आपले सामने श्रीलंकेत हलवण्याची विनंती केली होती.

मंगळवारी आयसीसीचे अध्यक्ष जय शाह व काही इतर पदाधिकारी मुंबईत उपस्थित होते. त्यांनी आधी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि त्यानंतर बांगलादेश क्रिकेट मंडळाशी चर्चा केली.

टी-२० विश्वचषक स्पर्धेतील सामन्यांच्या ठिकाणामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही व बांगलादेशला भारतातच विश्वचषकाचे सामने खेळावे लागतील, अन्यथा त्यांना गुण गमवावे लागतील, असे आयसीसीने बांगलादेशला ठणकावून सांगितले.

**मुस्तफिझूर रहमान बाहेर**

गत १६ डिसेंबर रोजी आयपीएल मिनी लिलावात कोलकाता नाईट रायडर्सने बांगलादेशी गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला ९.२० कोटी रुपयांना विकत घेतले होते. यानंतर बांगलादेशात घडलेल्या काही घटनांवरून भारतात विरोध दिसून आला. नंतर ने मुस्तफिजुरला खेळण्याची परवानगी दिली नाही आणि ३ जानेवारी रोजी केएआरने त्याला करारमुक्त केले.

**बांगलादेशची आयपीएल प्रसारणावर बंदी**

केकेआरने मुस्तफिझूरला हटविल्यानंतर बांगलादेश क्रिकेट मंडळ व तेथील सरकारने आयपीएलच्या प्रसारणावर बंदी घातली. तसेच, भारतात विश्वचषक सामने खेळण्यासही नकार दिला व आयसीसीला ठिकाण बदलण्यासाठी ई-मेल पाठवला.

**पाकिस्तानही भारतात खेळणार नाही**

टी-२० विश्वचषकात पाकिस्तानने आपले सामने आधीच श्रीलंकेत हलवले आहेत. भारत आणि पाकिस्तानमधील राजकीय वादामुळे दोन्ही संघ एकमेकांच्या देशात क्रिकेट खेळत नाहीत.

भारताने गत वर्षी चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने पाकिस्तानात खेळले नव्हते. आता पाकिस्तानही भारतात टी-२० विश्वचषकाचे सामने खेळणार नाही. इतकेच काय, भारत-पाकिस्तान सामनाही श्रीलंकेतील कोलंबो येथे खेळला जाईल. जर बांगलादेशचे सामने श्रीलंकेत हलवले गेले, तर असे दुसऱ्या संघासोबत होईल, जो वादामुळे भारतात विश्वचषक खेळणार नाही. (वृत्तसंस्था)

# वन-डे मालिकेवर लक्ष, टी-२० विश्वचषकावर नाही : मिचेल

◆ **मुंबई, ७ जानेवारी**

न्यूझीलंड संघ अजून एक महिना दूर असलेल्या टी-२० विश्वचषकाचा विचार करत नसून, आगामी मर्यादित षटकांच्या मालिकेत भारतीय गोलंदाजांचा सामना करण्याच्या तात्काळ आव्हानावर लक्ष केंद्रित करत आहे, असे फलंदाज डॅरिल मिचेलने बुधवारी सांगितले.

विराट कोहली आणि रोहित शर्मासारखे खेळाडू संघात असताना, भारतीय संघ रविवारपासून सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत आणि त्यानंतर पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत न्यूझीलंडचा सामना करेल. टी-२० विश्वचषक स्पर्धा ७ फेब्रुवारी ते ८ मार्च दरम्यान भारत आणि श्रीलंकेत होणार आहे.

आम्ही एका महिन्यानंतर टी-२० विश्वचषकाचा विचार करू. सध्या आम्ही भारतासोबतच्या एकदिवसीय मालिकेबद्दल चिंतित आहोत आणि त्यांच्याकडे बुमराह आणि चक्रवर्तीसारखे काही खूप चांगले गोलंदाज आहेत, असे मिचेलने येथे टीसीएम स्पोर्ट्ससोबत आयोजित न्यूझीलंड क्रिकेट गोल्फ डे दरम्यान माध्यमांशी बोलताना सांगितले.

आम्हाला जागतिक दर्जाच्या भारतीय संघाविरुद्ध भारतीय परिस्थितीत, पूर्ण भरलेल्या स्टेडियममध्ये तीन एकदिवसीय सामने खेळायला मिळत आहेत. त्यामुळे आम्ही जिथे आहोत तिथेच लक्ष केंद्रित करू. आम्ही वर्तमानावर नियंत्रण ठेवू आणि एका महिन्यानंतर विश्वचषकाची वाट पाहू, असे तो म्हणाला.

विशेष म्हणजे, बुमराह आणि चक्रवर्ती दोघेही एकदिवसीय मालिकेचा भाग नाहीत, परंतु ते टी-२० मालिकेत खेळणार आहेत. फिरकी गोलंदाजांना सामोरे जाताना भारतात खेळण्याचा अनुभव कामी येईल, असे मिचेल म्हणाला.

मी आता काही काळापासून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळत आहे आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्याचा एक भाग म्हणून तुम्हाला जगभरातील वेगवेगळ्या परिस्थितींशी जुळवून घ्यावे लागते. गत काही वर्षांतील अनुभवांचा फायदा मला घेता येईल आणि २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकासारख्या सकारात्मक गोष्टींचा विचार करता येईल, असेही तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलियाला १८३ धावांची आघाडी

### अंतिम अॅशेस कसोटी

### स्मिथची १३८ धावांची खेळी

### जेकब बेथेलचे नाबाद शतक

◆ **सिडनी, ७ जानेवारी**

स्टीव्ह स्मिथची १३८ धावांची व ब्यू वेबस्टरच्या नाबाद ७१ धावांच्या खेळीच्या बळावर ऑस्ट्रेलियाने इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या अॅशस कसोटी सामन्यात चौथ्या दिवशी ५६७ धावांचा डोंगर उभा केला आणि पहिल्या डावात १८३ धावांची आघाडी मिळविली. दिवस अखेर इंग्लंडने पिछाडी भरून काढत ७५ षटकांत ८ बाद ३०२ धावा केल्या. जेकब बेथेलने १४२ धावांवर नाबाद राहिला. सध्या इंग्लंड ११९ धावांनी आघाडीवर आहे.

इंग्लंडच्या पहिल्या डावातील ३८४ धावांना प्रत्युत्तर देताना ऑस्ट्रेलियाने ७ बाद ५१८ धावसंख्येवरून चौथ्या दिवसाच्या खेळाला सुरूवात केली. ऑस्ट्रेलियाने १३३.५ षटकांत सर्वबाद ५६७ धावा उभारल्या. इंग्लंडने सकाळच्या सत्रात ४९ धावांत तीन बळी घेतले. स्टीव्ह स्मिथने २२० चेंडूंचा ासमना करत १६ चौकार व एका षट्कारसह १३८ धावांची खेळी केली, तर ब्यू वेबस्टर ७१ धावांवर नाबाद राहिला.



जेकब बेथेल : नाबाद १४२, चेंडू २३२, चौकार १५

हे शतक स्मिथचे अॅशेस कसोटीतील १३वे, कारकिर्दीतील ३७वे आणि सिडनी क्रिकेट मैदानावरील पाचवे शतक होते. यासह, तो सर्वाधिक कसोटी शतकांच्या सर्वकालीन यादीत सहाव्या स्थानावर पोहोचला आहे.

इंग्लंडच्या दुसऱ्या डावाची सुरुवात वाईट झाली. एका धावेवर असताना सलामीर झॅक क्रॉवलीला मिचेल स्टार्कने पायचित केले, परंतु त्यनंतर बेन डकेट व जेकब बेथेलने इंग्लंडचा डाव सावरला. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी ८१ धावांची भागीदारी केली. डकेटने ५५ चेंडूंत ६ चौकारांच्या मदतीने ४२ धावा केल्या. त्यानंतर जेकब बेथेलला हॅरी ब्रुक (४२) व जेमी स्मिथ (२६) व ब्रायटन कार्सेची (१६) थोडीफार साथ मिळाली. बेथेलने दिवस अखेरपर्यंत फलंदाजी करत २३२ चेंडूंत १५ चौकारांसह नाबाद १४२ धावांची खेळी केली.

पहिल्या तीन कसोटी सामने जिंकून ११ दिवसांत अॅशेस मालिका राखल्यानंतर, ४-१ ने मालिका विजय पूर्ण करण्यासाठी ऑस्ट्रेलियन संघ विजयासाठी प्रयत्न करेल. मेलबर्नमधील चौथ्या कसोटीत दुष्काळ संपवणारा विजय मिळवल्यानंतर इंग्लंड संघ पराभवाचे अंतर कमी करण्यासाठी दृढनिश्चयी आहे. (वृत्तसंस्था)



# पुण्याच्या राकेशभाऊ घुले कबड्डी संघास विजेतेपद

### कर्मवीर मामासाहेब जगदाळे जयंतीनिमित्त राज्य कबड्डी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**

**बार्शी, दि ७ जानेवारी-**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त झालेल्या राज्य कबड्डी स्पर्धेत मुंबई उपनगरच्या स्वस्तीक क्रीडा मंडळास हरवून पुण्याच्या राकेशभाऊ घुले कबड्डी संघाने विजेतेपद पटकाविले. तृतीय स्थान शिवप्रतिष्ठान क्रीडा मंडळ धाराशिवने संपादिले

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी, महाराष्ट्र कबड्डी असोसिएशन, सोलापूर कबड्डी असोसिएशन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यम ाने आयोजित या स्पर्धेत राज्यातील नामवंत ८ संघांनी सहभाग नोंदवला होता. प्रथम तीन संघास अनुक्रमे ३१, २१ व ११ हजार रुपयांचे परितोषिक व चषक देण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभास डॉ. लक्ष्मीकांत दामा (कुलगुरु) आणि मा. आमदार राजेंद्र विठ्ठल राऊत (बार्शी) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य राजेंद्र पवार होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, सदस्य दिलीप मोहिते, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अधिष्ठाता डॉ. शशिकांत तांबे, पोलीस निरीक्षक ढेरे, म ाजी नगराध्यक्ष रमेश पाटील, नगरसेवक भारत पवार, महाराष्ट्र महिला कबड्डी असोसिएशनच्या अंधारे मॅडम, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. करंडे आदी उपस्थित होते. कार्यक्रम ाचे प्रास्ताविक प्रा. रोहित डिसले यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्राचार्य डॉ. एस. बी. करंडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. प्रेमा दळवी व प्रा. रुपाली शिंदे यांनी केले.

**वैयक्तिक पारितोषिके** : चढाई- विशाल ताटे, संरक्षक-विक्रम परमार, अष्टपैलू-ज्ञानेश्वर जाधव

### द्वितीय खेलो इंडिया बीच स्पर्धा

# बीच कबड्डीत महाराष्ट्र उपांत्य फेरीत

**दीव, दि. ७ जानेवारी-**

खेलो इंडिया बीच स्पर्धेत अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्राच्या कबड्डी संघाने विजयी घोडदौड कायम राखत उपांत्य फेरीत मजल मारली आहे. साखळीतील दुसऱ्या लढीतीत उत्तराखंडला महाराष्ट्राने धुळ चारली. बीच सॉकरमध्येही महाराष्ट्राच्या पुरूष संघाने अरूणाचल प्रदेशचा पराभव करीत विजयी सलामी दिली. महिलांच्या बीच कबड्डीत हरियाणाकडून ४७-२६ गुणांनी महाराष्ट्र पराभूत झाला तर बीच सॉकरमधील साखळीतील सलग दोन पराभवामुळे महिला संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे.



दीवमधील घोघला समुद्र किनाऱ्यावर रंगलेल्या बीच कबड्डीत महाराष्ट्राने उत्तराखंडचा ४३-३३ गुणांनी पराभव करीत उपांत्य फेरीतील प्रवेश निश्चित केला. लढतीतच्या सुरूवातीपासून महाराष्ट्राने आपले वर्चस्व गाजवले. अभिषेक गुंगेने पहिलीच चढाई यशस्वी करीत महाराष्ट्राचे खाते उघडले. पाठोपाठ दादासो पुजारने यशस्वी पकड घेत मैदान गाजवले. अभिषेक गुंगेसह सुरज दूंदळे यशस्वी चढाय्या केल्या. पूर्वार्धात उत्तराखंडने कडवी झुंज दिली. पूर्वार्धात १९-१८ गुणांसह केवळ १ गुणांनी महाराष्ट्र आघाडीवर होता. उत्तरार्धात आक्रमक खेळ करीत महाराष्ट्राने १० गुणांनी लढत जिंकली. सुरज दूंदळेनेही यशस्वी पुरूष संघानेही बलाढ्य दिल्लीला ४७ -२० गुणांनी पराभूत करीत विजयी सलामी दिली.

सलग दोन विजयामुळे महाराष्ट्राने उपांत्य फेरीतील प्रवेशासह पदकही निश्चित केले आहे. बीच सॉकर मैदानातही जय महाराष्ट्राने दुमदुमले. महाराष्ट्राच्या पुरूष संघाने अरूणाचल प्रदेशला ६-३ गोलने पराभव केले. महाराष्ट्रासाठी ४ थ्या मिनिटाला समर्थ कांबळेने पहिला गोल करून आक्रमक खेळाचे प्रदर्शन घडवले. पाठोपाठ मानस मोरेने २२ व्या व ३२ व्या मिनिटाला सलग दोन गोल केले. पूर्वाधात ३-३ गोलची बरोबरी केल्याने सामन्यात चुरस कायम राहिली. उत्तरार्धात महाराष्ट्राची हुकुमत प्रकटली. कवीश दवणेसह साहिल डोंगरेने दोन गोल करीत ६-३ गोलने लढत जिंकून विजयी सलामी दिली. महाराष्ट्राची दुसरी लढत हिमाचल प्रदेशविरूध्द रंगणार आहे.

### क्रीनाशीला कांस्यपदक

बीच पेंचक सिलटमध्ये मुंबईच्या क्रीनाशी येवलेने सलग दुसऱ्या वर्षी कांस्यपदकाची कमाई केली. बीच पेंचक सिलटमध्ये महाराष्ट्राने विजयी घोडदौड सुरू केली. तुंगल प्रकारातील उपांत्यूपर्व फेरीत मुंबईच्या क्रीनाशी येवलेने कर्नाटकच्या रिशीकाला ३७५-३६८ गुणांनी पराभूत केले. क्रीनाशीने उपांत्य फेरीत धडक मारल्याने महाराष्ट्राचे स्पर्धेतील पहिले पदक निश्चित केले होते. उपांत्य लढतीत मध्यप्रदेशच्या भूमिका जैनने ४०७ ४१३ गुणांनी भूमिकने बाजी मारली. क्रीनाशीला भूमिकाने पराभूत केल्याने कांस्य पदकवर समाधान मानावे लागले. मुंबईत कोपरखैरणे येथे वडिल किशोर येवले यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीनाशीचा सराव सुरू असतो.





# लक्ष्मीनगर सांगोला, उत्कर्ष क्रीडा मंडळ तृतीय

**तभा वृत्तसेवा,**

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

महाराष्ट्र पोलिसच्या वर्धापन दिनानिमित्त सुरु असलेल्या १७ वर्षांखालील गटाच्या खो-खो स्पर्धेत मुलांच्या गटात न्यू गोल्डन मंद्रूप व छत्रपती शिवाजी प्रशाला वीट (करमाळा) आणि मुलींच्या गटात वसंतराव काळे प्रशाला वाडीकुरोली (पंढरपूर) व समृद्धी स्पोर्टस् क्लब सोलापूर यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला. मुलांच्या गटात उत्कर्ष क्रीडा मंडळ सोलापूर व मुलींच्या गटात लक्ष्मीनगर सांगोलाने तृतीय स्थान संपादिले.

ग्रामीण पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर या स्पर्धेस बुधवारी सुरुवात झाली. याचे उद्‌घाटन उपविभागीय पोलिस अधिक्षक संकेत देवळेकर यांनी केले. यावेळी पोलिस निरीक्षक बाजीराव पवार, सहाय्यक पोलिस निरीक्षक कदम, क्रीडा प्रमुख संतोष म्हेत्रे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक चंगरपल्लू, पोलिस नाईक प्रवीण राठोड, पोलिस शिपाई रमेश पवार, पोलिस हवालदार रसूल शेख, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे तांत्रिक समिती सचिव शिवशंकर राठोड, पंच श्रीकांत चव्हाण, विजय आडगळे, आनंद जगताप आदी उपस्थित होते.

# श्रेयस अय्यर खेळण्यासाठी तंदुरुस्त

### सेंटर ऑफ एक्सलन्समधून सुटी

### न्यूझीलंडविरुद्ध पहिला वन-डे खेळणार

◆ **बंगळुरू, ७ जानेवारी**

भारतीय संघाचा उपकर्णधार श्रेयस अय्यर न्यूझीलंडविरुद्धची वन-डे मालिका खेळण्यासाठी पूर्णपणे तंदुरुस्त झाला आहे. बुधवारी त्याचे पुनर्वसन पूर्ण झाले आणि त्याला बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समधून सुटी मिळाली आहे.

अय्यरचे पुनर्वसन पूर्ण झाले आहे आणि त्याला सुटी देण्यात आली आहे, असे बीसीसीआयच्या सेंट्रल ऑफ एक्सलन्सचे प्रमुख व्ही. व्ही. एस. लक्ष्मण यांनी मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांना ई-मेलद्वारे कळविले आहे.



३१ वर्षीय श्रेयसला न्यूझीलंडविरुद्धच्या वन-डे मालिकेसाठी संघात समाविष्ट केले होते. पण, त्याला आपला मॅच फिटनेस सिद्ध करायचा होता. अय्यरने एक दिवसापूर्वी विजय हजारे चषकामध्ये मुंबईकडून हिमाचल प्रदेशविरुद्ध ८२ धावांची खेळी करून आपला तंदुरुस्ती सिद्ध केली होती.

श्रेयसला ३ जानेवारी रोजी न्यूझीलंडविरुद्धच्या वन-डे संघात समाविष्ट करण्यात आले होते. त्याने गत महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात नियमित जिम व फिटनेस रूटीन सुरू केले होते. त्यावेळी त्याचे सर्व अहवाल सामान्य आले होते.


**न्यूझीलंडविरुद्ध पहिला वन-डे खेळू शकतो अय्यर**

श्रेयस अय्यर न्यूझीलंडविरुद्ध पहिला वनडे सामना खेळू शकतो. हा सामना बडोद्यात ११ जानेवारी रोजी खेळविला जाणार आहे. त्यानंतर १४ ला राजकोट आणि १८ ला इंदूरमध्ये वन-डे सामने खेळले जातील. अय्यर टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाचा भाग नाही.

श्रेयस अय्यर गत वर्षी २५ ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या वन-डेमध्ये जखमी झाला होता. त्याला सिडनी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याला प्लीहाची दुखापत झाली होती. या दुखापतीतून सावरण्यासाठी त्याला ३ महिन्यांचा कालावधी लागला. (वृत्तसंस्था)

# अवैध मुरुम तस्करांचा महिला वन अधिकाऱ्यावर जीवघेणा हल्ला

## खरातवाडी वनपरिक्षेत्रातील घटना, प्रसंगावधानामुळे अधिकारी सुखरूप, आरोपींवर गुन्हा दाखल




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ जानेवारी -**

पंढरपूर वनपरिक्षेत्रातील मौजे खरातवाडी (गट नं. २८०) येथे दि. ६ रोजी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास शासकीय कर्तव्य बजावत असताना वनपरिक्षेत्र अधिकारी (आरएफओ) श्रीमती शितल बालाजी चाटे यांच्यावर मुरूम माफियांकडून अंगावर टिपर घालून प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. चाटे यांनी वेळेत बाजुला उडी मारल्याने त्या बचावल्या आहेत. करकंब पोलीस ठाण्यात या प्रकरणी चार आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीमती शितल चाटे, वनपाल बापूराव शंकरराव भोई हे गस्तीवर होते. तेव्हा त्यांना खरातवाडी वनक्षेत्रातून ३ टिपर अवैध गौण खनिज (मुरूम) भरून जाताना आढळले.

यातील एका टिपरचा क्रमांक (एमएच-१६-एवाय ६८१६) होता. तर दोन टिपर विना-नंबर प्लेट होते. श्रीमती चाटे यांनी सदर वाहने थांबवून, मी वनपरिक्षेत्र अधिकारी आहे असे स्पष्ट सांगून वाहनचालकास स्वतःचा परिचय करून दिला. तसेच वाहन चालकांकडे परवान्याची मागणी केली. तेव्हा त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. या वाहनांमध्ये अवैध मुरूम असल्याचे निष्पन्न झाल्याने, ती जप्त करून वन कार्यालयात नेण्याचे आदेश देण्यात आले. वाहने जप्त करून नेत असताना, आरोपी सिद्धार्थ चंद्रकांत नाईकनवरे (रा. व्होळे ता. पंढरपूर) याने बनाव करून टिपर थांबवला.

अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, त्याने वनविभाग तुमच्या बापाचा नाही अशा अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. त्याचवेळी, तोंडाला रुमाल बांधलेला एक अनोळखी इसम तिथे आला. श्रीमती चाटे यांनी त्यालाही आपली ओळख पत्र दाखवून परिचय दिला. तरीही त्याने वाद घालत श्रीमती चाटे यांचा मोबाईल बळजबरीने हिसकावून घेतला. तर अनोळखी इसमाने गाडी चालू केली. श्रीमती चाटे यांनी गाडी न हलवण्याबाबत कायदेशीर समज दिली. तरी देखील आरोपीने तुम्ही बाजूला व्हा, नाहीतर मी टिपर तुमच्या अंगावर घालीन अशी उघड धमकी दिली. त्यानंतर जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याने मुरूमाने भरलेला भरधाव टिपर श्रीमती चाटे यांच्या अंगावर घातला. यावेळी श्रीमती चाटे यांनी प्रसंगावधान राखून बाजूला उडी घेतल्याने त्या या भीषण हल्यातून थोडक्यात बचावल्या. सुदैवाने त्यांना कोणतीही दुखापत झाली नाही, मात्र आरोपींनी शासकीय जप्तीतील वाहने घेऊन पळ काढला.

### यांच्यावर कारवाई

या प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीमती शितल चाटे यांच्या फिर्यादीवरून करकंब पोलीस ठाण्यात सिद्धार्थ चंद्रकांत नाईकनवरे (रा. व्होळे, ता. पंढरपूर), चंद्रकांत बाळासाहेब घोडके (रा. व्होळे, ता. पंढरपूर) आणि दोन अनोळखी इसम यांच्या विरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. याप्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निलेश गायकवाड हे करीत आहेत.

"या प्रकरणी वनविभागामार्फत वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे. वन अधिकारी आणि कर्मचारी आपले कर्तव्य बजावताना अशा हल्यांना भीक घालणार नाहीत. अवैध व्यवसायांवर कडक कारवाई सुरूच राहील, असा संदेश वन विभागाने दिला आहे.

**- श्रीमती शितल चाटे**
**(वनपरिक्षेत्र अधिकारी)**

# निंबर्गी पंचायत समिती गणात
## शैलजा जानकरांच्या उमेदवारीची चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर,दि.७जानेवारी-**



दक्षिण तालुक्यातील निंबर्गी पंचायत समिती गण अनूसूचित जातीसाठी आरक्षित आहे. या गणातून शैलजा सिद्धाराम जानकर या निवडणूक लढण्यास इच्छुक असून भाजपाकडून उमेदवारी मिळणार असल्याच्या चर्चांना उधाण आली आहे.

गोरगरिबांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरणे, महिलांच्या अडचणी सोडविण्यासाठी जानकर नेहमी प्रयत्नशील असतात. शिवाय शासकीय योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे या सगळ्या बाबतीत जानकर दाम्पत्याची कामगिरी वाखणण्याजोगे आहे.

डॉ. चनगोंडा हवीनाळे यांचे जवळचे विश्वासू उमेदवार निंबर्गी पंचायत समिती गणातून भाजपच्या शैलजा सिद्धाराम जानकर यांना उमेदवारी मिळाल्यास त्याचा फायदा हत्तूर जिल्हा परिषद गटातील भाजप उमेदवाराला होण्याची शक्यता असून, दोन्ही ठिकाणी संघटित मतांचे प्रभावी हस्तांतर होणार आहे.

अशी राजकीय जाणकारांची चर्चा आहे. चिंचपूर, बरूर, टाकळी व कुरघोटसह इतर गावात सामाजिक कार्याच्या माध्यमातून सिध्दाराम जानकर यांनी कार्यकर्त्यांची जाळे विणले आहे. दक्षिण पंचायत समितीवर कमळ फुलविण्यासाठी शैलजा जानकर यांना उमेदवारी देणे गरजेचे असल्याचे कार्यकर्त्यांमधून बोलले जात आहे. त्यामुळे आमदार सुभाष देशमुख यांनी शैलजा जानकर यांना उमेदवारी देण्याची मागणी होत आहे.

# राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने
## कासेगावचे यशपाल वाडकर सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जानेवारी-**




महाराष्ट्रातील ग्रामविकासात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या लोकनियुक्त सरपंचांचा गौरव करण्यासाठी स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय आदर्श सरपंच सन्मान सोहळा २०२५ मध्ये कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील लोकनियुक्त सरपंच यशपाल वाडकर यांना 'आदर्श सरपंच' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार श्री महंत डॉ. श्रीकांतदास धुमाळ महाराज ( प्रमुख महंत, महाकाल मंदिर, उज्जैन) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ग्रामविकासासाठी केलेली भरीव कामगिरी, लोकसहभागातून राबवलेले विकास उपक्रम, लोकाभिमुख प्रशासन तसेच सामाजिक बांधिलकीची दखल घेऊन हा राज्यस्तरीय सन्मान देण्यात आला. हा गौरव सोहळा माऊली संकुल सभागृह, सावेडी रोड, अहिल्यानगर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन स्वराज्य सरपंच सेवा संघातर्फे करण्यात आले होते. बाबासाहेब पावसे व यादवराव पावसे यांनी संयोजक म्हणून मोलाची भूमिका बजावली. कार्यक्रमास डॉ. सुधा कांकरिया, डॉ. शंकर अंदानी, रुचिरा देसाई यांच्यासह राज्यातील सरपंच व मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारताना सरपंच यशपाल वाडकर यांनी हा सन्मान ग्रामस्थ, सहकारी सदस्य व कार्यकर्त्यांना समर्पित करत ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढेही प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी ग्रा.पं.सदस्य शहाजन शेख, नाना खारे, प्रकाश हेडे, संभाजी चौगुले, राम पाटोळे, शिवाजी मोटे, समाधान जाधव, केदार ढेकळे, मोहन जाधव, शिवदास वाडकर, जालिंदर गायकवाड, नारायण जाधव, सोनाली वाडकर, कल्पना राऊत यांसह कासेगाव ग्रामस्थ उपस्थित होते.

# करमाळा तालुक्यातील ग्रामसेवकांनी दिव्यांगांचा
## ५ टक्के निधी वाटप न केल्यास कारवाईची मागणी




**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.७ जानेवारी-**

करमाळा तालुक्यातील ग्राम पंचायत व पंचायत समिती मार्फत दिव्यांग बांधव यांना ५ टक्के सन २०२४-२५ चा निधी वाटप करण्यात यावा. यासाठी पंचायत समिती गट विकास अधिकारी डॉ,अमित कदम यांना निवेदन देण्यात आले.

करमाळा तालुक्यातील सर्व गावातील ग्रामपंचायत मार्फत दिव्यांग ५ % टक्के निधी वाटप गट वर्ष २०२४-२५ चा वाटप करण्यात आलेले नाही. तरी सदर निधी २६ जानेवारी दिवशी प्रत्येक ग्रामपंचायत माध्यमातून दिव्यांग बांधवांचा प्रमाणपत्र देऊन मानसन्मान करावा व ५% निधी वाटप करण्यात यावा, अशी सूचना सर्व गावातील ग्राम सेवक यांना करून दिव्यांग बांधव यांना न्याय मिळवून द्यावा काही गावातील ग्रामसेवक गावातील महसूल इतर दिव्यांग ठिकाणी खर्च झाला म्हणून दिव्यांग बांधवांना खोटी माहिती दिली जात आहे. व दिव्यांग बांधवांना निधी वाटप केला जातो व काही दिव्यांग बांधवांना गावातील ग्रामपंचायत मध्ये दिव्यांग निधी वाटप करत नाहीत. आणि गावातील तक्रारी प्रहार संघटनेकडे आहेत. यामुळे तालुक्यातील गावातील राजकारणाच्या प्रतिनिधीला व राजकारण करणाऱ्या लोकांना पाठीशी घालणाऱ्या अशा गावातील ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवक, सरपंच, यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. अन्यथा प्रहार स्टाईलने अशा ग्रामसेवकाच्या तोंडाला काळे फासून आंदोलन करण्यात येईल. असे निवेदन करमाळा गट विकास अधिकारी डॉ,अमित कदम यांना देण्यात आले.

यावेळी प्रहार करमाळा तालुका अध्यक्ष संदीप तळेकर, प्रहार तालुका उपाध्यक्ष पप्पू ढवळे, दिव्यांग संघटना अध्यक्ष बिभीषण काळे, सामाजिक नेते, मानसिंग खंडागळे व पदाधिकारी उपस्थित होते.



# मोडनिंब जिप मुलांच्या शाळेची व्यवस्थापन समिती जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.७ जानेवारी-**

मोडनिंब (ता.माढा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. १ ची शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठन प्रक्रिया सन २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.१४ पालक सदस्य असलेल्या या समितीत अध्यक्षपदी हनुमंत यादव यांची तर उपाध्यक्षपदी स्वाती गायकवाड यांची निवड करण्यात आली.

स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिनिधी म्हणून कैलास कमलाकर तोडकरी, शिक्षणप्रेमी राजेश निंबाळकर, शिक्षक प्रतिनिधी श्रीमती नाझनीन अब्दुल सत्तार काझी, तर विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कृष्णमित गडेकर व श्रेयस सुर्वे यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून सुहाना तांबोळी, तेजल ओहळ, तानाजी बिनगे, शौकत पठाण, शितल सुर्वे, राधिका मंडले, पत्रकार विजयकुमार परबत, काजल क्षीरसागर, अजय माळी, कृष्णात ओहोळ, राहुल ओहोळ, सविता नागटिळक यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मुख्याध्यापक राजन सावंत यांनी शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका, सदस्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांची सविस्तर माहिती दिली. शाळेच्या गुणवत्तावाढीसाठी तसेच भौतिक सुविधा व विकासकामांसाठी पालकांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे आभार संजय नाळे यांनी मानले. सर्व निवडी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या.

# सुलेरजवळगे मराठी शाळेत तंबाखूमुक्त शिक्षण संस्था अभियान

### अंतर्गत अचानक शाळेस व सुलेरजवळगे उपकेंद्रास भेट

**बकलगी, दि.७ जानेवारी-**



सुलेरजवळगे तालुका अक्कलकोट येथील जिल्हा परिषद मराठी शाळेस ७ जाने रोजी भेट देऊन तंबाखू मुक्त युवा अभियान कार्यक्रम अंतर्गत केलेल्या कार्यवाहीची तपासणी करण्यात आली. त्याबाबत युवा पिढीस घ्यावयाची काळजी, उपाय याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**राष्ट्रीय तंबाखू नियत्रंण कार्यक्रम**

तंबाखू मुक्त शाळा अभियान शैक्षणिक संस्थामध्ये अंमलबजावणी आणि सलाम मुंबई सारख्या उपक्रमाद्वारे जनजागृती समपदेशन केंद्रे व कडक नियम लागू केले जातात का? जेणेकरून कर्करोग, हृदयरोग, पक्षाघात यासारख्या आजारांपासून लोकांचे संरक्षण करता येईल आणि तंबाखूमुक्त समाज निर्माण करता येईल या करिता अभियानाचे प्रमुख उद्देश सांगण्यात आले. शाळेच्या १०० मीटर परिसरांत विक्रीवर बंदी भारत सरकारने सन २००७-०८ मध्ये सुरु केला. शाळा परिसरात तंबाखूसेवन करून थुंकणे, धुम्रपान करण्यास मनाई करणारे फलक लावणे, धुम्रपान निषिद्ध क्षेत्र स्टिकर्स लावणे तंबाखू मुक्त नियत्रंण समिती स्थापन करणे. शालेय उपक्रम विद्यार्थी, शिक्षक, पालक, स्थानिक अधिकारी, ग्रामस्थांचा सहभाग युवक मंडळ ,महिला मंडळ यांचा सहभाग घेऊन अभियान यशस्वी करण्याचे आवाहन केले.

यावेळी डॉ. वैशाली थोरात राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा लेखा व्यवस्थापक डॉ. एस. बी. दळवी जिल्हा सल्लागार राष्ट्रीय तंबाखू नियत्रंण कार्यक्रम अरुण खडके सनियत्रंण मूल्यमापन अधिकारी डॉ. सोहेल मुजावर आरोग्य वर्धिनी सल्लागार समाजसेवक शिलवंत पुजारी, मुख्याध्यापक वसंत भिसे, दतात्रय माने, धोंडप्पा रूपनुरे, प्रेमलता देशमुख, दानिस्ता सय्यद आदी उपस्थित होते.

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old Name **om shivanand** has been changed to New Name : **om Shivanand shahane**

Affidavit No.
**25526425312**
**68500249851**
Mob NO. 9766260728

**सावधानतेची जाहीर नोटीस**

सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व मैंदर्गी येथील सर्व रहिवासीयांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णनः- डि व सब डी सोलापूर तालुका अक्कलकोट पैकी मैंदर्गी नगर परिषद मैंदर्गी येथील जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ असलेली झोपडपट्टीमधील यांसी जुना वार्ड क्रं.१८ यांसी नवीन वार्ड क्रं.१, यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर १८०४००००९ यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर २८७ यांसी हद्द पूर्वपश्चिम ४० फुट दक्षिणोत्तर १५ फुट एकूण क्षेत्र ६०० चौरस फुट इतके असून यात १० ु १० मापाची पत्र्याची दोन खोल्या असून बाकीची खुली जागा.

सदर प्रमाणे वर वर्णन केलेली घरजागा ही काशिनाथ चंदु खेत्री उर्फ क्षेत्री यांचे मालकी कब्जेवहिवाटीची होती त्यांनी दिनांक ०७/०१/२०२६ रोजी कब्जा, पावती करारपत्राने तसेच संमतीपत्र व प्रतिज्ञापत्राद्वारे मे. पब्लिक नोटरी साहेब, यांचे समोर दिलेली आहे. त्याप्रमाणे सदरी घरजागा ही आमचे अशिल राचप्पा नागप्पा गवळी यांच्या कब्जेवहिवाटीची झालेली आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल हे सदर घरजागेवर नगर परिषद मैंदर्गी यांचे कडे कर आकारणीला नाव लावण्यासाठी अर्ज दिलेले आहे.

तरी या नोटीसीद्वारे कळविण्यता येते की, जुना वार्ड क्रं.१८ यांसी नवीन वार्ड क्रं.१, यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर १८०४००००९ ग्रांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर २८७ या घरजागेवर आमच्या अशिल राचप्पा नागप्पा गवळी यांचे कर आकारणी दप्तरी नाव लावणेस कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी गैंदर्गी नगर परिषद, मैंदर्गी, ता. अक्कलकोट यांच्याकडे लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांच्या नावाची नोंद मैंदर्गी नगर परिषद, मैंदर्गी येथील कर आकारणी दप्तरी करुन घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारची तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर प्रकटन दिले ता. ०८/०१/२०२६.

**सही/-**
**ॲड. ए.डी. नाईकवाडी**
**नोटरी भारत सरकार**
**१८८६/४, विणकर वसाहत मु.पो. मैंदर्गी**
**ता. अक्कलकोट जि. सोलापूर.**
**मो.नं. ९८८१५२२९०७/८४२१०९८१७७**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**जाहीर समन्स**

**मे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दक्षिण सोलापूर यांचे समोर**
**(श्री मार्कंडेय मंदिर, प्लॉट नं. १४, सिध्देश्वर पेठ, श्री मार्कंडेय पथ, सोलापूर ४१३०००१)**

जा.क्र. १७२४/०७/०१२०२५ दिनांक ०७/०१/२०२६

**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर - अर्जदार**
**विरुद्ध**
खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद **- जाब देणार**

| अ. क्र. | दावा क | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १२४/२०२५ | १,२५,४१६/- | ३ | **श्री. माने विष्णू वाळाराम** रा. गायकवाड लॉड्रीजवळ १८४ संगमेश्वर नगर अक्कलकोट रोड सोलापूर |
| २ | १०५/२०२५ | १,१६,३८६/- | १<br>३ | **श्री. सुतार गणेश शिवपुत्र** मु.पो. माळकवठे ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर<br>**श्री. विराजदार सविता संगण्या** मु.पो. माळकवठे ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर |
| ३ | १४४/२०२५ | ९६,९९६/- | ३ | **सौ. सुतार श्वेता नामदेव** मु.पो. मंदुप ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर |
| ४ | १३६/२०२५ | ८२,१२८/- | १<br>३ | **श्री. अमाणे रतनकुमार शांतप्पा** रा. १४३ अ २४ पी शास्त्री नगर दहिटणे ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर<br>**श्री. काटे गणेश चन्नबसप्पा** रा. गवळी वस्ती २४ चैतन्य नगर सोलापूर |
| ५ | १३२/२०२५ | २,०८,४३२/- | १<br>२<br>३ | **श्री. विज्जा नंदू गोरखनाथ** रा. घर नं ४५० प्लॉट नं १६ शास्त्री नगर भगतसिंग चौक उत्तर सदर बाजार सोलापूर<br>**श्री. पुठ्ठा अंबादास इस्तारी** रा. प्लॉट नं ८८/३ गोदुताई विडी घरकूल सोलापूर<br>**श्री. सिद्राल सुरेश राजेशाम** रा.६१२ विडी घरकूल हैदराबाद रोड सोलापूर |
| ६ | ११८/२०२५ | ७०,००६/- | १ | **श्री. चौगुले तुकाराम शामराव** मु.पो. टाकळी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर |
| ७ | १२९/२०२५ | १,३७,९३२/- | १<br>२<br>३ | **श्री. पवार भारत शिवाजी** रा.४२० निलम नगर थोबडे वस्ती सोलापूर<br>**श्री. नल्ला रवी नारायण** रा. हनुमान मंदिर जवळ ५/६ आशा नगर सोलापूर<br>**श्री. चन्नापट्टण मयुरेश नरेंद्र** रा. लक्ष्मीनारायण टॉकीजजवळ ३५ नवनाथ नगर सोलापूर |
| ८ | १३९/२०२५ | १,६७,९५०/- | २ | **श्री. गायकवाड रतन सनातन** रा.७७ शिवगंगा नगर भाग १ सोलापूर |
| ९ | १२७/२०२५ | १,५१,३१२/- | २<br>३ | **श्री. मंगलपल्ली सतिश श्रीनिवास** रा.१६६ जुना विडी घरकुल राघवेंद्र नगर सोलापूर<br>**श्री. दासरी व्यंकटेश अंबाजी** रा. लक्ष्मी मंदिर जवळ घर नं १३२७ विडी घरकुल हैद्राबाद रोड सोलापूर |
| १० | १५०/२०२५ | १,४८,४४१/- | १<br>२<br>३ | **श्री. सय्यद अमिर अकलाज** मु.पो. कंदलगांव ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर<br>**सौ. गाडेकर कल्लव्वा सिदामप्पा** मु.पो. कंदलगांव ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर<br>**श्री. मुजावर हसन गुलाब** मु.पो. कंदलगांव ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर |
| ११ | ११२/२०२५ | ३,२०,६९४/- | १ | **श्री. शिंदे रूपाली प्रथमेश** रा.३४ अ/१/१९ ब्लॉक नं १२ अक्कलकोट रोड, गीता नगर गणेश अपार्टमेंट सोलापूर |
| १२ | १३०/२०२५ | ८५,०६६/- | १ | **श्री. कोडम रमेश लिंगय्या** रा.९९८ शास्त्री नगर एसटी स्टँड नं२ सोलापूर |
| १३ | १४९/२०२५ | ९२,९१६/- | २ | **श्री. पवार सचिन सुरेश** मु.पो. निंबर्गी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर |
| १४ | ११४/२०२५ | ८०,५३२/- | १<br>२ | **श्री. हिरेमठ मरूळाराध्या संगमनाथ** मु.पो. सकळेश्वर गल्ली मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर<br>**श्री. जेऊरकर राजशेखर मलप्पा** मु.पो. सकळेश्वर गल्ली मंद्रुप ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर |
| १५ | १२२/२०२५ | १,३५,२५६/- | १<br>३ | **श्री. मकानदार हुसेनवाशा मकबुलशा** मु.पो. बरूर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर<br>**श्री. मकानदार अल्ताफ मकबुल** मु.पो. बरूर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर |
| १६ | १४०/२०२५ | ७३,७६२/- | १<br>२<br>३ | **श्री. शेख मोहद्दीन शरीफ** मु.पो. कंदलगांव ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर ४१३२२१<br>**श्री. मुल्ला महमद महिबुब** मु.पो. कंदलगांव ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर ४१३२२१<br>**श्री. मुजावर हसन गुलाव** मु.पो. कंदलगांव ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर ४१३२२१ |
| १७ | १२५/२०२५ | ३,०१,९५७/- | २<br>३ | **श्री. सुरगीहळ्ळी मल्लिकार्जुन राजशेखर** रा. ब्लॉक नं १६२ विजापूर रोड इंदिरा नगर गणेश मंदिराजवळ सोलापूर<br>**श्री. ख्यामगोंडे पांडुरंग विठ्ठल** मु.पो. हनुमान मंदिराजवळ टाकळी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर |
| १८ | १२१/२०२५ | ८७,५८९/- | १<br>२<br>३ | **श्री. साई शिवशंकर सौरप्पा** मु.पो. १९८ रविंद्र नगर मजरेवाडी ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर<br>**श्री. भंडारी ईरप्पा हणमंत** रा. १६८ गांधीनगर अ वज्रेश्वरी नगर सोलापूर<br>**श्री. गायकवाड आशा लक्ष्मण** रा. घर नं २४२ कुमठा नाका संजय नगर सोलापूर |
| १९ | ११९/२०२५ | २,०४,७९८/- | १<br>३ | **सौ. नल्ला सुवर्णा कृष्णमोहन** रा. १५५९ दाजी पेठ सोलापूर ४१३००५<br>**श्री. वडनाल अमर श्रीधर** रा.७४३/१ अ विडी घरकुल कुंभारी सोलापूर ४१३००६ |
| २० | १२०/२०२५ | ८५,६९५/- | १<br>२<br>३ | **श्री. नल्ला नरेश अंबादास** रा.३४/३/३५ न्यु पाच्छा पेठ दाजी पेठ सोलापूर<br>**श्री. पोरडंला तिरूपती नरेंद्र** रा. २२९/३ तेलंगी पाच्छा पेठ सोलापूर<br>**श्री. बल्ला नरेंद्र सिद्राम** रा.१०२ डी ६६ भवानी पेठ सोलापूर |
| २१ | १२८/२०२५ | २,१८,७४६/- | १<br>२ | **श्री. कुडक्याल सुधाकर शंकर** रा.६६८ भारतन इंदिरानगर एमआयडीसी अंबाबाई मंदिर जवळ सोलापूर<br>**श्री. देसाई नागेश शंकर** रा. २७ कामगार वसाहत सुनिल नगर सोलापूर |
| २२ | १२३/२०२५ | ६९,७१५/- | १<br>२<br>३ | **श्री. छपेकर शिवानंद सिध्दप्पा** मु.पो. चावडी जवळ कुंभारी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर<br>**श्री. चाबुकस्वार अमोगसिध्द पांडुरंग** मु.पो. कुंभेश्वर मंदिर कुंभारी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर<br>**श्री. भिमन्नपल्ली आनंद अंबादास** मु.पो.८२०/२ जी पी एम विडी घरकूल कुंभारी ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळुन येत नसल्याने/अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

**प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांकः- २८/०१/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.** प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. ०७/०१/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्य दिले आहे.

**स्थळ - सोलापूर**
**दि - ०७/०१/२०२६**

(शिक्का)

**सही/-**
**(श्री. मीरे.डी.जी)**
**सहाय्यक निंबधक सहकारी संस्था,**
**दक्षिण सोलापूर**

# सोलापूर विद्यापीठास सर्वसाधारण विजेतेपद

## राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक 'उत्कर्ष' महोत्सव

## सोलापूरचाच प्रथम कांबळे गोल्डन बॉय, प्रेरणा गायकवाड गोल्डन गर्ल



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मुंबई आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सोळाव्या राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा 'उत्कर्ष' महोत्सवामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने ४६ गुणासह सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने १७ गुणांसह उपविजेतेपद तर शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरने १४ गुणांसह तृतीय स्थान मिळविले. 'गोल्डन बॉय' व 'गोल्डन गर्ल' हा मान सोलापूर विद्यापीठाच्याच प्रथम विक्रम कांबळे व प्रेरणा विकास गायकवाड यांनी पटकावला. शिस्तप्रिय संघ म्हणून गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांचा सन्मान करण्यात आला. विद्यापीठाच्या आवारात झालेल्या या स्पर्धेत १६ विद्यापीठाच्या संघानी भाग घेतला होता. बुधवारी मुंबईचे प्रसिद्ध लोककवी प्रा. प्रशांत मोरे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रभाकर कोळेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी सी.ए. महादेव खराडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. वीरभद्र दंडे, आर. डी. कदम (बार्शी) आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांनी महोत्सवातील चार दिवसांच्या विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचा सविस्तर आढावा सादर केला. लोककवी प्रा. प्रशांत मोरे यांनी लोककला ही जीवन जगण्याची प्रेरणा असल्याचे सांगत विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराचे मनापासून कौतुक केले. त्यांनी यावेळी विविध कविता सादर करून प्रेक्षकांची मन जिंकली. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी लोककला हे समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन असून आजचे विद्यार्थी कलाकार ही परंपरा समर्थपणे पुढे नेत असल्याचे नमूद केले. तसेच लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक तरुणाने मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन त्यांनी केले.

स्पर्धांच्या निकालाचे वाचन डॉ. यशपाल खेडकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे व डॉ. ममता बोल्ली यांनी केले, तर डॉ. वीरभद्र दंडे यांनी आभार मानले.

### सातपैकी सहा विभागात सोलापूरचीच बाजी, प्रा. पल्लवी भोजने उत्कृष्ठ संघनायिका

या महोत्सवात सोलापूर विद्यापीठाने सातपैकी सहा विभागातही सर्वसाधारण विजेतेपदाचा मान मिळविला. यात नृत्य, नाट्य, संगीत, साहित्य व छायाचित्रण या विभागांचा समावेश आहे. पैकी ललित कला विभागामध्ये नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठाने हा मान मिळविला उत्कृष्ट संघनायक म्हणून पुणे विद्यापीठाचे डॉ. अमित गोगावले आणि सोलापूर विद्यापीठाच्या प्रा. पल्लवी भोजने यांचा गौरव करण्यात आला.

### सोलापूर विद्यापीठाची तपशीलवार कामगिरी

**प्रथम** : पथसंचलन, कायप्रसिद्धी अहवाल, कार्य भित्तीचित्र, छायाचित्रण, कविता ब, निबंध, भारतीय लोकवाद्य, समुह गीत, पथनाट्य, संकल्पना नृत्य. **द्वितीय** : कविता अ, वक्तृत्व. **तृतीय** : भित्तीचित्र घोषवाक्यासह.



# सिद्धेश्वर मंदिर परिसरात पोलिसांचे मॉक ड्रिल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

श्री सिद्धरामेश्वर महाराजांच्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर भाविकांची सुरक्षितता अबाधित राहावी, यासाठी पोलिस प्रशासनाकडून सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. बुधवारी सिद्धेश्वर मंदिर परिसरात व्यापक स्वरूपात पोलिसांची मॉक ड्रिल राबविली.

याचा मुख्य उद्देश यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार, गोंधळ किंवा आपत्कालीन घटना घडू नये, तसेच तशी परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ, नियोजनबद्ध व प्रभावी कारवाई करता यावी, हा होता. मॉक ड्रिलदरम्यान मंदिर परिसर, मुख्य प्रवेशद्वार, अंतर्गत रस्ते, दर्शन रांगा तसेच गर्दी होणाऱ्या ठिकाणी गर्दी नियंत्रण, संशयित व्यक्तींची तपासणी, बॉम्ब शोध पथकाची हालचाल आणि आपत्कालीन मार्ग मोकळे ठेवण्याचा सराव करण्यात आला.

यात पोलीस अधिकारी व कर्मचारी, दंगल नियंत्रण पथक, वाहतूक पोलीस, स्ट्राइक फोर्स, विविध आपत्कालीन सेवांचे पथक सहभागी होते. अचानक उद्भवणाऱ्या परिस्थितीत नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवणे, जखमींना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करणे आणि परिसरात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे प्रात्यक्षिक यावेळी करण्यात आले.

# भाजपाचे इंद्रजीत पवार यांचा वाढदिवस विविध कार्यक्रमांनी साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

भाजपा कोषाध्यक्ष इंद्रजीत पवार यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात संपन्न झाला.

यावेळी सर्वप्रथम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे विद्यार्थ्यांना वह्या तसेच खाऊ वाटप करण्यात आले. त्यानंतर मार्डी येथील सार्वजनिक ठिकाणी धार्मिक ठिकाणी नागरिकांना बसण्यासाठी बाकडे ठेवण्यात आले तसेच उत्तर सोलापूर मधील शेतकरी गटांना शेती उपयोगी साहित्य व अवजारे यांचे वाटप करण्यात आले. तसेच इंद्रजीत पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मार्डी येथे सरपंच क्रिकेट लीग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



या स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. स्पर्धेमध्ये जीपी वॉरियर्स क्रिकेट संघाने प्रथम पारितोषिक पटकावले तर घातक क्रिकेट संघ दुतीय तर एस. राजे क्रिकेट संघ तृतीय क्रमांक बक्षीस मिळवले. मार्डी येथे इंद्रजीत पवार यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांची धान्याची तुला करून जमा झालेले सर्व धान्य श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यास सोलापूर जुनी पोलीस लाईन मुरारजी पेठ येथे सर्व धान्य दान करण्यात आले तसेच बाणेगाव उत्तर सोलापूर येथे भाजपा ओबीसी मोर्चाचे तालुकाध्यक्ष केदार तोडकरी यांच्याकडून हळदी-कुंकू समारंभ घेण्यात आला.

कार्यक्रमास भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारी सदस्य शहाजी पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अविनाश मार्तंडे, बाबासाहेब पाटील, शिवाजी सोनार, काशिनाथ कदम, संभाजी दडे, विनायक सुतार, नागेश ननवरे, मार्डी सरपंच गणेश पवार, सरपंच पिंटू जाधव, सरपंच तुकाराम चव्हाण, दीपक डांगे, सरपंच सुनील जाधव, सरपंच उमेश भगत, कमलाकर माने, दत्तात्रय पवार, अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष अझर शेख, अमोल सुतार, महेश पेंडपाले, युवराज पवार, महादेव जाधव, विश्वनाथ जगताप उपस्थित होते.

मल्हारी काळे, कमलाकर माने, मनगीन भालेकर, कदिर कुडले, श्रीकांत वैदकर, रंगनाथ गुरव, संजय इनामदार, प्रभाकर फुलसागर, कुमार भिंगारे, प्रवीण लबडे, बाबुराव भोरे, श्रीकांत पाटील, पिंटू कापसे, लिंबाजी जाधव, सुहास भोसल, नागेश ननवरे, दीपक डांगे, सरोजनी जगताप उपस्थित होते.

# आ. देशमुख, आ.कोठे एकत्र; कार्यकर्त्यांमध्ये संचारला उत्साह

## औक्षण, पुष्पवृष्टीने दोघांचेही स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**



ढोल ताशांचा गजर अन् आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार देवेंद्र कोठे यांची एकत्र प्रमुख उपस्थिती आणि जागोजागी नागरिकांनी औक्षण, पुष्पवृष्टी करत उमेदवारांचे केलेले स्वागत अशा उत्साही वातावरणात भाजपाच्या पदयात्रेत बुधवारी हजारोंची गर्दी उसळली. आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्यासह दिग्गजांच्या उपस्थितीमुळे भाजपाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांसह मतदारांमध्येही प्रचंड उत्साह दिसून आला.

मनपा निवडणूक रणधुमाळी

चौत्रा पुणे नाका मंडळ गणपती बाप्पाच्या मूर्तीच्या तसेच धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या मूर्तीच्या पूजनाने पदयात्रेचा प्रारंभ झाला. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख आमदार देवेंद्र कोठे, भाजपाच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, पुरुषोत्तम बरडे, प्रभाग ७ चे निवडणूक प्रमुख श्रीकांत घाडगे, उमेदवार आनंद कोलारकर, पद्माकर काळे, उत्तरा बरडे-बचुटे, श्रद्धा पवार, भाजपच्या सरचिटणीस सुद्धा अळीमोरे, सतीश कुदळे, किरण पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, प्रभाग क्रमांक सात मध्ये आमदार विजयकुमार देशमुख, मी स्वतः, ज्येष्ठ नेते पुरुषोत्तम बरडे, पद्माकर काळे आणि प्रभागात राहणारे सर्व दिग्गज नेते एकत्र आले आहेत. प्रभाग क्रमांक ७ मध्ये निघालेली भव्य पदयात्रा ही या प्रभागातील भाजपच्या विजयाची नांदी आहे. २०१२ सालापासून १० वर्षे या प्रभागाने मला नागरिकांची सेवा करण्याची संधी दिली आहे. त्याच जोरावर मी प्रभागासह शहरात विविध ठिकाणी विकास करू शकलो. प्रभाग क्रमांक ७ हे माझे कुटुंब आहे. नगरसेवक असताना या प्रभागासाठी भरघोस निधी आणण्याचा मी यशस्वी प्रयत्न केला आहे. सध्या शहरात भारतीय जनता पार्टीचे तीन आमदार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे सोलापूर शहराला भक्कम पाठबळ आहे. या जोरावर प्रभाग क्रमांक ७ सह शहरासाठी भरघोस निधी आणून शहराचा कायापालट करण्यासाठी भाजपा सज्ज आहे, असेही आमदार देवेंद्र कोठे म्हणाले. पारंपारिक ढोल ताशे, हलग्यांचा कडकडाट, हाती भाजपाचे झेंडे, गळ्यात भाजपाचे शेले, 'भारतमाता की जय', 'जय श्रीराम', 'भारतीय जनता पार्टीचा विजय असो' च्या घोषणांमुळे प्रभाग क्रमांक ७ परिसर भाजपमय झाल्याचे चित्र पहायला मिळाले. यावेळी कार्यकर्त्यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्या छबी असलेले फलक धरले होते.

भाजप उमेदवारांच्या पदयात्रेचे प्रभाग क्रमांक ७ मधील मतदारांनी जागोजागी उत्स्फूर्त स्वागत केले. नागरिकांनी घरासमोर कमळ चिन्हाच्या रांगोळ्या तसेच फुलांच्या पायघड्या घातल्या होत्या. उमेदवारांचे औक्षण करत पुष्पवृष्टी करून आमदार विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे आणि उमेदवारांचे स्वागत करण्यात आले. बुधवारी प्रभाग क्रमांक ७ मध्ये झालेली भाजपाची प्रचंड मोठी पदयात्रा विरोधकांना धडकी भरवणारी असून ही भाजपाच्या प्रभाग क्रमांक ७ मधील विजयाची नांदी आहे, असे मतदारांनी सांगितले.

# श्री सिध्देश्वर यात्रेच्या धार्मिक विधींना मानकऱ्यांच्या घरी दिवे लावून होणार प्रारंभ

**शनिवारी कुंभारवाड्यातून ५६ घागरीचा विधी**
**शेटेवाड्यात योगदंड महापूजा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जानेवारी-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यात्रेस मंगळवारी अष्टविनायक गणपती पूजनाने सुरुवात झाली. बुधवारी पंच कमिटीकडून बस्ता बांधण्यात आला आहे. तर गुरुवार दि. ८ सिध्देश्वर यात्रा मानकरी सुहास दर्गो पाटील यांच्या घरी दिवे लावून मात्रेतील धार्मिक विधींना सुरुवात होणार आहेत.

दि. १० जानेवारीला कुंभारवाडयातून विधिवत पूजा करून ५६ घागरी हिरेहब्बू वाड्यात सुपूर्द करण्याचा विधी आहे. त्यानंतर शुक्रवार पेठेतील शेटे वाडयात योगदंडाची पूजा, रविवारी रात्री नंदीध्वजांना हिरेहब्बू वाडयात साज चढविण्यात येणार आहे. यात्रेच्या निमित्ताने सर्वत्र उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, १२ ते १६ जानेवारी यात्रेतील मुख्य धार्मिक विधी संपन्न होणार असून, दि.१२ यण्णिमज्जन सोहळा होणार आहे. मल्लिकार्जुन मंदिराजवळील हिरेहब्बू वाड्यात सकाळी ८ वाजता मानाच्या पहिला व दुसऱ्या नंदीध्वजाची महापूजा मानकरी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

दरम्यान, उर्वरित पाच नंदीध्वज आल्यानंतर सात ही नंदीध्वज ६८ शिवलिंग यष्णिमज्जन (हळद तेल लावणे) सोहळ्यासाठी मार्गस्थ होतात.



मिरवणूक मार्गावर भाविक खोबरे, लिंबू, खारीक हार बांधतात.

सिध्देश्वर प्रशालेजवळ आल्यानंतर देशमुख, हिरेहब्बू यांना शासकीय आहेर, मंदिरात अमृतलिंगाला तैलाभिषेक, पूजा दुपारी बाराला मंदिरात योगदंड ठेवून पूजा होते. ६८ शिवलिंग प्रदिक्षणा करून पुन्हा नंदीध्वज रात्री हिरेहब्बू चाडयात येतात.

**मानकऱ्यांकडून बस्ता बांधण्याचा विधी**

शिवयोगी श्री सिद्धरामेश्वर महाराज यात्रेतील अक्षता सोहळा व इतर धार्मिक विधींचे प्रतीक असलेला बस्ता बांधण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. परंपरेप्रमाणे लागणारे पोषाख व इतर वस्तूंची खरेदी करण्यासाठी मानकऱ्यांची सेवा करण्यात आली. पंच कमिटीचे सदस्य वाजत-गाजत चाटी गल्लीत मोगले यांच्या दुकानात गेल्यानंतर दुकानाचे मालक मानकऱ्यांचा सत्कार केला. त्यानंतर विधीवत बस्ता बांधला गेला. बस्ता खरेदी केल्यानंतर तो मंदिरात नेऊन देवाच्या चरणी अर्पण करण्यात आला. या सोहळ्यासाठी मानकरी, हिरेमठ कुटुंबीय, त्याच प्रमाणे यात्रेतील प्रमुख मानकरी आणि सिद्धेश्वर देवस्थान समितीचे बस्ता बांधणारे मानकरी रेवणसिद्ध मोगले, शिवशंकर खोबरे, एस.एस.स्वामी, येरटे, उपासे, शास्तूर, वरदा, सावळगी आदी कुटुंबीयांकडे आहे.

यावेळी बस्त्यात कुंभार कन्येसाठी साडी, खण, लिंगवस्त्र, उपरणे, लाल वस्त्र, रूमाल आदी साहित्यांचा बस्ता बांधण्याचा मान आहे.

### १३ जानेवारी : अक्षता सोहळा

हिरेहब्बू वाडयातून सकाळी ८ वाजता अक्षता सोहळ्यासाठी पूजाविधीनंतर मार्गस्थ नंदीध्वजाला अनेक भाविक बाशिंग बांधतात सिध्देश्वर मंदिरात संमती कट्टाजवळ दुपारी साडेबाराला अक्षाता सोहळा योगदंड साक्षीने सुगडी पूजा, संमती वाचन. अमृतलिंगाला पंचामृत अभिषेक, नंतर मानकरी यांना विडा दिला जातो. मंदिरात मूर्तीला गाभाऱ्यात योगदंड महापूजा ६८ शिवलिंगांना पंचामृत अभिषेक करण्यासाठी मार्गस्थ मधला मारुती जवळ फुलारीकडून बाशिंग बांधला जातो.

### १४ जानेवारी : करमुटगी, होमविधी, भाकणूक

करमुटगी, होमविधी, भाकणूक नागफणा नंदीध्वज पूजा, सकाळी नऊच्या सुमाराला मंदीध्वजाला सिध्देश्वर तलावाजवळ स्नान (करमुटगी) हा विधी गंगा पूजन सतीहवन पूजा, अमृतलिंगाजवळ, सतीहवन विसर्जन, शेटे व देशमुखांना विडा देण्याचा मान सायंकाळी पाचला वाड्यातून होम विधीसाठी सात ही नंदीध्वज मिरवणूक सुरु होते. जुनी फौजदार चावडी जवळ पहिल्या नंदीध्वजाला नागा बांधण्याचा विधी होईल.

### १५ जानेवारी : शोभेचे दारुकाम

रात्री साडेनऊनंतर होम मैदानावर होमविधी रात्री अकरानंतर भगिनीसमोर भाकणूक, मानकरी राजशेखर हिरेहब्बू सांगतात. दि.१५- शोभेचे दारुकाम सायंकाळी पाचलय वाडयातून नंदीध्वज निघतात. ७ वाजता होम मैदानावर शोभेचे दारुकाम लेसर शो झाल्यानंतर रात्री मिरवणूक वाड्यात येतात.

### १६ जानेवारी: कप्पडकळी

सकाळी अकराच्या सुमाराला देशमुख यांच्या वाड्यात योगदंड पूजा, महाप्रसाद सायंकाळी सातनंतर मल्लिकार्जुन मंदिरात कपडूकळी महापूजा. (नंदीध्वज वस्त्र विसर्जन करणे), मंदिरात पाच प्रदक्षिणा करून यात्रेचा समारोप.

# सरवदे खून प्रकरण : तिघांच्या पोलीस कोठडीची मागणी फेटाळली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

जोशी गल्ली, रविवार पेठ परिसरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या वादातून मनसे विद्यार्थी शहर प्रमुख बाळासाहेब पांडुरंग सरवदे याची तलवार व कोयत्याने वार करून निर्घृण हत्या केल्या प्रकरणी आरोपी अमर शंकर शिंदे, अतिश शंकर शिंदे व तानाजी बाबू शिंदे यांनी घटनेवेळी वापरलेले तलवार व कोयताची विल्हेवाट लावलेली गाडी जप्त करणे आहे, सर्व हत्यार कोठून आणले याचा शोध घ्यायचा आहे व सर्व आरोपीचे समोरासमोर रुजवत घालून जॉईंट इन्व्हेस्टीगेशन करण्यासाठी आरोपीचे वाढीव पोलीस कोठडीची मागणी तपास अधिकाऱ्याने केली होती.

याला विरोध करताना आरोपींतर्फे अँड. संतोष न्हावकर यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले कि, या आरोपींनी गुन्ह्यात वापरलेले हत्यार रोहित नावाच्या आरोपीकडून जप्त केलेले आहे व गाडी त्यानेच वापरली आहे त्यामुळे ती गाडी जप्त करण्यासाठी या आरोपींच्या पोलीस कोठडीची आवश्यकता नाही व यापूर्वी देण्यात आलेली चार दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली होती त्यामुळे आता पुन्हा कोठडी वाढविण्याची गरज नाही असा युक्तिवाद केला. तो मान्य करून न्यायालयाने पोलिसांची पोलीस कोठडीची मागणी फेटाळून अमर शंकर शिंदे, अतिश शंकर शिंदे व तानाजी बाबू शिंदे यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली. याबाबत हकिकत अशी की, मयताचे भाऊ बाजीराव पांडुरंग सरवदे (वय २५, रा. जोशी गल्ली, रविवार पेठ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपींनी निवडणुकीत उभे राहू नये म्हणून धमकी दिली होती. अपक्ष अर्ज मागे घ्या, नाहीतर तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी उघड धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे.

दि. २ जानेवारी रोजी दुपारी १ ते सायंकाळी ४.४५ च्या दरम्यान हनुमान मंदिराजवळ आरोपींनी वाद घालून बाळासाहेब सरवदे यांच्या डोळ्यांत चटणी टाकून त्यांना काहीही दिसू नये अशी स्थिती निर्माण केली. त्यानंतर काही आरोपींनी त्यांचे हात पकडले, तर काही आरोपींनी तलवार व कोयत्याने छातीवर वार करून त्यांना गंभीर जखमी केले उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी दि.३/१/२६ रोजी अमर शंकर शिंदे, अतिश शंकर शिंदे व तानाजी बाबू शिंदे या ३ आरोपींना अटक करण्यात आली होती त्यांना मे. कोर्टाने ४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. त्यांची पोलीस कोठडी आज संपणार असल्याने पोलिसांनी आज पुन्हा न्यायालयात करून चार दिवस वाढीव पोलीस कोठडीची मागणी केली होती परंतु मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती. मर्ढेकर यांनी ती मागणी फेटाळून आरोपींना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. यात आरोपी तर्फे अँड. संतोष न्हावकर, अँड. राहुल रूपनर, अँड मीरा पाटील, अँड. सुहासिनी कांबळे, अँड. पुष्पा पसारगे यांनी तर सरकार पक्षातर्फे अँड. तुषार लिमन यांनी काम पाहिले.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## कल्पक सोसायटीची खुली जागा हडप केल्याचा आरोप

### ▸ प्रशासनाने तातडीने न्याय देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

जुना विडीघरकुल (हैदराबाद रोड) परिसरातील कल्पक सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या खुल्या जागेवर तथाकथित समाजसेवकांनी बेकायदेशीर अतिक्रमण करून प्लॉट पाडून विक्री केल्याचा आरोप संस्थेचे चीफ प्रमोटर संगय्या मठपती यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर महापालिका आयुक्त तसेच पोलीस आयुक्त यांच्याकडे रीतसर तक्रार दिली आहे. या सोसायटीच्या खुल्या जागेचा अनधिकृत नकाशा तयार करून रस्ते, ओपन स्पेस तसेच मंदिराकडे जाणारी वाट बंद करण्यात आली आहे.

काही सदस्यांच्या घराजवळील विहिरी बुजवून तसेच रातोरात बेकायदेशीर बांधकाम केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सोसायटीच्या वकिलांवरही दबाव टाकून काम सोडण्यास भाग पाडल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी महापालिका, जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्तांकडे तक्रार केली असून कारवाई करण्याची मागणी केली आहे. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशासनाने तातडीने नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी चीफ प्रमोटर संगय्या मठपती यांनी केली आहे. या पत्रकार परिषदेस सुरेखा रंगदळ, अरुण शेगुर, गणेश पावले आदी उपस्थित होते.

## ▸▸ महत्वाचे...

### विवाहितेवरील छळ; पतीसह सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

विवाहितेवर छळ व मारहाणीप्रकरणी पतीसह सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी शिल्पा उमेश विटेकर रा. मोदीखाना, गोमगाडी जवळ, सोलापूर यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दि. २० मे २०२४ ते ८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत सोलापूर येथील सासरी राहत्या घरी आरोपींनी फिर्यादीचा शारीरिक व मानसिक छळ केला. लग्नात मानपान न केल्याचा राग मनात धरून आरोपींनी तिला सतत त्रास दिला. पती उमेश विटेकर हा दारूच्या नशेत शिवीगाळ करून मारहाण करीत असून, दुसरे लग्न करण्याची धमकी देत असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. तसेच, मुलासाठी नवीन गाडी खरेदी करण्याच्या कारणावरून माहेरून एक लाख रुपये घेऊन येण्याची मागणी करण्यात आली. ही रक्कम आणली नाही म्हणून फिर्यादीस मारहाण करून माहेरी हाकलून दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. लग्नात मानपान न केल्याचा राग मनात धरून आरोपींनी तिला सतत त्रास दिला. या प्रकरणी पती उमेश, सासू सुंदर, सासरे आनंद, नणंद उमा व लाता यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस नामदार माडे हे करीत आहेत.

### जोडभावी पेठ येथील घरफोडीत ५९ हजारांचा ऐवज लंपास

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

शहरातील विजय भवानी सोसायटी, शेळगी तुळजापूर रोड येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण सुमारे ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. राजु मसू चौधुले वय ३४, रा. विजय भवानी सोसायटी, शेळगी तुळजापूर रोड, सोलापूर यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.फिर्यादी हे ट्रॅक्टर चालक असून कामानिमित्त तुळजापूर येथे गेले होते. दि. २५ डिसेंबर रोजी पहाटे १.३० ते दुपारी ४.४५ वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या पुढील दरवाजातून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील लोखंडी कपाटाचे दरवाजे उघडून कपाटात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली.दि. ६ जानेवारी रोजी फिर्यादी घरी परत आल्यानंतर सदर प्रकार लक्षात आला. त्यानंतर त्यांनी तात्काळ पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस हवालदार शिवशरण हे करीत आहे.

# कार्यकर्त्यांवर संक्रांत; भाजपकडून २८ जण निलंबित

### पक्षादेशानुसार शहराध्यक्ष तडवळकरांनी केली कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत यंदा भारतीय जनता पार्टीकडून उमेदवारीसाठी अपेक्षेपेक्षा अधिक इच्छुक कार्यकर्ते पुढे आले होते. या पार्श्वभूमीवर पक्षाच्या संघटनात्मक धोरणानुसार आणि सखोल विचाराअंती, शहराध्यक्ष रोहिणीताई तडवळकर व स्थानिक ३ आमदार यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीचे १०२ अधिकृत उमेदवार घोषित करण्यात आले.

दरम्यान, काही जणांनी पक्षशिस्त न जुमानता अधिकृत उमेदवारांच्या विरोधात दंड थोपटले आणि उमेदवारी अर्ज दाखल केल्याने अशा २८ कार्यकर्त्यांना




भाजपातून निलंबित केल्याची माहिती शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी दिली. सोलापूर महानगरपालिका उमेदवार निवडी दरम्यान सर्व इच्छुकांना समाधान देणे शक्य नसल्याने, पक्षाच्या वतीने नाराज कार्यकर्त्यांची समजूत काढण्याचे प्रयत्न करण्यात आले. मात्र, पक्षाच्या शिस्तीला न जुमानता काही कार्यकर्त्यांनी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात बंडखोरी करत अपक्ष अथवा इतर पक्षांच्या चिन्हावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला, तसेच काहींनी पक्षविरोधी कारवाया केल्या. पक्षशिस्त भंग केल्याबद्दल अशा एकूण २८ कार्यकर्त्यांना भारतीय जनता पार्टीतून निलंबित करण्यात आले आहे, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष रोहिणीताई तडवळकर यांनी दिली. भाजपा संघटनात्मक शिस्त, अधिकृत उमेदवारांच्या विजयासाठी कटिबद्ध असून, कोणत्याही प्रकारची बंडखोरी किंवा पक्षविरोधी भूमिका सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला.

#### यांना केले निलंबित

बाबुराव जमादार, शर्वरी रानडे, अमरनाथ बिराजदार, काशिनाथ झाडबुके, डॉ. राजेश अनगीरे, निर्मला तट्टे , निर्मला पासकंटी, प्रकाश राठोड, मंजुषा मुंडके, मेनका राठोड, राजशेखर येमूल, राजश्री चव्हाण, राजू आलुरे, राजेश काळे, रुचिरा राजेंद्र मासम, रेखा लहू गायकवाड, विजय इप्पाकायल, विठ्ठल कोटा, रश्मी विशाल गायकवाड, विशाल गायकवाड, वीरेश चडचणकर, वैभव हत्तुरे, शीतल गायकवाड, श्रीनिवास आशप्पा करली, श्रीनिवास पोतन, श्रीशैल हिरेपट, सीमा महेश, धुळम, स्नेह विद्यासागर श्रीराम आदींचा समावेश आहे.

# 'सात अपक्ष' महाविकास आघाडीकडून लढणार निवडणूक

▸▸ छाननीत अर्ज बाद झाल्याने अपक्ष उमेदवारांना पुरस्कृत करण्याची नामुष्की




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत भाजपला हद्दपार करण्यासाठी चंग बांधलेल्या महाविकास आघाडीला शेवटच्या क्षणापर्यंत १०२ ठिकाणी उमेदवार देण्यासाठी धावाधाव करावी लागली. तरीही तांत्रिक चुकांमुळे काँग्रेस, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने अपक्षांना पुरस्कृत करावे लागले. यामध्ये काँग्रेसने तीन प्रभागातील पाच उमेदवारांना, शिवसेनेने (उबाठा) एका प्रभागात दोन उमेदवारांना तर राष्ट्रवादी काँग्रेसने सपाचे उमेदवार व माजी महापौर यू.एन. बेरिया यांना पुरस्कृत केले आहे.

काँग्रेसने प्रभाग दोनमध्ये हमीबा पटेल या अपक्ष उमेदवारास, प्रभाग चारमध्ये दोन अपक्ष उमेदवारांना पुरस्कृत केले आहे. याम



ध्ये केदार म्हमाणे व घाडगे या अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे. प्रभाग २ व ४ मध्ये पक्षाने एबी फॉर्म दिलेले उमेदवारांचे अर्ज बाद झाले होते. प्रभाग सहामध्ये अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे उम दवार भाजपकडून अर्ज भरल्याने महाविकास आघाडीकडून उमेदवार राहिला नाही. यामुळे चारही ठिकाणी अपक्ष उमेदवारांना पुरस्कृत करण्यात आले. यामध्ये काँग्रेसने प्रभाग सहामध्ये काँग्रेसने मंगल बंगाळे व एकनाथ गेजगे या दोन अपक्ष उमेदवारांना पुरस्कृत केले आहे तर शिवसेने दोन अपक्षांना पुरस्कृत केले आहे.

#### पाच प्रमुख पक्ष, अपक्षांना पुरस्कृत करण्याची वेळ

महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, मनसे व माकप या पक्षांचा समावेश आहे. पण प्रभाग सहामध्ये शिवसेनेकडून (उबाठा) कडून जाहीर केलेले चारही उमेदवार ऐनवेळी शिवसेनेचा एबी फॉर्म घेऊन भाजपकडून उमेदवारी अर्ज दाखल केले. यामुळे या प्रभागात शिवसेनेकडून दोन तर काँग्रेसकडून दोन उमेदवारांना पुरस्कृत केले आहे.

#### शिवसेनेकडून सपाटेंचा पाठिंबा मागे

प्रभाग क्रमांक सहामधील माजी महापौर मनोहर सपाटेंच्या अपक्ष उमेदवारांच्या पॅनेलला पुरस्कृत केल्यानंतर मोठा वाद निर्माण होण्याची चिन्हे होती. छावा संघटनेचे योगेश पवार यांनी सपाटेंना ठाकरेंच्या सेनेने पुरस्कृत केल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत पाठींबा माघारी घ्या, अन्यथा आंदोलन करू, असा इशारा दिला होता. त्यानंतर शिवसेना ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरी यांनी प्रभाग क्रमांक ६ मधील ब प्रवर्गातील ओबीसी आणि क प्रवर्गातील सर्वसाधारण महिला अपक्ष अशा दोनच उमेदवारांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे पुरस्कृत करण्याचा निर्णय घेतला आहे.



# मूलभूत सोई सुविधांना प्राधान्य देण्याचा निर्धार

### प्रभाग २२ मध्ये भाजप उमेदवारांच्या पदयात्रेला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २२ मधील भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार किसन जाधव, दत्तात्रय नडगिरी, अंबिका नागेश गायकवाड आणि चैत्राली शिवराज गायकवाड यांच्या प्रचाराला नागरिकांकडून उत्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

मंगळवारी सेटलमेंट परिसरात पदयात्रा व मतदार संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ईच्छा भगवंताची परिवाराचे आधारस्तंभ व मार्गदर्शक लक्ष्मण जाधव तसेच प्रभाग क्रमांक २२ चे माजी नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही पदयात्रा पार पडली. यावेळी लिमयेवाडी, कावळा गल्ली, मंजुनाथ नगर, सनत नगर आदी भागांमध्ये नागरिकांच्या गाठीभेटी घेत त्यांच्या समस्या, सूचना व अपेक्षा जाणून घेण्यात आल्या. प्रचारा दरम्यान पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या माध्यमातून प्रभागात राबविण्यात आलेल्या विकासकामांची माहिती मतदारांशी संवादातून देण्यात आली.

रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, वीज, आरोग्य, स्वच्छता आणि पर्यावरण विषयक कामांना पुढील काळात प्राधान्य दिले जाईल, असे उमेदवारांनी सांगितले. पदयात्रेदरम्यान नागरिकांनी स्थानिक प्रश्न मांडत भविष्यातील विकासाबाबत अपेक्षा व्यक्त केल्या.

# सोलापूर महापालिकेत सन २०१७ ठरले राजकीय टर्निंग पॉइंट






**बदललेल्या जनमतामुळे स्थानिक राजकारणाचे सत्तासमीकरण बदलले**

**काँग्रेस - राष्ट्रवादीच्या दीर्घकालीन वर्चस्वाला छेद देत २०१७ मध्ये भाजपचा ऐतिहासिक विजय**

**१५ वर्षांत सत्तेचा रंग बदलला; भाजपा थेट सत्तास्थानी विराजमान**

**मागील तीन निवडणुकांमध्ये पाणी प्रश्न जैसे थे!**

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

सोलापूर महापालिकेच्या मागील चार निवडणुकांचा तुलनात्मक राजकीय पक्षीय बलाबल पाहिले असता सोलापूर महापालिकेचे राजकारण काँग्रेस-राष्ट्रवादी वर्चस्वातून पुढे भाजप केंद्रित सत्तेकडे झुकले आहे. २००२ ते २०१७ मध्ये सत्तासमीकरण कसे बदलले तर काँग्रेस-राष्ट्रवादीच्या वर्चस्वापासून भाजप-शिवसेनेच्या उदयापर्यंत, चार निवडणुकांतून बदलते जनमत दिसून आले आहे. २०१७ हा टर्निंग पॉइंट ठरला. ज्यात राष्ट्रीय राजकारणातील बदलांचा थेट परिणाम स्थानिक पातळीवर स्पष्टपणे दिसून आला. भाजपाने प्रथमच सोलापूर महापालिकेत सत्ता खेचून आणली.

सन २००२ ते २०१७ या काळात सोलापूर महापालिकेच्या चार सार्वत्रिक निवडणुका झाल्या. या दरम्यान, भाजप आणि काँग्रेसचा राजकीयदृष्ट्या आलेख हा चढ उताराचा असल्याचा दिसून येतो. सोलापूर महापालिकेत सन २००२ ते २०१२ या कार्यकाळात काँग्रेस-राष्ट्रवादीचे निर्विवाद वर्चस्व होते. या कालखंडात काँग्रेस हा महापालिकेतील केंद्रबिंदू राहिला. शहराच्या राजकारणावर पारंपरिक नेतृत्वाची पकड स्पष्टपणे दिसून आली. त्यानंतर काँग्रेस - राष्ट्रवादीच्या दीर्घकालीन वर्चस्वाला छेद देत २०१७ मध्ये भाजपचा ऐतिहासिक विजय मिळवला असल्याचे दिसून येते.

सोलापूर महापालिकेच्या सन २००२ ते २०१७ या काळात चार सार्वत्रिक निवडणुका झाल्या आहेत. प्रत्येक निवडणुकीत राजकीय गणिते बदललेली असल्याचे स्पष्ट होते. या चार पैकी काही निवडणुकांमध्ये भाजप व शिवसेना यांची युती होती. दरम्यान, काँग्रेस व राष्ट्रवादी यांनी स्वबळावरही निवडणुका लढवल्या. निवडणुकीनंतर मात्र सत्ता स्थापन करताना आघाडी केली. मागील तीन निवडणुकांमध्ये पाणी प्रश्न गाजला होता. दररोज पाणीपुरवठ्याचे गाजर भाजप आणि काँग्रेस पक्षाने सोलापूरकरांना दाखवले. एकूण राजकीय संख्या बळाचा आलेख पाहता २०१२ मध्ये काँग्रेसच्या ४५ आणि राष्ट्रवादीच्या १६ जागांनी सत्ता मजबूत झाली होती. २००२ ते २०१७ हा कालखंड सोलापूर महापालिकेसाठी परंपरागत काँग्रेस-राष्ट्रवादी वर्चस्वातून भाजपकेंद्रित राजकारणाकडे वाटचाल करणारा निर्णायक टप्पा ठरला. २०१७ ची निवडणूक ही केवळ स्थानिक नव्हे, तर राष्ट्रीय राजकीय प्रवाहाचे प्रतिबिंब ठरली.

**२००२-२०१२ : काँग्रेस- राष्ट्रवादीचा प्रभाव**

सन २००२-२०१२ या कार्यकाळात काँग्रेसने सातत्याने सर्वाधिक जागा मिळवत शहराच्या राजकारणावर वर्चस्व राखले. सन २०१२ मध्ये काँग्रेस ४५, राष्ट्रवादी १६ अशा मजबूत संख्याबळाने सत्ता केंद्रित होती.

**भाजपची सातत्यपूर्ण वाटचाल**

भाजपने घसरणीतून झेप घेत २००२ मध्ये २९ जागा, २००७ मध्ये घसरण होत १५ जागांपर्यंत आलेला भाजप २०१२ मध्ये २५ जागांवर सावरला. २०१७ मध्ये ४९ जागा जिंकत भाजपने महापालिकेतील सत्ता इतिहासात प्रथमच स्वबळावर हस्तगत केली.

**२०१७ : सोलापूरच्या राजकारणातील निर्णायक उलथापालथ**

सन २०१७ मध्ये झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीतकाँग्रेस-राष्ट्रवादीचे एकत्रित संख्याबळ केवळ अनुक्रमे १४ आणि चार जागा याप्रमाणे एकूण १८ वर येणे ही मोठी राजकीय घसरण ठरली. शिवसेनेने २१ जागा जिंकत दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून भूमिका बजावली. भाजपाने तब्बल ४९ जागा पटकावल्या. १९६४ नंतर (१९८५ चा पुलोद प्रयोग अपवाद) प्रथमच भाजपाची एक हाती सत्ता प्रस्थापित झाली. भाजपाचा ऐतिहासिक विजय ठरला.

**नव्या राजकीय घटकांचा उदय; मतांचे विभाजन**

महापालिकेच्या दोन निवडणुकांमध्ये मत विभाजन झाल्याचे दिसून येते. २००७ मध्ये १० अपक्ष व छोट्या पक्षांनी लक्षणीय उपस्थिती नोंदवली. २०१७ मध्ये एमआयएमने ९ जागा जिंकत शहरातील राजकारणात नवा प्रभावी घटक म्हणून प्रवेश केला. त्यामुळे राजकीय गणिते बदलली. त्याचा फटका मोठ्या प्रमुख पक्षांना बसला. २००७ मध्ये अपक्ष व छोट्या पक्षांचे वाढते संख्याबळ दिसले. याच निवडणुकीत जनसुराज्य शक्ती पार्टीने ३ जागा जिंकल्या होत्या. माकपा व बहुजन पक्षांची मर्यादित भूमिका दिसून येते. माकपा, बसपा, रिपाइं यांची उपस्थिती निवडणुकांत राहिली मात्र निर्णायक प्रभाव टाकण्याइतके संख्याबळ तयार झाले नाही.

**सोलापूर महापालिका पक्षनिहाय जागांची तुलनात्मक आकडेवारी**

| पक्ष/ निवडणूक | २००२ | २००७ | २०१२ | २०१७ |
|---|---|---|---|---|
| काँग्रेस | ४२ | ४० | ४५ | १४ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | १२ | १४ | १६ | ०४ |
| भाजप | २९ | १५ | २५ | ४९ |
| शिवसेना | ११ | ०९ | ०८ | २१ |
| माकपा | ०३ | ०३ | ०३ | ०१ |
| बसपा | ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| एमआयएम | - | - | - | ०९ |
| अपक्ष | - | १० | ०१ | - |
| रिपाइं | - | ०२ | ०१ | - |
| जनस्वराज्य शक्ती | - | ०३ | - | - |
| एकूण जागा | ९८ | ९८ | १०२ | १०२ |

**माकपा व बहुजन समाज पक्षाचा सातत्यपूर्ण पण मर्यादित प्रभाव**

सोलापूर महापालिकेच्या चारही निवडणुकांमध्ये माकपा व बहुजन समाज पक्षाचा सातत्यपूर्ण पण मर्यादित प्रभाव दिसून आला. माकपा, बसपा यांची उपस्थिती चारही निवडणुकांत कायम राहिली मात्र सत्ता स्थापनेसाठी किंवा निर्णायक वळण देण्यासाठी आवश्यक संख्याबळ निर्माण करता आले नाही. रिपाइंने सन २००७ मध्ये २ आणि सन २०१२ च्या निवडणुकीत एक जागा पटकावली होती.

**२००७ मध्ये १० अपक्ष नगरसेवक**

सरोजिनी जावळे, अविनाश बोमड्याल, विनायक कोंड्याल, खलिफा नसीम बागवान, भीमाशंकर बोळकोटे, राजेंद्र कुर्ले, संजय हेमगड्डी, धोंडाबाई उडासे (जमादार), आप्पासाहेब हत्तुरे, सुमन साळुंके आदी.

# ज्ञानामृत आनंदलहरी १३२०

**मार्गी अंधासरिसा। पुढें देखाणाही चाले जैसा।**
**अज्ञाना प्रकटावा धर्मु तैसा। आचरोनि**

नेतृत्वाची गरज नाही असे क्षेत्र असत नाही. अर्थात, चांगले नेतृत्व करणाऱ्यांची समाजाला खूप गरज आहे; पण दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते की, असे नेतृत्व करणाऱ्यांची संख्या कमी आहे. बरेच लोक चांगले नेतृत्व करणाऱ्यांच्या मागे जाण्याऐवजी दिखाऊ, भपकेबाज नेतृत्व करणाऱ्यांच्या मागे जात असतात. त्याचा विपरीत परिणाम त्या व्यक्तिंबरोबर समाजालाही भोगावा लागत असतो. आधी केले। मग सांगितले, असे नेतृत्व करणारे तसे कमी सापडतात. स्वत: नको तसे वागायचे आणि दुसऱ्यांना मात्र मोठ-मोठया गोष्टी सांगायच्या, ही नेतृत्व करणाऱ्यांपैकी अनेकांना सवय झालेली असते. एकदा मला सहज उपलब्ध होणारा एक अध्यात्मिक विचाराचा म्हणून व्यसनमुक्तीच्या एका खाजगी कार्यक्रमाला सहनेता (सह व्याख्याता) म्हणून बोलावण्यात आले होते. व्यसनमुक्तीवर व्याख्यान देणारी प्रमुख व्यक्ती विश्रामगृहावर थांबली होती. त्यांचा परिचय व्हावा म्हणून मी तेथे गेलो. बऱ्याचवेळेनंतर ते स्वच्छता गृहातून बाहेर आले. ते बाहेर येताच मी त्या स्वच्छता गृहात लघुशंकेसाठी गेलो. मला मध्ये उभे राहवत नव्हते. तंबाखू खाऊन थुंकलेली खूप घाण दिसत होती. धुराचांही खूप वास येत होता. या महाशयाव्यतिरिक्त कोणीही स्वच्छता गृहात गेले नव्हते. स्वत: बिडी, सिगारेट, तंबाखू सेवन करणारे व्यसनमुक्ती विषयाचे नेतृत्व करीत होते. जवळपास सर्वच क्षेत्रात काही प्रमाणात नेतृत्व करणारी मंडळी अशीच आहे. सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात आज या बाजूने तर उद्या त्या बाजूने, आर्थिक क्षेत्रात आज याला टोपी तर उद्या त्याला टोपी, अध्यात्मिक क्षेत्रात आज हा देव, तर उद्या ती देवी किंवा अन्य कांही असे अस्थिरपणात्मक धरसोड करणाऱ्यांची बरीच संख्या दिसून येते. स्वत: स्थिर नसणारे हे नेते इतरांना काय आणि कसे स्थैर्य देतील? अनेक व्यावहारिक, स्वार्थी लोकांची एकमेकांतील हातमिळवणी चांगले नेतृत्व करणाऱ्यांना मागे टाकते आहे. स्वत:च्या उन्नतीसाठी वेगाने धावणारे हे नेते सामान्यांना सोबत घेउन जाणे कठीण आहे. आंधळया माणसाला डोळस माणसाने सोबत न्यायला पाहिजे. प्रसंगानुरुप आंधळ्यासाठी डोळसालाही हळूहळू व काळजीपुर्वक चालावे लागते. त्याप्रमाणे नेतृत्व करणाऱ्या या ज्ञानी लोकांनी अज्ञानी लोकांना बरोबर घेउन चालायला हवे. स्वत: धर्माचरण (धर्म म्हणजे निती-नियमाला अनुकूल असे वर्तन) करुन इतरांना निती नियमाचे धडे दिले पाहिजेत. नेतृत्व करणाऱ्यांकडून अशी अपेक्षा करतांना ज्ञानेश्वर माउली म्हणतात,

मार्गी अंधासरिसा। पुढें देखाणाही चाले जैसा।
अज्ञाना प्रकटावा धर्मु तैसा। आचरोनि

समाजाच्या कल्याणासाठी नेतृत्व करणारे, व्याख्यान देणारे अनेक नेते बऱ्याचवेळा स्वार्थ पाहत असतात. अनेक नेते एखाद्या व्यक्तीच्या किंवा समुहाच्यावतीने तक्रारी देतात, नंतर देवाण-घेवाण करुन दिलेली तक्रार परत घेतात किंवा आता आमचे काही म्हणणे नाही, असे म्हणतात. भ्रष्टाचार (भ्रष्ट आचार/ अयोग्य वर्तन) करु नये म्हणून मोठ-मोठयाने सांगतात आणि स्वत: मात्र भ्रष्टाचार (भ्रष्ट आचार/ अयोग्य वर्तन) करीत असतात. प्रेक्षकासाठी नेतृत्व करणाऱ्या अनेक नायक-नायिका चित्रपटातून, मालिकातून उत्कृष्ट भूमिका करतात आणि स्वत:च्या जीवनात मात्र नको त्या पध्दतीने वागतात. हे सर्व पाहिले की, नेतेच नको वाटतात. पण नेतृत्वाशिवाय समाज चालणे कठीण असते. त्यामुळे स्वत:च्या जीवनात कष्ट भोगून समाजाला दिशा देणाऱ्या ज्ञानोबाराय, जगद्गुरु तुकाराम महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज इत्यादींसारख्या नेत्यांच्या विचारांच्या नेतृत्वाची देशाला गरज आहे. ही गरज आपणाला पूर्ण करता आली तर फारच छान. अशाने आपल्याबरोबर इतरांचाही आनंद वाढेल. आपणाला ही गरज पूर्ण करता आली नाही, तरी चालेल; पण आपल्या नेतृत्वाखाली कुटुंब, गट, समाज दिशाहिन होणार नाही, एवढी दक्षता घेतली तरी पुरेसे होईल, असे आम्हास वाटते. जय जय राम कृष्ण हरी.



**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# सुप्रभात

## आजचा दिवस

**वार : शनिवार, दि. ८ जानेवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके - १९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - पौष. षष्ठी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- पू. फाल्गुनी (१२.२३)**
**योग - सौभाग्य (१७.२४)**
**करण - गरज (१८.४२)**
**राहू काल : गुरुवार : दु. १.३० ते ३.००**

**दिनविशेष : मराठी साहित्यिक विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाला. २००१: भारत आणि व्हिएतनाम दरम्यान सांस्कृतिक, पर्यटन आणि अणूऊर्जेच्या शांततापूर्ण वापरासाठी तीन महत्त्वाच्या करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. १७९०: अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांनी न्यूयॉर्कमध्ये पहिले 'स्टेट ऑफ द युनियन' भाषण दिले.**



# लोकमंगल पतसंस्था, शेळगी शाखेत पत्रकारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

पत्रकार दिनानिमित्त लोकमंगल पतसंस्था, शेळगी शाखा यांच्या वतीने पत्रकारांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. त्यांना शाल, भेटवस्तू तसेच पतसंस्थेचा वार्षिक अहवाल प्रदान करून गौरविण्यात आले.

हा सत्कार ज्येष्ठ नागरिक सुभाष हिरेमठ, शिवशंकर बसव सुलगडले, मल्लिनाथ बिराजदार, श्री. कलशेट्टी, निवृत्त शिक्षिका शशिकला वांगीकर, ग्रंथपाल नंदा कुर्ले यांच्या हस्ते करण्यात आला. पतसंस्थेचा परिचय व संस्थेची सामाजिक वाटचाल याविषयी माहिती मेहबूबी शेख व शिवगंगा होडगे यांनी दिली. सूत्रसंचालन विद्याश्री हळगुणकी यांनी केले. मयुरी सुरवसे यांनी आभार मानले. सत्कारमूर्ती पत्रकार याप्रमाणे : नागसेन शिवशरण (तरुण भारत), सिद्धार्थ भडकुंभे, विश्वभूषण लिमये, यासिन शेख, अनिकेत गायकवाड, खीजर पगडीवाले.

# पत्रकारांचे सहकार्य 'अविस्मरणीय' : जिल्हाधिकारी

## महसूल बीट पत्रकारांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील विविध दैनिकांचे पत्रकार, विविध चॅनलचे प्रतिनिधींनी गेल्या अडीच वर्षात जिल्ह्यात विविध विकासकामे करताना किंवा योजना राबविताना केलेले सहकार्य 'अविस्मरणीय' असल्याच्या भावना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज (दि.७) व्यक्त केल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल बीटच्या पत्रकारांचा गौरव करण्यात आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले.

येथील नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित महसूल बीट प्रतिनिधी यांचा पत्रकार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, मराठी श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, दै. तरुण भारतचे वरिष्ठ उपसंपादक तथा महसूल बीटचे



अध्यक्ष अविनाश गायकवाड, पत्रकार महेश पांढरे, बाळकृष्ण दोड्डी, प्रमोद बोडके, संतोष आचलरे, आफताब शेख, सागर सुरवसे उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकार बांधवांचा ६ जानेवारी हा दिवस आपण पत्रकार दिन म्हणून साजरा करतो. शहर आणि जिल्ह्यातील पत्रकार बांधवांनी मला जिल्ह्यातील विविध विकासकामे करताना सहकार्य केलेले आहे. त्यांच्या ऋणातून काहीअंशी उतराई होण्याचा मी या सत्कार सोहळ्यातून प्रयत्न करीत आहे. मी गेली अडीच वर्षे सोलापुरात काम केले आहे. या कार्यकाळात मला आषाढी, कार्तिकी एकादशी, सप्टेंबर २०२५ या महिन्यामध्ये आलेला महापूर, विमानतळ, आयटी पार्क, पंढरीतील श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील कॉरिडॉर, शहरातील उड्डाणपुलांचा विषय असो अथवा बोरामणी विमानतळाचा विषय या सर्व कामात पत्रकार बांधवांचे सहकार्य लाभले. मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होवून पूर परिस्थिती निर्माण झालेली होती.यावेळी प्रसार माध्यमाने प्रशासनाशी सहकार्याची भूमिका ठेवल्याने प्रशासनाला अधिक गतीने काम करणे शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते पत्रकार दिनाचे औचित्य साधून सर्व महसूल बीट प्रतिनिधी यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांनी तर प्रमोद बोडके यांनी मानले. कार्यक्रमास पत्रकार संजय येऊलकर, रमाकांत साळुंके, चंदन बोल्लू, मनोज भालेराव, संगमेश जेऊरे, अविनाश कुलकर्णी, राहूल रणदिवे, मुन्ना शेख, चंद्रशेखर गायकवाड, अनिल शिराळकर, शेखर गोतसुर्वे, अनिकेत गायकवाड, प्रितम पंडीत, सागर सुरवसे, वशीम अत्तार, सौरभ वाघमारे, विश्वभूषण लिमये, विश्वनाथ बिराजदार, प्रशांत कटारे, मनोज हलसुरे, शिवाजी सुरवसे, दयानंद मामड्याल, दिगंबर ईप्पलपल्ली आदींची उपस्थिती होती.

**निवडणुकीनंतर होणार आयटी पार्क**

गेल्या २ महिन्यांपासून सतत पाठपुरावा करुन आयटी पार्कचा विषय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अंतिम टप्प्यात आणला आहे. जागा, पाणी, रस्ते-वीज आदी मुलभूत गरजांची पूर्तता केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्यानंतर सोलापुरात आयटी पार्कचे काम सुरु होवून ते लवकरच उभारणार असल्याचेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नमूद केले.



# पोलीस रेझिंग डे निमित्त आयुक्तालयात कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

राज्यात २ जानेवारी १९६१ रोजी राज्यस्तरीय पोलीस दलाची स्थापना करण्यात आली. या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून पोलीस रेझिंग डे साजरा केला जातो. यानिमित्ताने सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयात शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर येथे पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) गौहर हसन, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ) विजय कबाडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे/ विशा) डॉ. अश्विनी पाटील तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) राजन माने यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमासाठी सोलापूर शहरातील के. एल. ई. इंग्लिश मीडियम स्कूल, जुळे सोलापूर, पोदार इंटरनॅशनल स्कूल, विजापूर रोड, सोलापूर, कॅम्प शाळा, सोलापूर या शाळांमधील विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमादरम्यान पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) राजन माने व पोलीस निरीक्षक धनाजी शिंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वाती येळे, पोलीस उपनिरीक्षक अश्विनी काळे तसेच महिला पोलीस अधिकारी व अंमलदार शीतल माने, सीमा खोगरे, सरस्वती घाडगे, इंदिरा राठोड, कविता डांगे, नसीमा शेख, निलम माळवे, अरुणा परब, सविता म्हेत्रे, उषा मळगे, प्रिया ढेपे व सुजाता जाधव यांनी यशस्वीरीत्या केले. कार्यक्रमासाठी २०० विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# घरात घुसून कुटुंबावर मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

सलगरवस्ती पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरात घुसून एका कुटुंबावर मारहाण व दमदाटी केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना रविवार, दि. ४ जानेवारी रोजी रात्री सुमारे ९.४५ वाजण्याच्या सुमारास सोलापूर शहरात घडली. याबाबत सलगरवस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीने दि. ५ जानेवारी रोजी पहाटे २.१७ वाजता तक्रार नोंदविली आहे. यावेळी आरोपी इस्माईल मौला ढवळगी, रिजवान ढवळगी, अकलाख ढवळगी व खलील अल्लाबक्ष हुंचाळकर सर्व रा. डोणगाव रोड, सोलापूर यांनी फिर्यादीच्या घरासमोर येऊन शिवीगाळ केली. त्यानंतर घरात जबरदस्तीने प्रवेश करून फिर्यादी व तिच्या कुटुंबीयांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करत दम दाटी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार उपासे करीत आहेत.



# स्वच्छ भारत व जलजीवन मिशनचे कर्मचाऱ्यांना ग्रामविकास विभागात कायम करणार : पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षात जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत एकत्रित कर्मचारी गेल्या २० वर्षापासून काम करीत आहेत. या कर्मचारी यांना ग्राम विकास विभागात कायम करण्यात यावे. याबाबत छत्रपती संभाजीनगर मॅट न्याय प्राधिकरण यांनी कायम करण्याचे आदेश दिला आहे. याबाबत निवेदन सोलापूर जिल्हा परिषदेत ग्रामविकास व पंचायराज मंत्री जयकुमार गोरे यांनी पाणी व स्वच्छता कर्मचारी कृती समितीचे राज्याचे कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी दिले.

सोलापूर जिल्हा परिषदेत आज राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाची कामाचा आढावा घेण्यासाठी आले होते. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, उपमुख्य कार्यकारी अमोल जाधव, शंकर बंडगर, यशवंती धतु, दिपाली व्हटे, प्रतीक्षा गोडसे, सचिन सोनवणे, महादेव शिंदे, प्रशांत दबडे, आनंद मोची उपस्थित होते.

# मोटार अपघात दावा अर्जांच्या प्रक्रियांबाबत व्याख्यानातून मार्गदर्शन

## बार असोसिएशनच्या वतीने व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

बार असोसिएशनच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विधी व्याख्यानमालेचा ज्ञानसमृद्ध प्रवास सातत्याने सुरू असून, त्याच मालिकेतील दहावे व्याख्यान सोलापूर बार असोसिएशन हॉल येथे संपन्न झाले.

मोटार अपघात दावा अर्जांच्या प्रक्रियात्मक बाबी, अर्ज दाखल करण्यापासून ते अंतिम निर्णयापर्यंतचे टप्पे, पुराव्यांचे महत्त्व, न्यायालयीन कामकाजातील व्यवहार्य अडचणी तसेच प्रभावी युक्तिवादासाठी आवश्यक बाबींवर त्यांनी प्रकाश टाकला.

या व्याख्यानासाठी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. एल. एन. मारडकर, सोलापूर बार असोसिएशनचे माजी



अध्यक्ष व अनुभवी कायदेतज्ज्ञ, हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी "Procedural Aspect of Motor Accident Claim Petition " या महत्त्वाच्या व व्यवहारोपयोगी विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव हे होते. प्रमुख वक्त्यांचा अल्पपरिचय बार असोसिएशनचे खजिनदार ॲड. अरविंद देडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन बारचे सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे यांनी केले. आभार सहसचिवा ॲड. मीरा प्रसाद यांनी मानले. यावेळी ॲड. पी. ए. कुलकर्णी, ॲड. मल्लिनाथ पाटील, ॲड. अशोक जालादी, ॲड. संतोष पाटील, ॲड. परमानंद जवळकोटे, ॲड. लक्ष्मण म्हेत्रे, ॲड. संतोष म्हमाणे, ॲड. महेश जाधव, ॲड. अविनाश कडलासकर, ॲड. गणेश माशाळे, ॲड. संजय पवार, ॲड. आशुतोष होरगीनमठ, ॲड. अविनाश खरटमल, ॲड. अनिरुद्ध सोनावणे, ॲड. सागर हंबीरराव, ॲड. सोनाली कोंडा उपस्थित होते.

# 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' नवा सिझन सुरु

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

महाराष्ट्राची हास्यजत्रा पुन्हा एकदा हास्याची धमाल घेऊन परत येत आहे. महाराष्ट्रातील लाखो कुटुंबांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या शोचा नवीन सीझन ५ जानेवारीपासून दर सोम आणि मंगळवार रात्री ९ वा. सोनी मराठीवर प्रदर्शित झाला आहे.

गेल्या अनेक सीझन्सपासून कुटुंबांना एकत्र बसून बिनधास्त हसण्याचं कारण देणाऱ्या या शोचे कलाकार, लेखक आणि दिग्दर्शक नव्या ऊर्जेसह सज्ज झाले आहेत. प्रेक्षकांचा आवडता ओंकार भोजने याने नुकताच महाराष्ट्राची हास्यजत्रा कार्यक्रमात पुनरागमन केले होते. त्याच्या नवीन प्रहसनाची देखील प्रेक्षक आतुरतेने वाट बघत होते.

# रेल्वे डिजिटल सुविधेसह अनारक्षित तिकीट बुकिंगवर ३ टक्के सवलत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

भारतीय रेल्वेने आपल्या ऑल-इन-वन सुपर ॲप, रेलवन ॲपद्वारे, डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि प्रवाशांची सोय वाढवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सध्या, रेलवन ॲपवरील आर-वॉलेटद्वारे अनारक्षित तिकिटे बुक करणाऱ्या प्रवाशांना कॅशबॅक म्हणून ३% बोनस मिळतो. डिजिटल बुकिंगचा अधिक प्रसार करण्यासाठी आणि कॅशलेस पेमेंट पद्धतींच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी, आता रेलवन ॲपवर उपलब्ध असलेल्या आर-वॉलेट वगळता इतर सर्व डिजिटल पेमेंट पद्धतींद्वारे केलेल्या अनारक्षित तिकीट बुकिंगवर ३% सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत रेलवन ॲपवर आर-वॉलेट व्यतिरिक्त इतर डिजिटल पेमेंट पद्धती वापरून बुक केलेल्या अनारक्षित तिकिटांवर ३% सवलत दिली जाईल. रेलवन ॲपवरील आर-वॉलेटद्वारे अनारक्षित तिकिटे बुक करणाऱ्या प्रवाशांना कोणताही बदल न करता, सध्या मिळत असलेला ३% बोनस कॅशबॅक म्हणून मिळत राहील. ही विशेष डिजिटल सवलत योजना १४ जानेवारी ते १४ जुलै पर्यंत लागू राहील, ज्यामुळे प्रवाशांना फायदा मिळेल. रेल्वे वापरकर्ते अँड्रॉइड डिव्हाइसवरील प्ले स्टोअर आणि आयओएस डिव्हाइसवरील ॲप स्टोअरवरून रेलवन ॲप सहजपणे त्यांच्या मोबाइलवर डाउनलोड करू शकतात.

# उत्तरायण : प्रकाशाचा उत्सव आणि आध्यात्मिक चैतन्याचा काळ

'उत्तरायण' म्हणजे केवळ सूर्याची दिशा बदलणे नव्हे, तर तो अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याचा एक आध्यात्मिक प्रवास मानला जातो.भारतीय कालौघात ऋतूचक्र आणि सूर्याचे भ्रमण यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. पृथ्वी सूर्याभोवती फिरताना तिचे झुकणे आणि सूर्याची स्थिती यानुसार वर्षाचे दोन प्रमुख भाग पडतात: उत्तरायण आणि दक्षिणायन. यातील 'उत्तरायण' हा काळ शुभकार्यासाठी, ज्ञानसाधनेसाठी आणि सकारात्मकतेसाठी अत्यंत पवित्र मानला जातो.

पृथ्वी स्वतःच्या अक्षावर २३.५ अंशात कललेली आहे. यामुळे सूर्याचे दर्शन पृथ्वीवरून होताना तो उत्तर किंवा दक्षिण दिशेला सरकल्यासारखा वाटतो. जेव्हा सूर्य मकर राशीत प्रवेश करतो आणि उत्तर दिशेकडे झुकू लागतो, तेव्हा त्या काळाला 'उत्तरायण' म्हणतात. या काळात दिवस मोठा आणि रात्र लहान होऊ लागते. जेव्हा सूर्य कर्क राशीत प्रवेश करून दक्षिण दिशेकडे झुकतो, तेव्हा त्याला 'दक्षिणायन' म्हणतात. या काळात रात्र मोठी आणि दिवस लहान असतो.

अध्यात्मिक दृष्टिकोनातून उत्तरायण हा 'देवयान' मार्ग मानला जातो. शास्त्रानुसार, उत्तरायणाचे सहा महिने हा देवांचा एक दिवस असतो, तर दक्षिणायनाचे सहा महिने ही देवांची एक रात्र असते. महाभारतातील भीष्म पितामहांचे उदाहरण उत्तरायणाचे महत्त्व अधोरेखित करते. त्यांनी शरपंजरी पडलेले असतानाही आपला देह त्यागण्यासाठी उत्तरायणाची प्रतीक्षा केली होती. असे मानले जाते की, उत्तरायणात देह त्यागणाऱ्या आत्म्याला पुनर्जन्म घ्यावा लागत नाही आणि तो मोक्षाला प्राप्त होतो.हा काळ सत्त्वगुणांच्या वाढीसाठी पोषक असतो. ध्यान, धारणा आणि योगसाधनेसाठी उत्तरायण हा सर्वोत्तम काळ मानला जातो, कारण या काळात निसर्गातील ऊर्जा ऊर्ध्वगामी (वरच्या दिशेला जाणारी) असते.

**सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व**

भारतीय समाजात उत्तरायणाचा प्रारंभ 'मकर संक्रांत' या सणाने साजरा केला जातो. हा सण सामाजिक ऐक्य आणि स्नेहाचे प्रतीक आहे. तिळगूळ घ्या, गोड गोड बोला असे म्हणत आपण जुने हेवेदावे विसरून नाती घट्ट करतो. थंडीच्या दिवसात तीळ आणि गूळ हे आरोग्यासाठीही उत्तम असतात. गुजरात आणि महाराष्ट्रात पतंग उडवण्याची मोठी परंपरा आहे. हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून, सूर्याच्या कोवळ्या उन्हात येऊन 'व्हिटॅमिन डी' मिळवण्याचा आणि निसर्गाशी नातं जोडण्याचा तो एक मार्ग आहे. या काळात गरिबांना अन्न, वस्त्र आणि धान्य दान करण्याची प्रथा आहे, ज्यामुळे समाजात दातृत्वाची भावना वाढीस लागते. उत्तरायण हे केवळ आध्यात्मिक नसून कृषी संस्कृतीशी जोडलेले आहे. दक्षिणायनातील थंडी ओसरू लागते आणि पिकांना आवश्यक असणारा सूर्यप्रकाश अधिक काळ मिळू लागतो. हा काळ शेतीतील नवीन हंगामाच्या तयारीचा असतो. निसर्गात चैतन्य येते, झाडांना पालवी फुटू लागते आणि सृष्टी पुन्हा एकदा हिरवीगार होते.

यंदाचे उत्तरायण खगोलशास्त्रीय दृष्टीने विचार केला तर सूर्याचे उत्तर दिशेला वळणे २१ किंवा २२ डिसेंबरलाच घडते. मात्र, भारतीय पंचांगानुसार आणि निरयन पद्धतीनुसार, मकर संक्रांतीच्या दिवशी उत्तरायणाचा प्रारंभ मानला जातो. यंदा मकर संक्रांत बुधवार, दि.१४ जानेवारी २०२६ रोजी आहे. या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करेल आणि अधिकृतपणे शुभ कार्यांना वेग येईल. लग्नसराई, गृहप्रवेश आणि इतर मंगल कार्यांसाठी हा काळ अत्यंत प्रशस्त मानला जातो. उत्तरायण हा केवळ सूर्याचा प्रवास नसून तो मानवी मनाच्या प्रगतीचा मार्ग आहे. आयुष्यात कितीही कठीण वेळ आली तरी, प्रकाशाचे किरण (उत्तरायण) नक्कीच येणार आहेत. या काळात आपण आपले विचार शुद्ध ठेवून, सामाजिक ऋण जपून आणि आध्यात्मिक प्रगतीचा ध्यास घेऊन जगले पाहिजे.

उत्तरायणात सूर्याचा कल उत्तरेकडे असतो, ज्यामुळे उत्तर गोलार्धात सूर्याची किरणे अधिक काळ आणि तीव्रतेने पडतात. हिवाळ्यात दक्षिणायनामुळे शरीरात सूर्याच्या प्रकाशाची कमतरता निर्माण झालेली असते. उत्तरायणाच्या सुरुवातीला उन्हात पतंग उडवणे किंवा घराबाहेर पडणे यामुळे शरीराला नैसर्गिकरीत्या ड-जीवनसत्व मिळते,



**धर्म-संस्कृती**
**प्रमोद (श्याम) जोशी**
**मो.7447788349**

जे हाडांच्या आरोग्यासाठी आणि प्रतिकारशक्तीसाठी आवश्यक आहे. हिवाळ्यातील कोरड्या हवेमुळे त्वचा आणि शरीरातील आर्द्रता कमी होते, ती टिकवून ठेवण्यासाठी आणि शरीरात उष्णता निर्माण करण्यासाठी तीळगुळाचे पदार्थ खाण्याचे शास्त्र आहे.

पृथ्वीच्या अक्षाच्या विचलनामुळे दर ७२ वर्षांनी संक्रांतीचा दिवस १ दिवसाने पुढे सरकतो. त्यामुळे हजार वर्षांपूर्वी जी संक्रांत डिसेंबरच्या शेवटी यायची, ती आता जानेवारीमध्ये येते. या काळात काही विशिष्ट धार्मिक विधींना विशेष महत्त्व दिले जाते. प्रयागराज (संगम), गंगासागर आणि नाशिक यांसारख्या तीर्थक्षेत्रांवर स्नान करण्याला महत्त्व आहे. असे मानले जाते की, उत्तरायणाच्या प्रारंभी पवित्र नद्यांमध्ये स्नान केल्याने शरीरातील नकारात्मक ऊर्जा नष्ट होते. महाराष्ट्रात महिला या काळात 'हळदी-कुंकू' समारंभ करतात. यात सुगडं (मातीची छोटी मडकी) पुजली जातात. त्यात ऊस, हरभरे, बोरं, गाजर आणि नवीन धान्य भरले जाते. हे निसर्गातील नवीन उत्पादनाचे पूजन आहे.

एहि सूर्य सहस्रांशो तेजोराशे जगत्पते ।
अनुकम्पय मां भक्त्या गृहाणार्घ्यं दिवाकर ।।
(अर्थ: हे सहस्र किरणांच्या स्वामी, तेजाचा पुंज असलेल्या जगत्पती सूर्या, माझ्यावर कृपा कर आणि माझ्या भक्तीने अर्पण केलेले हे अर्घ्य स्वीकार.)

## महत्वाचे...



## सेवालाल जि. प. शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी शिंगडगाव

**दक्षिण सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
मंद्रुप येथील सेवालाल नगर जिल्हा परीषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी रेवणसिद्ध शिंगडगाव व उपाध्यक्षपदी प्रियंका युवराज तिवारी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. रवि राठोड, दादासाहेब राठोड, सुनिल राठोड, बिळेंनी शेंडगे, सोनाली कोकेर, रवि राठोड, सावित्री चव्हाण, शबाना शेख, प्रमोद शिंदे, कांबळे, पवित्रा सुतार, प्रतिमा शिंदे, सुदीप जाधव, सुधाकर कोरे, आराध्या राठोड, सुनिल राठोड आदी सदस्यांची निवड करण्यात आली. सूत्रसंचालन अमन कोळी यांनी केले व शाळेचे मुख्याध्यापक राम इंगळे यांनी आभार मानले.



## प्रा. डॉ. गौस अहमद शेख यांना मेजर पदावर बढती

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
सोशल असोसिएशन कला आणि वाणिज्य महाविद्यालय सोलापूर, उर्दू विभागाचे उपविभाग प्रमुख आणि एनसीसी विभागाचे कॅप्टन प्रा. डॉ. गौस अहमद शेख यांना डीजी एनसीसी नवी दिल्ली यांनी मेजर या उच्च पदावर बढती दिली. ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कमांडिंग ऑफिसर रणधीर सतीश आणि लेफ्टनंट कर्नल शरब बाबर यांनी त्यांना मेजर पद प्रदान केले. कार्यक्रमात सुभेदार मेजर कृष्णा प्रसाद सबकोटा, सुभेदार यू.एन. शाहू, सुभेदार प्रदीप कदम, सुभेदार गोरख नाथ, नाईक सुभेदार महेश बी, बीएचएम गोपीनाथ बोडके, सर्व सीएचएम व सर्व हवालदार आणि सोशल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. इक्बाल तांबोळी, प्रा. डॉ. जैनुद्दीन मुल्ला यांनी त्यांचे अभिनंदन केले. डॉ. गौस अहमद शेख गेल्या १५ वर्षांपासून एनसीसी अधिकारी म्हणून सोशल महाविद्यालयात आपली सेवा बजावत आहेत.




## अक्कलकोट येथे रामानंद संप्रदायातर्फे ॲम्बुलन्सचे लोकार्पण

**अक्कलकोट, दि. ७ जानेवारी-**
अक्कलकोट येथे जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज रामानंद संप्रदाय तालुका सेवा समिती अक्कलकोटच्या वतीने रक्तदान शिबिर व ॲम्बुलन्स लोकार्पण सोहळा रविवार दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी पार पडला. शहरातील जुन्या राम मंदिरात सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी प्रतिमा पुजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास सोलापूर जिल्हा अध्यात्मिक प्रमुख शरद मते, श्री राजेरायमठाचे अध्यक्ष ॲड. शरद फुटाणे, सचिव किसन झिपरे, राम मंदिरचे ट्रस्टी अभय मनुरकर, मडिवाळाप्पा बदोले, जिल्हा महिला प्रमुख संजीवनी माने, तालुकाध्यक्ष लक्ष्मण पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्य महाराज अक्कलकोट तालुका सेवा समितीतर्फे व्यसनमुक्ती, नैसर्गिक कच्चे बंधारे बांधणे, मोबाईल टॉयलेटसाठी सहा लाखांची नगरपालिकेला मदत, पादुका दर्शन सोहळा असे उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती शरद मते व लक्ष्मण पवार यांनी दिली. यावेळी आयोजित केलेल्या शिबिरात ४६ जणांनी रक्तदान केले. कार्यक्रमास विद्या चव्हाण, अविनाश पाटील, नरसू गावडे (वागदरी), मंजुनाथ दुधनी, डॉक्टर अर्जुन जोगदे, युवराज जाधव, प्रकाश मोरे, एलआयसी प्रतिनिधी दत्तात्रय शिंदे, अभिजीत लोके उपस्थित होते.



## कृषी विद्यापीठ स्पर्धेसाठी ४५ खेळाडूंची निवड

**बार्शी, दि. ७ जानेवारी -**
कर्मवीर कृषीतंत्र विद्यालय बार्शी येथे झालेल्या कृषी तंत्रज्ञान शिक्षण विभागाच्या जिल्हास्तरीय निवड क्रीडा स्पर्धेतून विद्यापीठस्तरीय क्रीडा स्पर्धेकरिता ४५ खेळाडूची निवड झाली. या स्पर्धेमध्ये सोलापूर जिल्ह्यातील कृषीतंत्र विद्यालयातील सोलापूर, बार्शी, अनगर, बोराळे, गौडगांव, वडाळा, अकलूज, एखतपुर, कडलास अशा ९ कृषीतंत्र विद्यालयामधून १२५ खेळाडुंनी लांब उडी, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, रनिंग या क्रीडा प्रकारामध्ये सहभाग नोंदविला होता. या पाच क्रीडा प्रकारामधून ही निवड निश्चित झाली आहे. विद्यापीठस्तरीय क्रीडा स्पर्धा म.फु. कृ.वि. राहुरी येथे ३० व ३१ जानेवारी रोजी होणार आहेत. विजेता खेळाडूंचा मेडल व सहभाग प्रमाणपत्र देऊन संस्थेचे खजिनदार जे.सी. शितोळे व कृषीतंत्र विद्यालयाचे प्राचार्य जे.बी. पाटील यांनी गौरव केला. क्रीडा स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी म.फु.कृ. विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, श्री शि.शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार, खजिनदार जे.सी. शितोळे यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य गलांडे पी. आर. यांनी आभार मानले.

# पत्रकारांनो, शेतीप्रश्नांना वाचा फोडा

### डॉ. शिवाजी शिंदे; जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे कुलकर्णी, पाटील, शेख, गोसावी यांना पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.७ जानेवारी-**
सध्याच्या ग्लॅमरस जगात वस्तुनिष्ठ व सामान्यांचे प्रश्न मांडणारे तसेच शेतीप्रश्नांची मांडणी करणारे पत्रकार दुर्लभ झाले आहेत. त्यामुळे जगाचा पोशिंदा शेतकरी आपले प्रश्न सोडवण्यासाठी धडपडतोय. त्यामुळे पत्रकारांनो, आता शेतकऱ्यांचे प्रश्न मांडा असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले.



सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने पत्रकार दिनानिमित्त देण्यात येणाऱ्या पुरस्कारांचे वितरण डॉ. शिंदे व जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के यांच्या करण्यात आले. य़ावेळी डॉ. शिंदे बोलत होते. दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर व कै. रंगा अण्णा वैद्य यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमास सुरवात झाली. पुरस्कार निवड समितीचे अय्यूब अहमद यांनी उर्दू शायरीने सर्वांचे स्वागत केले. सचिव प्रा. पी.पी. कुलकर्णी यांनी प्रास्ताविकांसह पत्रकार संघाचा अहवाल सादर केला. अध्यक्ष अशोक मठपती व सहसचिव अबुबकर नल्लामंदू यांनी सर्व मान्यवरांचा शाल, बुके व स्मृतिचिन्ह देवून सत्कार केला. पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये स्व रंगा अण्णा वैद्य यांच्या स्मरणार्थ ज्येष्ठ पत्रकार पुरुषोत्तम कुलकर्णी, स्व. अ. लतीफ नल्लामंदू यांच्या स्मरणार्थ पत्रकार अप्पासाहेब पाटील, स्व. बाबुराव मठपती यांच्या स्मरणार्थ पत्रकार इरफान शेख तर स्व. मारुती सोनावणे यांच्या स्मरणार्थ माढ्याचे ज्येष्ठ पत्रकार प्रमोद गोसावी यांना सन्मानित करण्यात आले. पांच हजार रुपये रोख, गौरवपत्र, सन्मान चिन्ह व पुस्तके असे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी सोनटक्के यांनीही आपले मनोगत मांडले. योगेश तुरेराव यांनी आर. एन.आय. च्या नवीन तरतूदीबाबत मार्गदर्शन केले. यावेळी माजी नगरसेविका प्रा.मोहिनी पतकी, दै. तरूण भारतचे उपसंपादक श्याम जोशी, ज्येष्ठ पत्रकार प्रशांत जोशी, दशरथ वडतिले, विश्वनाथ वनकोरे, श्रीशैल चिंचोळकर, डॉ. शफी चोबदार, जुंजा, नागेश दांतकाळे, इक्बाल बागबान, बाळासाहेब वाघमोडे, देविदास उत्पात, इम्तियाज काजी, नागेश कुलकर्णी, ॲड. काटूळे, बाळासाहेब वाघमोडे, नागेश कुलकर्णी, पद्माकर कुलकर्णी, सीए आनंद करवंदे, धनंजय कुलकर्णी, योगेश तुरेराव, शौकत काझी, मजहर अलोळी, वसंत चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. पुरस्कार प्राप्त पत्रकार प्रमोद गोसावी व पुरुषोत्तम कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. देविदास उत्पात यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुराणा यांनी आभार मानले.

## होटगीच्या बेनक गणपती मंदिराचा होणार जीर्णोध्दार

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
सुमारे ९०० वर्षांपूर्वी श्री शिवयोगी सिद्धेश्वर महाराजांनी स्थापन केलेल्या अष्टविनायक मंदिरापैकी दुसरे गणपती मंदिर म्हणजे होटगी येथील श्री बेनक गणपती मंदिर होय. या मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात येणार असून त्यासाठी सुमारे १ कोटी २१ लाख रूपयांचा अपेक्षित आहे.

**सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेले मंदीर; १ कोटी २१ लाखांचा खर्च अपेक्षित**



बाराव्या शतकात सोन्नलगी शिवयोगी सिध्देश्वर महाराज यांनी विरेश गणपती कुंभारी, बेनक गणपती होटगी, धुळीमहंकाळ गणपती रेवणसिध्देश्वर मंदिर, कारीगण गणपती देगाव, विरकर गणपती सम्राट चौक , विरकोलाहल गणपती भोगाव, मश्रूम गणपती तळे हिप्परगा व कामेश्वर गणपती शेळगी सोलापूर अशा अष्टविनायक मंदिराची उभारणी केली. यामध्ये होटगीतील गणपती भक्तांकडून कुंभारी रोडवर भव्य आणि आकर्षक गणपती मंदिर उभारणी करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. बेनक गणपती मंदिराच्या जीर्णोध्दारासाठी कर्नाटक येथील गोकाकमधील मूर्ती साहीत्य आणण्यात आले आहे. यासाठी होटगीसह परीसरातील भक्तांकडून सढळ हाताने आर्थिक मदत देण्यात येत आहे. यासाठी होटगी मठाचे मठाधिपती व काशी पीठाचे जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जून शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आशीर्वादाने मल्लिकार्जून मातनाळे, मल्लिनाथ चिवडशेट्टी, सचिन व्हनमाने, मल्लिकार्जून कोणदे, शिवानंद हुडे व सिध्देश्वर पाटील आदींसह इतर भक्तगण मंदिर जीर्णोध्दारासाठी कार्यरत आहेत. परराज्यातून कलाकार व मूर्तीसाहीत्य आणण्यात आले असल्याने मंदिराचा खर्च वाढत आहे.



## माजी आमदार सातपुते यांच्या हस्ते पाण्याच्या टाकीचे भूमीपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ७ जानेवारी-**
पिलीव (ता.माळशिरस) तालुक्यातील पिलीवच्या साठेनगर येथील नूतन पाणीपुरवठा टाकीचे भूमीपूजन माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या हस्ते झाले.

येथील जुनी दगडी टाकी निकामी होऊन गळती लागली होती त्यामुळे साठेनगर येथील नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. सातपुते यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सहकार्यातून सोलापूर जिल्ह्या परिषद समाजकल्याण विभाग दलित वस्ती सुधार योजनेतून या टाकीसाठी १५ लाखांचा निधी मंजूर करुन घेतला. यासाठी माळशिरस तालुका मंडल अध्यक्ष नितीन मोहीते, माजी जिल्ह्य परिषद सदस्य गणेश पाटील यांनी पाठपुरावा केला. यावेळी चंद्रकांत जाधव, शिवराज पूकळे, प्रमोद भैस, प्रवीण वाघमारे, अंकुश भैस, गणेश देशमुख, आबा बनसोडे, सदाशिव लोखंडे, कुमार लोखंडे, राजू लोखंडे, दिलीप लोखंडे, महादेव जरग, संतोष करडे, सुरज वाघमारे, संतोष झेंडे, दादा सातपुतें, बापु लोखंडे ताहेर मुलाणी उपस्थित होते.

## इंट्याकच्या वतीने ११ जानेवारीला हेरिटेज वॉक-वारसा फेरी

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
भारतीय राष्ट्रीय कला व सांस्कृतिक वारसा न्यास-इंट्याक सोलापूर शाखेच्या वतीने, सोलापूरच्या भूमीत सुप्त असलेल्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी नियमित वारसा फेरी आयोजित येते असते. Preserving Our Past... Inspiring Our Future अर्थात, आपला भूतकाळ जपून, आपल्या भविष्याला प्रेरणा देणे या स्फूर्तिदायक संकल्पनेवर आधारित असते. ही वारसा फेरी रविवार दिनांक ११ जानेवारी रोजी सकाळी साडेसात वाजता वारसास्थळी होणार आहे. या वारसा फेरीच्या वेळीच पक्षी दर्शन, प्राणी दर्शन व वन फेरी देखील केली जाणार आहे. भारतातील सर्वात मोठा दगडी चक्रव्यूह खडकी, जिल्हा धाराशिव येथे आढळला. त्याचे प्राचीन महत्त्व, ऐतिहासिक संदर्भ इत्यादी प्रत्यक्ष त्याच ठिकाणी समजून घेण्यासाठी व सोबतच पक्षी निरीक्षण, प्राणीदर्शन, वन फेरीसाठी या वारसा फेरी- हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती या वारसा फेरीचे संयोजक व इंट्याक सोलापूर समन्वयक प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर यांनी दिली. अधिक माहितीसाठी संपर्क ९४२२६४४२४६, ९८९०८०२५२६ साधावा.

## सत्ता परिवर्तनाची ताकद लेखणीत : इंगळे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ जानेवारी-**
पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असुन सत्ता परिवर्तनाची ताकद लेखणी मध्ये असल्याचे गौरवोद्गार प्रथमेश इंगळे यांनी काढले.

पत्रकार दिनानिमित्त नगराध्यक्ष व वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे मित्र परिवार यांच्या वतीने पत्रकारांचा सत्कार शाल, श्रीफळ देऊन श्री.इंगळे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी श्री.इंगळे बोलत होते. यावेळी परिवाराचे सुनिल पवार, युवराज



सोनटक्के, आदित्य गवंडी, समर्थ मचले, समर्थ जाधव, समर्थ स्वामी, दर्शन घाटगे, अमोल महाडीक, अथर्व इंगळे, रमेश शिंदे, प्रतीक इंगळे, प्रसाद माने, पिंटू पवार आदि उपस्थिस्त होते. यावेळी पत्रकार स्वामीराव गायकवाड, रमेश भंडारी, राजेश जगताप, नंदकुमार जगदाळे यांचा सत्कार करण्यात आला.

## विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचे उद्या द्विवार्षिक महाअधिवेशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
भारत देशातील पहिली ISO ९००१ : २०१५ मानांकन तसेच महाराष्ट्र राज्यातील वीज क्षेत्रातील अग्रगण्य अशा विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचे २२ वे द्विवार्षिक महाअधिवेशन शुक्रवार, दि. ९ जानेवारी रोजी चिपळूण, रत्नागिरी येथे महाअधिवेशन सोहळा होणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटक लोकेश चंद्र (भा.प्र.से.) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महावितरण, कार्यक्रमाचे अध्यक्ष रवि बारई केंद्रीय अध्यक्ष विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन, प्रमुख अतिथी राजेंद्र पवार संचालक (मा.सं.) महावितरण, अभय हरणे संचालक (प्रकल्प) व खनिकर्म महानिर्मिती, श्रीमती सुचिता भिकाणे अप्पल जिल्हाधिकारी /कार्यकारी संचालक (मा.सं.) महापारेषण, आर. टी. देवकांत (केंद्रीय सरचिटणीस), संतोष घाडगे (केंद्रीय उपाध्यक्ष), बाळासाहेब गायकवाड (केंद्रीय उपाध्यक्ष) उपस्थित राहणार आहेत. महाअधिवेशनसाठी सोलापूर जिल्ह्यातून २८० ते ३०० सभासद जाणार असल्याची माहिती संघटनेचे पुणे प्रादेशिक संघटक तथा सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनिल काळे यांनी दिली.

## मोहोळ ग्रामीण पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी नसीर मोमीन यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**नरखेड, दि. ७ जानेवारी-**
मोहोळ तालुका ग्रामीण पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्षपदी नसीर मोमीन यांची तर सचिवपदी हनुमंत पवार यांची एकमताने निवड करण्यात आली.




मोहोळ तालुका ग्रामीण पत्रकार संघाच्या नूतन कार्यकारणीची बैठक नुकतीच मातोश्री मीना ठाकरे बालोद्यान मोहोळ या ठिकाणी ज्येष्ठ पत्रकार श्रीधर उन्हाळे यांच्या आदेशखाली संपन्न झाली. यामध्ये कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. नूतन कार्यकारणीची पुढील प्रमाणे निवड करण्यात आली. अध्यक्षपदी नसीर मोमीन, उपाध्यक्षपदी सोमनाथ मुसंडे, सचिवपदी हनुमंत पवार नरखेड, खजिनदारपदी राजू साखरे, कार्याध्यक्षपदी रफिक शेख यांची बिनविरोध एकमताने निवड करण्यात आली. यावेळी अशोक कांबळे, गणेश दळवे, रजनीश कसबे, कैलास रणदिवे, परमेश्वर अवताडे, योगेश शिंदे, राजन घाडगे, अश्पाक बागवान, राजगोपाल खांडेकर, सुशील वाघमारे, विजय पुजारी, सुनील गायकवाड, गणेश चौगुले, नागेश देशपांडे, दिनेश सातपुते, दत्ता मिसाळ, कल्याण वाघज, सचिन गवळी, भैय्यासाहेब कांबळे उपस्थित होते.

## प्रा. डॉ. राहुल पालके लिखित कवितांच्या वाचनातून आई-वडिलांचे नाते घट्ट झाले

**बार्शी, दि. ७ जानेवारी-**
मानवी जीवन हे भूतलावरील मोठी देणगी आहे. या देणगीला सार्थ ठरविणारे आई-वडिलांचे पवित्र नाते आहे. मानवी भाव-भावनांना ते नातं पावन करते. आयुष्यभर पुरणारी जन्माची शिदोरी आई असते आणि ही शिदोरी टिकून ठेवण्यासाठी बापाची पाटी असते. प्रा. डॉ. राहुल पालके यांनी आई-वडिलांची महती काव्यबद्ध करुन त्यांच्याप्रती स्नेहभाव व्यक्त केलेला आहे. त्यांचे वडील भगवान बाबुराव पालके यांच्या जन्मादिनानिमित्त त्यांनी काव्यातून भावना व्यक्त केल्या आहेत. माझं विद्यापीठ, बाप, आई व संस्काराची खाण या कवितांमधून त्यांच्या आई व वडील यांच्याप्रती भावना व्यक्त होतात. नआई-वडिलांच्या संस्कारातून जग जिंकण्याची भूमिका ते मांडतात व त्यांच्यातच जीवनाचे सार व्याप्त आहे असा विश्वास ते मांडतात. आईचे दर्शन झाल्यावर ते म्हणतात, जेंव्हा गंगामातेचं तीर्थ तिच्या डोळ्यात दिसत असतं अन् काशीचं दर्शन मायेच्या कुशीत घडत असतं. अशाप्रकारे आई-वडिलांचं पवित्र नातं काव्यरूपातून व्यक्त करत ते भारतीय संस्कृतीचे दर्शन वाचकांना घडवतात. या उपक्रमातून संस्काराचे मोती घडतील अशी भावना त्यांनी व्यक्त केली.



## भगवती गौरीमाता प्रशालेच्या विज्ञान साहित्याची राज्यस्तरीय प्रदर्शनासाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील श्री भगवती गौरीमाता प्रशालेतील बसवराज रविकांत तोळणुरे या विद्यार्थ्यांची सौर कृषी पंप या विज्ञान साहित्याची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

स्वेरी इंजिनिअरींग कॉलेज पंढरपूर येथे सोलापूर जिल्हा विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनात प्रशालेतील बसवराज तोळणुरे या विद्यार्थ्यांनी सौर कृषी पंप हे विज्ञान साहित्य मांडले होते. परिक्षक तथा विज्ञान व टेक्निकल तज्ञांनी त्याच्या सौर कृषी पंप साहित्याची निरिक्षण करुन जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उच्च प्राथमिक गटात प्रथम क्रमांक देऊन राज्य विज्ञान प्रदर्शनासाठी निवड केली आहे. या विद्यार्थ्याला प्रयोगशाळा परिचर महेश हांडगे, सहशिक्षक नागेशप्पा लंगोटे, सेवानिवृत्त प्रयोगशाळा सहाय्यक सुरेश घागरे यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल काशी पीठाचे जगद्गुरु श्रीश्रीश्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, श्री बृहन्मठ होटगी मठाचे मठाधिपती श्री बालतपस्वी चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी, सचिव शांतय्या स्वामी, मुख्याध्यापक गिरमल बुगडे, पर्यवेक्षक सचिन देगांवकर, विज्ञान विभाग प्रमुख अरुण हत्ताळी, विज्ञान विषय शिक्षिका वर्षा बिराजदार, ज्योती कलबुर्गी यांनी अभिनंदन केले.

**सौर कृषी पंप साहित्याचा उपयोग**
हे सौर कृषी पंप शेतकऱ्यांना उपयुक्त आहे. पेट्रोल अथवा डिझेल न वापरता, निसर्ग निर्मित सौर उर्जेवर चालणारे प्रदुषण विरहीत किडनाशक, किटकनाशक, तणनाशक फवारणीसाठी वापर केला जातो. यासाठी शेतकरी आपल्या डोक्यावर असलेल्या हेल्मेट अथवा टोपीवर सौर प्लेट बसवून हात पंप चालवून फवारणी करु शकतो. ही नवनिर्मिती विज्ञान साहित्य पेटंटसाठी कंपनी पुढे येतील व शेतकऱ्यांना नक्कीच उपयोगी पडेल, अशी अपेक्षा सेवानिवृत्त प्रयोगशाळा सहाय्यक सुरेश घागरे यांनी व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांनी वाचनाने स्वतःला समृद्ध करावे : कुलकर्णी

### शिवदारे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वक्तृत्व स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
वक्तृत्व म्हणजे केवळ शब्दांची जुळवाजुळव नसून, तो हृदयाकडून हृदयाकडे जाणारा प्रवास आहे. विद्यार्थ्यांनी वाचनाने स्वतःला समृद्ध करावे, कारण समृद्ध माणूसच प्रभावी बोलू शकतो, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखाचे अध्यक्ष आणि जिल्हा मराठी भाषा समितीचे सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी केले.



येथील सहकार महर्षि कै. वि. गु. शिवदारे अण्णा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी आणि वि. गु. शिवदारे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने बाळे येथील ढेपे प्रशालेत आयोजित करण्यात आलेल्या उत्तर सोलापूर तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन झाले त्यावेळी कुलकर्णी बोलत होते. स्पर्धा इयत्ता ७ वी ते ९ वी या शालेय गटातील विद्यार्थ्यांसाठी असून, मराठी व इंग्रजी अशा दोन्ही माध्यमांतून घेतलीअंतिम फेरी ३० जानेवारी रोजी युनिक इंग्लिश मिडियम स्कूल, शिवदारे शिक्षण संकुल येथे संपन्न होईल.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मंगळवेढा पोलीस ठाण्यात नूतन महिला पोलीस उपनिरीक्षक डॉ.कणिरे रूजू

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.७ जानेवारी-**

मंगळवेढा पोलीस ठाण्यात नूतन महिला पोलीस उपनिरीक्षक डॉ.आरती कणिरे यांनी नुकताच पदभार स्विकारला. दरम्यान गेली अनेक वर्षे येथे महिला अधिकारी नसल्यामुळे महिलांच्या गंभीर समस्या सोडविण्यात अडचण येत असल्याने पत्रकारांनी पोलीस अधिक्षक यांच्याकडे महिला अधिकाऱ्याची मागणी केली होती.

मागील पाच वर्षापुर्वी येथील महिला पोलीस अधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतर हे पद रिक्तच होते. मागील दोन आठवड्यापूर्वी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी हे वार्षिक तपासणी दरम्यान मंगळवेढ्यात आल्यावर पत्रकारांनी येथे महिला पोलीस अधिकाऱ्याची नितांत गरज असल्याचे सांगून तशी मागणी केली होती. याची दखल घेवून महिला पोलीस उपनिरीक्षक डॉ. कणिरे ह्या मंगळवार दि.६ जानेवारी रोजी नाशिक येथील ट्रेनींग सेंटर वरुन थेट कोल्हापूर परिक्षेत्र विभागामधून मंगळवेढ्याला दाखल झाल्या आहेत. त्या मुळच्या कोल्हापूर जिल्ह्यातील इंगळी गावच्या असून त्यांनी डॉक्टरेट पदवी मिळविली आहे. त्या २०२१ च्या बॅचच्या आहेत. मंगळवेढा पोलीस ठाण्याला एक महिला अधिकारी मिळाल्याने महिला वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी त्यांचा सत्कार करुन त्यांना पदभार दिला.





## महत्त्वाचे



### पाच लाखांचे सोने चोरट्यांना २४ तासात पकडले; करमाळा पोलिसांची कामगिरी

**जेऊर, दि.७ जानेवारी-**

डोंबिवली येथील सुलोचना मच्छिंद्र लोहार या नातवाच्या लग्नाला वरकटणे (ता.करमाळा) येथे आल्या होत्या. त्यांचा भाचा बाबासाहेब नंदरगे (करमाळा) येथे मुक्कामी थांबून दुसऱ्या दिवशी एसटी प्रवासावेळी त्यांचेजवळील ५ तोळे वजनाचे गंठण व चांदीचा छल्ला गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी चोरला. त्यांनी करमाळा पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. करमाळा पोलिसांनी सर्व माहिती घेत तपासाची सूत्रे गतीने हलवली अन् २४ तासात चोरट्यांना पकडले. करमाळा गुन्हे शाखेत गुन्हा नोंद झाल्यानंतर लगेचच पोलिसांनी एसटी स्टँड वरील सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारावर आरोपींचा शोध सुरू केला. त्यांना असे आढळून आले की आरोपी रविता भोसले व आशा पवार यांनी चोरी केली असावी. तात्काळ विविध क्लुप्त्या वापरून आरोपीला पकडण्यासाठी पथक रवाना झाले मोबाईल लोकेशनच्या आधारावर अहिल्यानगर जिल्ह्यात आरोपी आढळून येत होते. त्यांचा पाठलाग करत अखेर पुणे जिल्ह्यातील नारायणगाव परिसरात आरोपींना पकडले. त्यांना खाक्या दाखवताच त्यांनी गुन्हा कबूल केला व आपल्याकडील पाच तोळे सोन्याचे गंठण व चांदीचा छल्ला पोलिसांच्या ताब्यात दिला. याची किंमत सुमारे पाच लाख ८० हजार होती. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल आरकिले हे करत आहेत. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अंजना कृष्णा व करमाळा पोलीस निरीक्षक रणजीत माने यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पोलीस अजित उबाळे, मनिष पवार, वैभव ठेंगल, रविराज गटकुळ, अर्जुन गोसावी, भराटे, रंदिल, खोटे, न्हावकर तसेच सायबर शाखेचे व्यंकटेश मोरे हे करत आहेत.

### तरुणीस इन्स्टाग्रामवर अश्लिल व्हिडीओ पाठवल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**मंगळवेढा, दि.७ जानेवारी-**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातील एका २४ वर्षीय तरुण विवाहित महिलेच्या मोबाईल इन्स्टाग्रामवर बनावट अकाऊंट तयार करुन अश्लिल व्हिडीओ पाठवून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याप्रकरणी एका अज्ञात मोबाईल धारकाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील सदर २४ वर्षीय पिडीत तरुणी ही मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागात राहत असून पती नांदवत नसल्यामुळे ती सध्या आई वडिलाकडे राहत आहे. दि.११ जून २०२५ रोजी सदर पिडीतेच्या मोबाईल क्रमांकावर आरोपीने कॉल केला. पिडीतेने त्याला आपले नाव विचारले असता त्याने फोन कट केला. त्यानंतरही तो आरोपी वारंवार पिडीतेच्या मोबाईलवर फोन करत असे मात्र तो रिप्लाय देत नव्हता म्हणून पिडीतेने तिचा इन्स्टाग्राम आयडी बंद केला. दि.१२ जून रोजी इन्स्टाग्रामवर अज्ञात व्यक्तीने एका अनोळखी इसमासोबत किस केलेले व एकमेकास मिठी मारलेले व्हिडीओ व फोटो तयार करुन त्याखाली हाय मेरी जान असे लिहून ते व्हिडीओ इन्स्टाग्रामवर अपलोड केले. सदरची घटना पिडीतेने आपल्या कुटुंबातील भावाला व आई वडिलांना कथन करुन गुन्हा दाखल करण्यास आली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### मंगळवेढा येथील विधाता इंडस्ट्रीज कंपनीचा पत्रा उचकटून ५५ हजारांचे साहित्य चोरले

**मंगळवेढा, दि.७ जानेवारी-**

मंगळवेढा शहरालगत बायपास रोडला असलेल्या विधाता इन्डस्ट्रीज ट्रान्सफार्म रिपेरिंग कंपनीचा पत्रा उचकटून आत प्रवेश करुन चोरट्याने ५५ हजार रुपये किंमतीची कॉपर वायर व ब्रास रॉड चोरुन नेल्याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी संदीप पाटील (रा.ब्रम्हपुरी) यांचे मंगळवेढा शहरालगत बायपास रोडला जोगेश्वरी मंगल कार्यालयासमोर विधात इंडस्ट्रीज ट्रान्सफार्म रिपेरिंग कंपनी असून दि.३ जानेवारी रोजी रात्री



१० ते ४ जानेवारीच्या सकाळी १०.३० या दरम्यान कंपनीचा पत्रा उचकटून आत प्रवेश करुन चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची ६० किलो कॉपर वायर, तसेच २५ हजार रुपये किंमतीचे २५ किलो बास रॉड असा एकूण ५५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरुन नेला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा तपास पोलीस हवालदार कांबळे हे करीत आहेत.

## मोहिनी सावंत यांनी घेतला करमाळा नगराध्यक्षपदाचा पदभार

### सर्वांगिण विकासाचा व्यक्त केला निर्धार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.७ जानेवारी-**

करमाळा शहराच्या विकासासाठी सर्व नगरसेवक व प्रशासनाच्या सहकार्याने शहर स्वच्छ, सुंदर व सुव्यवस्थित करण्यासोबतच सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार करमाळ्याच्या नूतन नगराध्यक्षा सौ. मोहिनी संजय सावंत यांनी व्यक्त केला.

करमाळा नगरपालिकेचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी बोलताना सौ. सावंत म्हणाल्या की, करमाळा शहरातील जनतेने मला व करमाळा शहर विकास आघाडीला भरभरून मते देऊन निवडून दिले असून, जनतेने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी प्रामाणिकपणे व पारदर्शक कारभारातून विकासकामांना गती दिली जाईल. या प्रसंगी मुख्याधिकारी सचिन तपसे यांच्या हस्ते नूतन नगराध्यक्षा मोहिनी सावंत व त्यांचे पती संजय सावंत यांचा नगरपालिकेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक रवी जाधव, विक्रमसिंह परदेशी, चैताली सावंत, ज्योत्स्ना लुणिया, जबीन मुलाणी, पुजा इंदलकर, संदिप कांबळे व संजय सावंत यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष कक्षामध्ये कै. सुभाष आण्णा सावंत व कै.




डी. के. सावंत यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सावंत गटाचे नेते सुनील बापू सावंत यांनी सांगितले की, करमाळा शहर विकास आघाडीच्या माध्यमातून आम्ही नगरपालिकेची निवडणूक लढवली. प्रस्थापित व मोठ्या पक्षांबरोबर थेट लढत असतानाही जनतेने आमच्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो विश्वास सर्वसामान्य जनतेच्या हिताची कामे करून निश्चितच सार्थ ठरवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नगराध्यक्षा सावंत यांचे पती संजय सावंत यांनी जनतेचे आभार मानताना सांगितले की, जनतेने दिलेली भरभरून मते ही विकासासाठीच दिली आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, गटारी, नालेसफाई यासह करमाळा शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन एकत्रितपणे काम केले जाईल.

आदिनाथ साखर कारखान्याचे संचालक ॲड. राहुल सावंत यांनी नूतन नगराध्यक्षा व सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांना शुभेच्छा दिल्या. जनतेने मतांच्या माध्यमातून टाकलेला विश्वास निश्चितच नगराध्यक्षा सावंत व सर्व नगरसेवक पूर्ण करतील आणि करमाळा शहराचा चेहरामोहरा बदलून शहर स्वच्छ व सुंदर करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. करमाळा शहरातून दोस्ती बँडच्या नादात वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार घालून पदयात्रा काढुन नगराध्यक्ष व नगरसेवकांनी नगरपालिकेत जाऊन अधिकृतपणे पदग्रहण केले. यावेळी नगरपालिका अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील नागरिकांनी त्यांचे स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमांमध्ये भाजपचे नगरसेवक दिपक चव्हाण, सचिन घोलप, अतुल फंड, स्वाती फंड, प्रतिनिधी विजय घोलप, सचिन गायकवाड, रामभाऊ ढाणे यांनी नूतन नगराध्यक्ष सावंत व त्यांचे पती संजय सावंत यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी नगराध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे, अजितसिंह परदेशी, झनकसिंह परदेशी, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष हनुमंत मांढरे पाटील, शिवसेनेचे शहरप्रमुख प्रवीण कटारिया, सुखदेव लष्कर, लालाभाई कुरेशी, गणेश झोळे, मनोज गोडसे, शैलेश खडके, सुनील लुणिया, पिल्लू इंदलकर, अभय महाजन, कदीर शेख, महेश मोरे, विनोद महानवर, प्रियंका गायकवाड, जयश्रीताई मुसळे, मीरा शेंडे, पुष्पा शिंदे, अल्लाउद्दीन शेख, बापू उबाळे, पांडुरंग घोगरे, पप्पू सूर्यवंशी, भूषण खुळे, अमोल परदेशी, हुमरान मुलाणी, जितेश कांबळे, बापू मोरे, देवा लोंढे, रविंद्र कांबळे, जमीर सय्यद, सुनिल विटकर, राजकुमार जगताप, बाळासाहेब कुंभार, सावंत बंधू व त्यांचे कुटुंबीय, करमाळा शहर विकास आघाडीचे कार्यकर्ते तसेच सावंत गटावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## ४८ तासात बेपत्ता अल्पवयीन मुलाचा पोलिसांनी घेतला शोध

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.७ जानेवारी-**

बार्शी शहर पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे अवघ्या ४८ तासांच्या आत बेपत्ता झालेल्या १३ वर्षीय अल्पवयीन मुलाचा शोध घेण्यात यश आले असून या कामगिरीचे कौतुक होत आहे.

बार्शी शहरातील टिळक चौक परिसरात राहणारे दशरथ शहाजी चव्हाण यांचा मुलगा श्रेयश दशरथ चव्हाण (वय १३ वर्षे) हा दि.२ जानेवारी रोजी कोणासही न सांगता घरातून निघून गेला होता. याबाबत बार्शी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी तात्काळ दखल घेत सपोनि झालटे व गुन्हे प्रकटीकरण पथकाला शोधकार्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार सपोनि झालटे यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाने बार्शी बसस्थानक, कुर्डुवाडी बसस्थानक तसेच पुणे रेल्वे स्टेशन येथील सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण केले. तपासात मुलगा पुणे येथे गेल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पथकाने पुणे येथे तात्काळ शोध मोहीम राबवत बेपत्ता मुलाचा शोध घेऊन त्याला त्याच्या आई-वडिलांकडे सुपूर्त करताना बार्शी शहर पोलीस राबवून दि. ४ जानेवारी रोजी श्रेयश चव्हाण यास सुखरुप शोधून काढले. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन मुलास त्याच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

## विद्यार्थी आदर्शाच्या शोधात असतात : कानेटकर

### कै. बाबुराव डिसले जीवनगौरव पुरस्कार व स्नेहसंमेलनात अभिनेत्रीचे वक्तव्य

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ जानेवारी**

सामान्य कुटुंबात जन्माला येऊन असामान्य कर्तृत्व संपादन करत पुढच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरलेल्या स्व. शिवाजीराव डिसले यांच्यासारख्या व्यक्ती प्रेरक असतात, असे मत सिनेअभिनेत्री उर्मिला कानेटकर यांनी व्यक्त केले. अर्णव शैक्षणिक संकुल सासुरे फाटा वैराग ता.बार्शी येथे कै. बाबुराव डिसले जीवन गौरव स्मृती पुरस्कार वितरण सोहळा, सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. शिवाजीराव डिसले शेठ यांच्या ७२ व्या जयंतीनिमित्त व शैक्षणिक संकुलांच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात त्या बोलत होत्या.



पुढे बोलताना त्यांनी हजारो विद्यार्थ्यांसाठी अर्णव शैक्षणिक संकुल आपल्या अंगभूत कौशल्याला वाव देणारा रंगमंच असल्याचे सांगितले. आपल्या शालेय जीवनातील आठवणी त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतानाच संकुलातील उपक्रमांची स्तुती केली. अष्टावधानी विद्यार्थी घडवणे ही शिक्षकांची जबाबदारी असून समाजातील प्रत्येक घटकाला शाळेबद्दल आस्था असल्याचे त्यांनी सांगितले. तर सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे सचिव प्रताप दराडे यांनी मंडळाच्या सामाजिक कामाचा आढावा घेतानाच शैक्षणिक संकुलातील गुणात्मक वाढीवरही प्रकाश टाकला.

सूर्यकांत क्षीरसागर, राणुबाई जगताप, प्रदीप कापसे, विजय निलाखे, भीष्माचार्य चांदणे, गणेश शालगर, नझीर शेख, प्रा.किरण देशमुख, भगवंत साळवे, ह.भ.प.तुकाराम मस्के, शशिकांत लांडगे, प्रसाद मोहिते यांना विविध क्षेत्रातील कार्याबद्दल कै. बाबुराव डिसले जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. चित्रपट गीते, देशभक्तीपर गीते व लोकगीतांसोबतच ज्वलंत विषयावर भाष्य करणारी नाटिका विद्यार्थ्यांनी रंगमंचावर सादर केली. सोमनाथ घायतिडक यांनी सूत्रसंचालन केले तर सुहास ढेकणे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी संस्था सचिव रवींद्र कापसे, मुख्याध्यापिका अर्चना डिसले, अरुण बारबोले, पो नि कुंदन गावडे, सिनेअभिनेते सुमीत तनपुरे, महेश साठे, माजी सभापती अनिल डिसले, सचिन डिसले, अर्णव कापसे,अद्विक कापसे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पठाणवस्तीच्या सरपंचासह आजी-माजी पदाधिकारी भाजपात

### माजी आमदार राम सातपूते यांनी केला सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.७ जानेवारी-**

भाजपाशिवाय अन्य पक्षांस लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत गावातील मतदारांनी मताधिक्य देऊन सुद्धा गावातील विकास कामे झालेली नाहीत. गावातील विकास खुंटला आहे. गतिमान विकास करण्याकरता माजी आमदार राम सातपुते यांच्या विकास कामांवर विश्वास व भरवसा ठेवून भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश करीत असल्याचे पठाण वस्तीचे लोकनियुक्त सरपंच एजाज पठाण यांनी भाजप पक्ष प्रवेशावेळी बोलताना सांगितले.

भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व माजी आमदार राम सातपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत पठाण वस्ती येथील लोकांनी



भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. त्यामध्ये सरपंच एजाज पठाण, माजी उपसरपंच अशोक सोनवणे, पितांबर मगर, लालासो मगर, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी शेटे, दिलीप शेटे, बापू कनप, चेअरमन तनवीर पठाण, माजी उपसरपंच इम्तियाज पठाण, सतीश सरतापे, सुनील सरतापे, जावेद पठाण, अलाउद्दीन सय्यद, भीमराव मगर, सोमनाथ गोरे, देवा कनप, अंजुम पठाण, अख्तर पठाण, मुश्ताक पठाण, नाना लोंढे, आबा कनप, अमोल शिंगाडे, जयराम शिंगाडे, महादेव शेटे (गुरूजी), अलिम पठाण, महादेव बापू सुळ, अनिल कनप. आदी नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सहकार्याने गावातील समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे. सर्वांच्या अपेक्षा पूर्ण केल्या जातील असे सांगून सर्वांचे भारतीय जनता पक्षामध्ये माजी आमदार राम सातपुते यांनी स्वागत केले.

## पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक योजनांचा लाभ घ्या : डॉ.प्रवीण शिंदे

**माळशिरस, दि.७ जानेवारी-**

पशुसंवर्धन विभाग अंतर्गत जिल्हा परिषद सेस मधून विविध योजना सुरु करण्यात आल्या असून या वैयक्तिक योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रवीण शिंदे यांनी केले आहे.



पशुसंवर्धन विभाग अंतर्गत जिल्हा परिषद सेस सन २०२५-२०२६ साठी जिल्हा वार्षिक योजना २०२५-२०२६ या वर्षासाठी आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या शेतमजूर व शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदानावर ४ शेळ्या व १ बोकड गट वाटप करणे,५० टक्के अनुदानावर पशुपालकांना मिल्किंग मशीन पुरवणे या योजना सुरु करण्यात आल्या आहेत. त्यासाठी खालील कागदपत्र आवशक आहेत. फोटो ओळखपत्र, अपंग प्रमाणपत्र, दारिद्र्य रेषेचा दाखला, ७/१२ व ८ अ उतारा, ग्रामपंचायत नमुना ८, जातीचा दाखला, रेशन कार्ड, अपत्य दाखला,बचत गट प्रमाणपत्र, रोजगार कार्ड, प्रशिक्षण या कागदपत्रासह सदर योजनेचे अर्ज ऑफलाईन पद्धतीने दि. ५ ते २४ जानेवारी पर्यंत पंचायत समिती माळशिरस पशुधन विभागात जमा करावेत.

## अखेर ठरलं...पाचव्यांदा होणार लेपन प्रक्रिया


**श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्तीवर लवकरच रासायनिक प्रक्रिया**

**विधी व न्याय विभागाची परवानगी**

**प्रक्रियेदरम्यान तीन दिवस दर्शन राहणार बंद**

**माघी यात्रेपूर्वी मूर्तीवर रासायनिक प्रक्रिया**





**पंढरपूर, दि.७ जानेवारी -**

येथील श्री विठ्ठल आणि रुक्मिणी मूर्तीवर पाचव्यांदा रासायनिक लेपन प्रक्रिया करण्याचे अखेर निश्चित झाले आहे. विधी व न्याय खात्याने तशी मंदिर समितीला परवानगी दिली आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या उपस्थितीमध्ये बैठक बोलविण्यात आली आहे.

या बैठकीमध्ये रासायनिक प्रक्रियेचा निर्णय घेतला जाईल. रासायनिक प्रक्रिये दरम्यान विठ्ठल रुक्मिणी पदस्पर्श दर्शन तीन दिवस बंद ठेवले जाणार आहे, अशी माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. श्री विठ्ठल मंदिराचे जतन आणि संवर्धनाचे काम सुरू आहे. मंदिरातील बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत. या दरम्यान भारतीय पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्तीची पाहणी केली होती. पाहणीनंतर मूर्ती जतन आणि संवर्धनासाठी रासायनिक प्रक्रिया करावी लागेल, असा अहवाल मंदिर समितीला दिला होता. त्यानुसार मंदिर समितीने तो अहवाल विधी व न्याय खात्याकडे पाठवला होता. विधी व न्याय खात्याने मूर्तीवर रासायनिक प्रक्रिया करण्यासाठी परवानगी दिली आहे. माघी यात्रेच्या पूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करण्याचा विचार आहे. येत्या दोन दिवसामध्ये जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या उपस्थितीमध्ये पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, सल्लागर समिती सदस्यांची बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये कमी गर्दीचा कालावधी विचारात घेऊन माघी यात्रेच्या पूर्वी मूर्तीवर रासायनिक प्रक्रिया केली जाणार आहे. यापूर्वी श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेच्या मूर्ती संवर्धनासाठी चार वेळा रासायनिक प्रक्रिया केली आहे. आता पाचव्यांदा रासायनिक प्रक्रिया केली जाणार आहे.

> “विधी व न्याय विभागाने श्री विठ्ठल मुर्तीच्या चरणावर रासायनिक प्रक्रिया करण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार मंदिर समितीकडून याची तातडीने दखल घेऊन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, सल्लागार परिषद, स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानिक महाराज मंडळी यांच्या संघटनांसमवेत लवकरच एक संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत पुरातत्व विभागाचे अधिकारी उपस्थित असतील. किती दिवस पदस्पर्श दर्शन बंद ठेवावे लागेल याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.”
>
> **- राजेंद्र शेळके,**
> मुख्य कार्यकारी अधिकारी, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती

छत्रपती संभाजीनगर येथील भारतीय पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली मूर्तीवर रासायनिक प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. प्रक्रियेसाठी किमान तीन दिवसांचा अवधी लागणार आहे. या काळात देवाचे पदस्पर्श दर्शन बंद ठेवले जाणार आहे. तथापि देवाचे मुखदर्शन सुरू ठेवण्यात येणार आहे.